७० वर्ष

दैनिक

# संध्या

नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

शुक्रवार, दि. २७ फेब्रुवारी २०२६

www.dainikesandhya.com    www.youtube.com/@sandhyalivenews

संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : ०६४ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रूपये


## रात्रीच्या अंधाराचा फायदा घेत झाडांची कत्तल

बालेवाडी (दै. संध्या) : बाणेर रस्ता येथील बालेवाडी फाट्याजवळच असलेले एक जुने पिंपळाचे झाड काही अज्ञात व्यक्तींनी रात्रीच्या अंधाराचा फायदा घेत तोडले आहे. सकाळी ही बाब स्थानिक नागरिकांच्या निदर्शनास येताच परिसरात तीव्र नाराजी व्यक्त करण्यात येत आहे. तसेच दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. पंधरा दिवसांपूर्वीदेखील बाणेर रस्त्यावरील एक मोठे झाड असेच रात्रीच्या वेळी तोडण्यात आले होते. “रात्रीच्या वेळी अशाप्रकारे वृक्षतोड होणे ही गंभीर बाब असून प्रशासनाने याची सखोल चौकशी करावी,” अशी मागणी नागरिकांनी केली आहे. बाणेर परिसराचा विकास मोठ्या प्रमाणात आणि खूप झपाट्याने होत आहे. त्यामुळे अनेक मोठे गृह प्रकल्प, मोठी दुकाने, हॉटेल व्यवसाय सुरू झालेले आहेत. त्यादृष्टीने या ठिकाणी जाहिराती करताना किंवा पार्किंगसाठी जागा कमी पडत असेल, तर अशा प्रकारे रात्रीतून झाडे कापण्याचा प्रकार सतत सुरू असतात. असाच एक प्रकार बाणेर येथील बालेवाडी फाटा येथे घडला.

### ढिंग-टांग




# ‘महावितरण’ने उत्पन्न वाढीसाठी ‘आयपीओ’ आणून ‘कॉर्पोरेट गव्हर्नन्स’ चा अंमल करावा : मुख्यमंत्री

मुंबई (दै. संध्या)

■ एमएसईबी सोलर अॅग्रो पॉवर लिमिटेड कंपनीचे कार्यान्वयन सुरू करावे

■ महावितरणच्या पुनर्रचित आराखड्याचे सादरीकरण



ऊर्जा क्षेत्रात कार्यरत असलेल्या बाजारपेठेचा लाभ उठवित महावितरणने आयपीओ (इनिशियल पब्लिक ऑफरिंग) आणत उत्पन्नाचा कायमस्वरूपी स्रोत निर्माण करून तोट्याकडून नफ्याकडे वळावे, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देत कंपनीने आपल्या कारभारात ‘कॉर्पोरेट गव्हर्नन्स’ चा अंमल करण्याच्या सूचनाही मुख्यमंत्र्यांनी दिल्या.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, ऊर्जा विभागाने एमएसईबी सोलर अॅग्रो पॉवर लिमिटेड कंपनी निर्माण केली आहे. नवीन कंपनीमुळे कृषी क्षेत्राच्या दायित्वापोटी सध्या तोट्यात असलेल्या महावितरण कंपनीचे विभाजन झाल्यामुळे कंपनी नफ्यात आलेली दिसेल. या कंपनीचे कार्यान्वयन सुरू करण्याची सूचनाही त्यांनी दिली.

कृषी क्षेत्राच्या राज्य शासनाच्या हमीची रक्कम कंपनीला येणाऱ्या वित्त आयोगाच्या निधीतून देण्यात यावी. नवीन सोलर अॅग्रो पावर लिमिटेड कंपनीला ठराविक मर्यादेपर्यंत आणि कालावधीसाठी शासनाच्या वतीने अनुदान देण्यात येईल. त्यानंतर कंपनीला स्वतःच्या उत्पन्नाचे स्त्रोत निर्माण करावे लागतील. जेणेकरून भविष्यात शासनाकडे निधी मागणीची वेळ येणार नाही, असेही फडणवीस यावेळी म्हणाले. भांडवली बाजारात कंपनीने ‘ आयपीओ’ च्या माध्यमातून प्रवेश केल्यास मोठ्या प्रमाणावर समभाग धारकांकडून गुंतवणूक होऊन कंपनीसाठी निधी उपलब्ध करता येईल. सध्या कंपनीची ७६ हजार १८९ कोटी रुपयांची थकबाकी आहे. यामध्ये ५९ हजार ५२७ कोटी रुपये कृषी क्षेत्राशी सबंधित आहेत. कंपनीला स्वतःच्या पायावर उभे करण्यासाठी आर्थिक पुनर्रचनेची गरज आहे. शासनाकडून हमी स्वरूपात असलेल्या ३२ हजार ६७९ कोटी देण्याबाबत टप्प्याटप्प्याने कार्यवाही करण्यात यावी, असेही मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले. भारत सरकारच्या प्रस्तावित योजनेनुसार राज्य शासन जीएसडीपीच्या (सकल राज्य देशांतर्गत उत्पादन) ०.५ टक्के रक्कम महावितरणला मिळण्यासाठी प्रयत्न करावे. प्रस्तावित पुनर्रचना योजनेच्या अंमलबजावणीनंतर निधी मागण्याची आवश्यकता राहणार नसल्याने शासनाची बचत होणार आहे. यासाठी केंद्र शासनाकडे पाठपुरावा करून कार्यवाही पूर्ण करावी.

## व्हीएसआरविरोधात गुन्हा दाखल करण्यास नकार : रोहित पवार आक्रमक

मुंबई (दै. संध्या)



■ पोलिसांवर कोणाचातरी दबाव असल्याचा आरोप

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि राज्याचे माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या भीषण विमान अपघातात झालेल्या मृत्यूनंतर पवार कुटुंब आक्रमक झाले आहे. आमदार रोहित पवार यांनी या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी व्हावी, संबंधित कंपन्या आणि जबाबदार अधिकाऱ्यांवर तात्काळ गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी केली आहे. त्यांच्या भूमिकेला आता अजित पवार यांचे दुसरे पुतणे युगेंद्र पवार यांनीही जोरदार पाठिंबा दिला आहे. दोघेही मिळून व्हीएसआर कंपनीविरोधात थेट पोलिसांत तक्रार दाखल करण्याची मागणी करत आहेत. त्यासाठी दोघेही बारामती पोलिस ठाण्यात दाखल झाले होते. मात्र, पोलिसांनी एफआयआर दाखल केलेला नाही. त्यानंतर रोहित पवार चांगलेच आक्रमक झाले. समर्थकांनीही जोरदार घोषणाबाजी केली. त्यानंतर रोहित पवार यांनी पत्रकारांशी संवाद साधला. या वेळी रोहित पवार यांनी देशातील कोणत्याही नागरिकाला एफआरआय दाखल करण्याचा अधिकार असल्याचे म्हटले आहे. एफआरआय दाखल करण्यास नकार देण्यात आल्याने रोहित पवार यांनी संबंधीत विमान कंपनीवर अनेक गंभीर आरोप केले आहेत. तसेच या प्रकरणात दोषींना वाचवण्याचा प्रयत्न केला जात असल्याचा आरोप केला आहे. रोहित पवार यांनी अजित पवार यांच्या विमान अपघातप्रकरणी घातपाताची शक्यता व्यक्त करत तपास यंत्रणांवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. त्यांनी DGCA,सीआयडी आणि केंद्रीय विमान वाहतूक मंत्रालयाच्या भूमिकेवर संशय व्यक्त करत VSR कंपनीला वाचवण्याचा व पुरावे नष्ट करण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप केला.

### ब्रेकिंग न्यूज

## सख्ख्या भावाचा खून करून मृतदेह जाळला

खामगाव (दै. संध्या) : तालुक्यातील राहुड येथे सख्ख्या भावाचा खून करून मृतदेह जाळून राख नदीत फेकून दिल्याची थरारक घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी पिंपळगाव राजा पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला असून, दोन आरोपींना अटक करण्यात आली आहे. यासंदर्भात मिळालेल्या माहितीनुसार, राहुड येथील पोलीस पाटील विलास देविदास बनसोडे यांना गावातील चेतन संजय इंगळे (३५) रा. राहूड यांचा खून झाल्याची व तो गावातून गायब असल्याची माहिती मिळाली. यासंदर्भात त्यांनी तात्काळ पिंपळगाव राजा पोलीसांना माहिती देताच ठाणेदार मुळीक व पोलीस कर्मचारी चेतन इंगळे यांचा शोध घेत होते. दरम्यान आरोपी रोशन संजय इंगळे (३६) रा. राहुड याने चेतन इंगळे याचा खून केल्याचे समोर आले. पोलीसांनी त्यास ताब्यात घेवून चौकशी केली असता त्याने आरोपी रवि देविदास राऊत (३६) रा. महाकाल चौक, खामगाव याच्या मदतीने स्वतःच्या भाऊ चेतन इंगळे याच्या डोक्यात लोखंडी रॉडने वार करून त्यांना ठार मारले व त्यानंतर पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने मृतदेह जाळून त्याची राख नदीत फेकून दिल्याची कबुली दिली आहे.

## विद्युत पोलवर काम करताना तरुणाचा मृत्यू

मुरुड(दै. संध्या) : मुरुड - निवळी (ता. लातूर) येथील शेतातील ३३ केव्ही उच्चदाबाच्या वीजवाहिनीच्या पोलवर काम करताना विजेचा तीव्र धक्का बसून एका तरुणाचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना बुधवारी सायंकाळी घडली. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. अजित संजय मस्के (वय ३०, रा. निवळी) असे मृत तरुणाचे नाव असून ते खाजगी लाईनमन म्हणून काम करत होते. निवळी येथील एका शेतकऱ्याच्या शेतातील विद्युत खांबा लगतची स्टे काढण्यासाठी ते वीजपुरवठा सुरू असलेल्या लाईनच्या पोलवर चढले असता त्यांना तीव्र विद्युत धक्का बसला. उच्चदाबाच्या प्रवाहामुळे ते खाली कोसळले. ग्रामस्थांनी तातडीने त्यांना शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, लातूर येथे उपचारासाठी दाखल केले.

## जिल्हा परिषद अन् पंचायत समितीमध्येही स्वीकृत सदस्य; कॅबिनेटमध्ये शिक्कामोर्तब

मुंबई (दै. संध्या)



राज्यातील महापालिका आणि नगरपालिका निवडणुकांचा निकाल लागल्यानंतर तेथे स्वीकृत नगरसेवकांची निवड करण्यात आली आहे. संख्याबळाच्या आधारावर पक्षांना हे स्वीकृत नगरसेवकपद मिळाले आहेत. त्यातच, नुकतेच जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकाही पार पडल्या असून आता जिल्हा परिषद आणि पंचायत समितीमध्येही स्वीकृत सदस्य असणार आहेत. राज्य मंत्रिमंडळात या निर्णयावर शिक्कामोर्तब झाल्याची सूत्रांची माहिती आहे. जिल्हा परिषदेत सदस्य संख्येच्या 10 टक्के तर पंचायत समितीत सदस्य संख्येमागे 20 टक्के सदस्य निवडता येणार असल्याची माहिती आहे. राज्य मंत्रिमंडळ बैठकीत झालेल्या निर्णयानुसार जिल्हा परिषदेत सदस्य संख्येच्या 10 टक्के तर पंचायत समितीत सदस्य संख्येमागे 20 टक्के सदस्य निवडता येणार असल्याची माहिती आहे. किमान 5 सदस्य निवडणे बंधनकारक असणार आहे. यासंदर्भात लवकरच विधिमंडळात कायदा पारीत केला जाणार असल्याची माहिती आहे.

# सुनेत्रा पवारांची पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी निवड

*वरळीत पक्ष कार्यकारिणी बैठकीत निर्णय, प्रफुल्ल पटेल यांनी केली घोषणा*

मुंबई (दै. संध्या)



दिवंगत माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पत्नी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. वरळी डोम येथे पक्षाच्या कार्यकारिणी बैठकीत हा निर्णय झाला असून प्रफुल्ल पटेल यांनी याबाबतची घोषणा केली. महाराष्ट्राच्या विकासासाठी अजितदादा झटत राहिलेले आपण पाहिले आहे. त्यांच्या अचानक जाण्याने त्यांचे सगळे स्वप्न आधुरे राहिले आहेत. परंतु, "उनके सपने अधुरे नही रहेंगे, हम सब मिलकर उनके सपने और भी उंचाई पर हम सब लेके जायेंगे", असे यावेळी सुनेत्रा पवार म्हणाल्या. सुनेत्रा पवार म्हणाल्या, आदरणीय दादा आज आपल्यात नाहीत, हे अजूनही मन मानायला तयार नाही. हा आघात प्रचंड आहे. मात्र, वास्तव मान्य करायला पाहिजे. यातून आपल्याला बाहेर पडले पाहिजे. कारण आपली राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष हा केवळ पक्ष नाही, हा विचार आहे, परिवार आहे. हा विचार पुढे नेण्यासाठी आपल्याला निर्धाराने पुढे जावे लागणार आहे. मला आणि आपल्या सगळ्यांना माहित आहे की दादांची पोकळी कधीच भरून निघू शकणार नाही. पण त्यांनी दाखवलेला विकास मार्ग, त्यांची जिद्द, त्यांची शिस्त हीच खरी राष्ट्रवादी आहे. सुनेत्रा पवार म्हणाल्या, आपला पक्ष संघर्षातून स्थापन झाला. तब्बल 27 वर्षांची वाटचाल पूर्ण करत आपला पक्ष आज तारुण्यात आहे. कार्यकर्त्यांमध्ये जोश निर्माण करण्याचे काम आपल्याला करायचे आहे. राजकारण आणि समाजकारण करताना माझ्यासाठी सगळेच नवीन होते. आदरणीय दादांसारख्या वादळासोबत मी 40 वर्षे संसार केला. त्यामुळे पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्ष पदाची जबाबदारी कठीण असली तरी तुमच्या सगळ्यांच्या पाठबळामुळे आणि तुमच्या साथीने अजिबात अशक्य नाही, याचा मला विश्वास आहे. हा सन्मान केवळ माझा नसून तळागाळातल्या काम करणाऱ्या प्रत्येक कार्यकर्त्याचा आहे, जनमाणसाचा आहे, माता-भगिनींचा आहे. अजितदादांनी आयुष्यभर शिव-शाहू-फुले-आंबेडकर हा विचार जपला. यशवंतराव चव्हाण यांचा वारसा त्यांनी आयुष्यभर जपला. तोच वारसा आपण पुढे नेणार आहोत. सगळ्या समाज घटकांना आपण सोबत घेऊन पुढे जाणार आहोत. आज मी आपल्या राष्ट्रीय अध्यक्ष पदाची जबाबदारी स्वीकारत असले तरी प्रत्येक कार्यकर्ता हा अध्यक्ष आहे.

# अजित पवार विमान अपघात प्रकरण : सीआयडी तपास योग्य दिशेने

पुणे (दै. संध्या)

■ घातपाताची शक्यता तपासली जातेय - अपर पोलिस महासंचालक सुनील रामानंद



दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघाताचा सीआयडी तपास योग्य दिशेने सुरू असल्याची माहिती गुन्हे अन्वेषण विभागाचे अपर पोलीस महासंचालक सुनील रामानंद यांनी दिली आहे. या अपघातात घातपात, निष्काळजीपणा किंवा कोणते गुन्हेगारी कृत्य घडले आहे का, याचा सखोल तपास करण्यात येत असल्याचे त्यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

रामानंद यांनी स्पष्ट केले की, बारामती वैद्यकीय महाविद्यालय, फॉरेन्सिक लॅब आणि केंद्रातील अनेक तपास संस्था या तपासात मदत करत आहेत. एअरक्राफ्ट इन्व्हेस्टिगेशन कमिटीचा (AAIG) तपासही सुरू असून, त्यांचे निष्कर्ष विचारात घेतले जात आहेत.

तपासात घातपात, निष्काळजीपणा किंवा गुन्हेगारी कृत्य निष्पन्न झाल्यास, सीआयडी योग्य कलमाखाली गुन्हा दाखल करून पुढील तपास करेल आणि न्यायालयात अभियोग चालवण्याची तयारी ठेवली आहे. हा तपास गुन्हेगारी घटनांच्या अनुषंगाने केला जात असल्याचे त्यांनी नमूद केले.

या घटनेचा तपास योग्य प्रकारे सुरू असून, केंद्रीय तपास यंत्रणा आणि विविध यंत्रणांची मदत घेतली जात आहे. सर्वोच्च न्यायालयाने सांगितल्याप्रमाणे, कोणत्याही तपासाला ठराविक मर्यादा नसते. या तपासात अनेक गुंतागुंतीच्या गोष्टी असल्या तरी, तो योग्य दिशेने सुरू आहे.गेल्या २८ दिवसांत अनेक पुरावे समोर आले असून, मोठ्या प्रमाणात पुरावे वेगाने गोळा करण्यात आले आहेत. उर्वरित पुरावे देखील लवकरच जमा करण्यात येतील, असे रामानंद यांनी सांगितले. सीआयडी नेमका कोणता तपास करत आहे आणि तपासाची गती काय आहे, यावरही लक्ष केंद्रित केले जात आहे, असे ते म्हणाले.

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि राज्याचे माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या भीषण विमान अपघातात झालेल्या मृत्यूनंतर पवार कुटुंब आक्रमक झाले आहे. आमदार रोहित पवार यांनी या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी व्हावी, संबंधित कंपन्या आणि जबाबदार अधिकाऱ्यांवर तात्काळ गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी केली आहे.

## पुण्यातून आलेल्या तिघांकडून युवकावर गोळीबार, दैव बलवत्तर म्हणून वाचला

सोलापूर (दै. संध्या)



■ बार्शी हादरली, पोलीस घटनास्थळी

सोलापूर जिल्ह्यातील बार्शी तालुक्यात एक धक्कादायक घटना घडली आहे. पुण्यातून आलेल्या तीन अनोळखी युवकांनी बाळासाहेब उकिरडे याला जबर मारहाण केली. त्यानंतर त्याच्या दिशेने गोळीबार केला. मात्र निशाणा चुकल्याने बाळासाहेब उकिरडे यांचा जीव वाचला. या मारहाणीत बाळासाहेब उकिरडे गंभीर जखमी झाले आहेत. बार्शी तालुक्यातील कुसळंब गावात हा धक्कादायक प्रकार घडला आहे. पुण्यातून आलेल्या तिघांकडून बाळासाहेब उकिरडे यांना मारहाण करण्यात आली. त्यानंतर त्याचे दिशे गोळीबार देखील केला, मात्र, निशाणा चुकल्याने बाळासाहेब उकिरडे यांचा जीव वाचला. मात्र त्यांनी जबर मारहाण झाली आहे. त्यामध्ये ते जखमी झाले आहेत. या घटनेनंतर बार्शीत खळबळ उडाली असून जखमी युवकावर उपचार सुरु असून, हा हल्ला केलेले तिन्ही आरोपी फरार झाले आहेत. त्यांच्या शोधासाठी बार्शी तालुका पोलिसांनी तात्काळ पथक रवाना केले असून, आरोपीचा शोध सध्या घेतला जात आहे.

# नागपूर-सुरत महामार्गावर डिझेल टँकरला भीषण आग

**टँकर जळून खाक, दुरवरून दिसले धुराचे लोट; अक्कलपाडा धरणाजवळील घटना**

नंदुरबार (दै. संध्या)



नागपूर-सुरत राष्ट्रीय महामार्गावर आज दुपारच्या सुमारास एका डिझेल टँकरला भीषण आग लागल्याची थरारक घटना घडली. अक्कलपाडा धरणाजवळ इंधनाने भरलेल्या या टँकरने अचानक पेट घेतल्याने परिसरात मोठी खळबळ उडाली. आगीचे रौद्र रूप आणि डिझेलचा स्फोट होण्याचा धोका लक्षात घेता पोलिसांनी तातडीने महामार्गावरील दोन्ही बाजूंची वाहतूक थांबवून परिसर सील केला आहे. मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, हा टँकर डिझेल घेऊन जात असताना अक्कलपाडा धरणाजवळ पोहोचला आणि अचानक त्यातून ज्वाळा निघू लागल्या. टँकरमध्ये ज्वालाग्राही इंधन असल्याने काही मिनिटांतच आगीने संपूर्ण टँकरला वेढले. आगीच्या ज्वाळा आणि काळ्याकुट्ट धुराचे लोट कित्येक किलोमीटर अंतरावरून दिसत होते, ज्यामुळे स्थानिक नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले.

या भीषण अपघातात सुदैवाने कोणतीही जीवितहानी झालेली नाही. आगीची तीव्रता वाढण्यापूर्वीच चालक आणि वाहक प्रसंगावधान राखून टँकरमधून बाहेर पडल्याने त्यांचे प्राण वाचले आहेत. मात्र, आगीत लाखो रुपयांचा डिझेलसाठा आणि संपूर्ण टँकर जळून खाक झाला आहे. घटनेची माहिती मिळताच स्थानिक पोलीस प्रशासन आणि अग्निशामक दलाचे बंब घटनास्थळी दाखल झाले. डिझेलची आग असल्याने ती विझवण्यासाठी विशेष रसायनांचा आणि पाण्याचा मारा करण्यात येत आहे. आग इतरत्र पसरू नये यासाठी अग्निशामक दलाचे जवान शर्थीचे प्रयत्न करत आहेत. खबरदारीचा उपाय म्हणून महामार्गावरील विद्युत पुरवठाही काही काळ खंडित करण्यात आला होता.

# सुप्रीम कोर्टाचा वाल्मिक कराडला दणका

*जामीन अर्ज फेटाळला, ट्रायल रखडल्यास वर्षभरानंतरच पुन्हा संधी*

मुंबई (दै. संध्या)



बीडमधील बहुचर्चित संतोष देशमुख हत्या प्रकरणात आरोपी वाल्मिक कराड याला मोठा धक्का बसला आहे. सर्वोच्च न्यायालयाने त्याचा जामीन अर्ज फेटाळत सुनावणीस नकार दिला. न्यायमूर्ती एम. एम. सुंदरेश यांच्या समोर आज या अर्जावर सुनावणी झाली. यापूर्वी 19 फेब्रुवारी रोजी या प्रकरणाची प्राथमिक सुनावणी पार पडली होती. आजच्या निर्णयामुळे कराडला तातडीचा दिलासा मिळाला नाही. मात्र, खटल्याची सुनावणी पुढे सरकत नसेल तर वर्षभरानंतर पुन्हा जामिनासाठी सर्वोच्च न्यायालयात अर्ज करण्याची त्याला संधी राहणार आहे. याआधी औरंगाबाद खंडपीठ तसेच बीड जिल्हा न्यायालयानेही वाल्मिक कराड याचे जामीन अर्ज आणि दोषमुक्तीचे अर्ज फेटाळले होते. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयातील हा निर्णय त्याच्यासाठी आणखी एक मोठा अडथळा ठरला आहे. आजच्या सुनावणीपूर्वी संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख यांनी कॅव्हेट दाखल करून आपली बाजू ऐकून घ्यावी, अशी मागणी केली होती. दीड वर्षांपासून आमचे कुटुंब न्यायाच्या प्रतीक्षेत आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. दरम्यान, या प्रकरणातील फरार आरोपी कृष्णा आंधळे याच्याबाबतही नवी माहिती समोर आली आहे. तो आतापर्यंत तीन वेळा आपल्या गावी येऊन गेल्याचा दावा धनंजय देशमुख यांनी केला आहे. ही माहिती त्यांनी सीआयडीला दिल्याचे सांगितले. कृष्णा आंधळे मोबाईलचा वापर करत नसल्यामुळे त्याचा माग काढणे कठीण जात असल्याचेही त्यांनी नमूद केले.

# संपादकीय

## डोनाल्ड ट्रम्प यांना पुरुष खेळाडूंचे कौतुक, महिला खेळाडूंचा मात्र तिरस्कार

मिलानो कॉर्टिना येथे विंटर ऑलिम्पिक नुकतेच पार पडले. त्यात अमेरिकन संघाला तब्बल ३३ पदके मिळाली, यात २१ पदके महिला खेळाडूंनी मिळवली. १२ सुवर्णपदकांपैकी ८ महिलांना मिळाली. अमेरिकेच्या या घवघवीत यशानंतर ट्रम्प यांनी अमेरिकन आइस हॉकीच्या पुरुषांच्या विजेत्या संघाला काही तासांत फोन करून अभिनंदन केले. या संभाषणादरम्यान ते खोचकपणे म्हणाले, 'आता महिला संघालादेखील पाचारण करावे लागेल व्हाइट हाऊसच्या पार्टीसाठी, अन्यथा मला इम्पीच करतील.' - यावर लॉकररूममध्ये एकच हशा पिकला. तिथले विजेते पुरुष खेळाडूही या हलक्या विनोदावर हसले, कारण तो देशाच्या प्रमुख नेत्याने केलेला विनोद होता. यंदाच्या ऑलिम्पिकच्या देदीप्यमान यशात स्त्रियांचा नुसता वाटा नसून, संपूर्ण यशाची पायाभरणी त्यांची. मानवीय क्षमतांची अतिउच्च स्तरावर होणारी स्पर्धा असलेल्या ऑलिम्पिकमध्ये अमेरिकन महिला संघाने हॉकीचा सामना ७-० असा जिंकला. ज्या देशाचे नाव त्यांनी मोठे केले, त्या देशाच्या नेतृत्वाने मात्र त्यांच्या यशाची खिल्ली उडवली, उत्तरादाखल महिला संघाने व्हाइट हाऊसचे निमंत्रण नाकारले. देशात सुरू असलेली स्थलांतरितांची गळचेपी, एपस्टीन फाइल्सचा गदारोळ, अशा पार्श्वभूमीवर अमेरिकन खेळाडू इटलीला पोहोचले, तिथे उपराष्ट्रपती व्हॅन्स यांना धिक्कारण्यात आलेले असताना, देशासाठी जीव तोडून खेळणे अजिबात सोपे नव्हते. तरीही, खेळाडूंनी, विशेषतः महिलांनी, अमेरिकेसाठी पदकांची रास लावली, देशाचा मान राखला, त्यांना घरचा आहेर मिळाला तो हा असा! खेळाडूंनी खेळासाठी खेळावे, इतर राजकीय गोष्टीत पडू नये, असे अनाहूत सल्लेदेखील पुष्कळ मिळाले, तरी अनेक खेळाडूंनी स्वतःची मते निर्भीडपणे मांडली. ख्रिस लिलीस याने खंत व्यक्त केली, देशात सुरू असलेल्या प्रकाराबाबत. हंटर हेस याने देशाचे ऑलिम्पिकमध्ये नेतृत्व करतेवेळी मनात संभ्रम असल्याचे बोलून दाखवले. फिगर स्केटर आम्बर ग्लेन हिने LGBTQ घटकांवर अमेरिकेत सुरू झालेल्या अत्याचारांवर भाष्य केले. मिकेला शिफरीन हिने नेल्सन मंडेला यांचे शांतता, समभाव याबद्दलचे विचार मांडले. फिगर स्केटर आलीस लिऊ हिचे सहज वावरणे, जिंकल्यावर मनमुराद आनंद व्यक्त करणे, तिचे वडील चायनीज वंशाचे असणे, या सगळ्याच बाबत सध्याचे सरकार नाराज झाले आहे. ऑलिम्पिक माणसातील उच्चतम गुणांची स्पर्धा असते. जिथे देशप्रेम आले, देशाभिमानासाठी पराकोटीचे झटणे आले, तिथे त्या देशातील सद्यःस्थितीबाबत मते खेळाडूंना निश्चित असणार. जिंकल्यावर ज्या देशाचा झेंडा फडवणार, त्याबाबत अभिमान तर वाटायला हवा! अशाअर्थी ऑलिम्पिक सदासर्वकाळ राजकीय होते, आहे आणि राहणार. अमेरिका म्हणजे उदात्त, स्वतंत्र, भेदांपलीकडे, माणसांतील सर्वश्रेष्ठत्व साजरा करणारा मुक्त देश, अशी अनेक वर्षे असलेली महती. अभिमानाने अमेरिकन झेंडा आंतरराष्ट्रीय स्तरावर मिरवणे सवयीचे असलेल्या खेळाडूंना गेली काही वर्षे खरोखर कसोटीची ठरत आहेत. निवृत्त खेळाडू मेगन रपिनो, २०२० च्या एका मुलाखती दरम्यान म्हणाली, 'देशाभिमान म्हणजे तरी काय, तर सतत स्वतःला देशासाठी उत्तम सिद्ध करत राहणे.' खेळाडू हेच तर करत असतात, म्हणूनच सर्व खेळाडूंना भेदांपलीकडे कौतुक, मान सन्मान मिळायला हवा; पण हे सध्याचे राष्ट्राध्यक्षडोनाल्ड ट्रम्प यांच्या गावीही नाही!

## संस्कृत सुभाषित

अनायुष्यं दिवा स्वप्नं तथाभ्युदितशायिता ॥
अनुशासन पर्व, अध्याय १०४, श्लोक १३९
अर्थ –दिवसा झोप घेणे आणि सूर्योदयानंतर निजून राहणे हे आयुष्याला हानिकारक आहे.

## गुरु वचन

### वास्तव्याची जाण

एका राज्याचा राजा दररोज सकाळी फेरफटका मारण्यासाठी जात होता. त्याला रस्त्यात जी व्यक्ती पहिल्यांदा दिसेल त्याची तो प्रत्येक इच्छा पूर्ण करायचा.

असेच एका दिवशी निघाला असता त्याला एक ब्राह्मण भेटला. राजाने त्याला विचारले की, ब्राह्मण देवता मी आपली काय मदत करु. ब्राह्मण लाजून म्हणाला, महाराज आपण जे उचित समजाल त्यावर राजा म्हणाला, आपण सांगा काय पाहिजे. ब्राह्मणाच्या मनात लोभ आला. तो राजला म्हणाला, महाराज आपण फिरून या तोपर्यंत मी विचार करतो की, मला काय पाहिजे. ब्राह्मणाचे म्हणणे ऐकून राजा फिरण्यासाठी गेला. नंतर ब्राह्मणाच्या मनात विचार आला की, अशी संधी पुन्हा–पुन्हा मिळत नाही. एकदाच असे काही तरी मागतो की, पुन्हा कधी काही मागण्याची गरज पडणार नाही. राजा फिरून आला व त्याने ब्राह्मणाला त्याची इच्छा विचारली. तेव्हा ब्राह्मणने राजाला पूर्ण राज्य मागीतले. राजानेही ताबडतोब यासाठी होकार दिला व ब्राह्मणाला म्हणाला, मी तर अनेक दिवसांपासून याची प्रतिक्षा करत होतो की या ओझ्यातून केव्हा मुक्त होईल. आपण येथेच थांबा मी राज्याचा कारभार आपल्याकडे सोपवण्याची व्यवस्था करतो. असे म्हणून राजा महालात जातो. राजाचे म्हणणे ऐकून ब्राह्मण चिंतेत पडतो. त्याला वाटत नव्हते की, राजा एवढ्या सोप्या पद्धतीने राज्य सोपवून देईल. ब्राह्मणाच्या मनात ईश्वरीय भावना जागृत झाली आणि त्याने विचार केला की, वास्तविकतेमध्ये वैरागी तर राजा आहे. मी तर फक्त ढोंग करतो. हा तर मोहापासून दूर आहे. ब्राह्मणाला वास्तव्याची जाण झाली आणि तो तिथून निघून गेला. त्याला आपल्या मोहावर पश्चाताप झाला.

## उपदेशकथा

### व्यवहारबुद्धी

एका गावामध्ये दृढ मैत्री असलेले चार ब्राह्मण पूत्र राहात होते. त्यापैकी तिघांनी शास्त्राची खूप घोकंपट्टी केली. पत्रव्यवहार, बुद्धी त्यांना अजिबात नव्हती. चौथा बुद्धिमान होता. त्याने कुठल्याच शास्त्राचा अभ्यास नुसत्या घोकंपट्टीने केला नव्हता. ते चौघे एकदा द्रव्य मिळविण्याच्या इच्छेने राजाकडे निघाले. वाटेत एका अरण्यात त्यांना सिंहाची हाडे दिसली. त्यापैकी एकाने हाडे गोळा करून सिंहाचा सांगाडा विद्येच्या सामर्थ्याने बनविला. दुसऱ्याने आपल्या विद्येने त्यात रक्त, मांस, कातडे घातले व तिसरा त्यात जीव ओतणार तोच बुद्धिमान असा चौथा म्हणाला, अरे थांब, हा सिंह जिवंत झाला तर आपणा सर्वांना खाऊन टाकील. त्यावर तिसरा म्हणाला, मूर्खा माझी विद्या मी अशी फुकट जाऊ देणार नाही. बुद्धिमान म्हणाला, मग थांब मी झाडावर चढतो मग त्यात जीव ओत. त्याप्रमाणे तो झाडावर चढल्याबरोबर तिसऱ्याने त्यात जीव ओतला. जिवंत झाल्याबरोबर सिंहाने डरकाळी फोडून तिघांनाही ठार केले. सिंह निघून गेल्यानंतर चौथा सावकाशपणे झाडावरून खाली उतरला.

कथा उपदेश : शास्त्राचा वापर व्यवहारबुद्धीने करावा.

## पंचांग

| | |
|---|---|
| पंचांग | १९:४३:०८ |
| २७ फेब्रुवारी २०२५ | करण:वणिज ११:३२:१६ |
| शुक्रवार | करण:विष्टि २२:३३:०४ |
| विक्रम संवत्– २०८२ | सूर्य:कुम्भ |
| फाल्गुन शके | चन्द्र:मिथुन |
| संवत्– १९४७ | हिजरी सन् – १४४६ |
| संवत्सर – विश्वावसूनाम | मुस्लिम मास – रमजान |
| अयन– उत्तरायणारंभ | तारीख – ९ |
| मास– फाल्गुन | विशेष |
| ऋतु– सौर शिशिर | आमलकी एकादशी |
| शुक्ल पक्ष | मराठी भाषा गौरव दिन |
| तिथि:एकादशी | गुलाबपुरी महाराज |
| २२:३३:०४ | पुण्यतिथी – नेरपिंपगळाई |
| नक्षत्र:आर्द्रा १०:४८:३५ | (अमरावती) |
| योग:आयुष्मान | |

## दै.'संध्या' धमाल सूडोकु क्र. ८७२

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 8 | | 7 | 2 | | 3 | 5 | | 1 |
| | 6 | 9 | 7 | | | 8 | | |
| | 3 | 5 | | 4 | | | 9 | |
| 4 | | | | | 7 | | | 9 |
| | | 8 | | | | 4 | | |
| 3 | | | 9 | | | | | 6 |
| | 9 | | | 2 | | 3 | 5 | |
| | | 3 | | | 9 | 6 | 1 | |
| 5 | | 1 | 3 | | 6 | 9 | | 4 |

### : सूडोकु :

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३–३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

### सूडोकु क्र. ८७१ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2 | 5 | 9 | 4 | 8 | 1 | 7 | 6 | 3 |
| 3 | 6 | 1 | 7 | 5 | 9 | 2 | 8 | 4 |
| 4 | 7 | 8 | 3 | 6 | 2 | 5 | 1 | 9 |
| 1 | 3 | 7 | 8 | 2 | 4 | 9 | 5 | 6 |
| 6 | 2 | 4 | 5 | 9 | 7 | 1 | 3 | 8 |
| 9 | 8 | 5 | 6 | 1 | 3 | 4 | 2 | 7 |
| 8 | 9 | 3 | 2 | 4 | 5 | 6 | 7 | 1 |
| 5 | 4 | 6 | 1 | 7 | 8 | 3 | 9 | 2 |
| 7 | 1 | 2 | 9 | 3 | 6 | 8 | 4 | 5 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १५६० – बर्विकचा तह – इंग्लंड व स्कॉटलंडने फ्रांसला स्कॉटलंडमधून घालवून देण्याचे ठरवले.
- १५९४ – हेन्री चौथा फ्रांसच्या राजेपदी.
- १७०० – न्यू ब्रिटन या पापुआ न्यू गिनीतील बेटाचा शोध लागला.
- १८०१ – वॉशिंग्टन डी. सी. अमेरिकन काँग्रेसच्या अखत्यारीत आले.
- १८४४ – डॉमिनिकन प्रजासत्ताकला हैती पासून स्वातंत्र्य.
- १८७९ – साखरेसम मानवनिर्मित गोड पदार्थ सॅकेरिनचा शोध.
- १९६७ – डॉमिनिकाला युनायटेड किंगडमपासून स्वातंत्र्य.
- १९८९ – व्हेनेझुएलामध्ये जनक्षोभ.
- १९९१ – कुवैतला इराकी सैन्यापासून मुक्ती.

### राष्ट्रीय

- २००२ – गुजरातच्या गोधरा रेल्वे स्थानकात साबरमती एक्सप्रेसला आग लावण्यात आली. ५८ हिंदू यात्रेकरू ठार. या घटनेचा प्रतिसाद म्हणून उसळलेल्या जातीय दंग्यांमध्ये १,००० हून अधिक व्यक्तिंनी प्राण गमावले.

### जन्म

- १८०७ – हेन्री वॅडवर्थ लाँगफेलो, इंग्लिश कवि यांचा जन्म.
- १९०२ – जॉन स्टाइनबेक, अमेरिकन लेखक यांचा जन्म.
- १९२८ – एरियेल शरोन, इस्राईलचे पंतप्रधान यांचा जन्म.

### निधन

- १९२१ – शोफील्ड हे, इंग्लिश क्रिकेटपटू याचे निधन.
- १९८२ – मलिका ए. सबीरोव्हा, रशियन डॉन्सरचे निधन.

## : SMS :

Is Duniya Me Bas 2 hi cheezen aisi he.. jiski duniya diwani he
1st-Tajmahal
&
2nd -Aap
...Ne Mujhe to Dekha Hi Hoga...

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | २८.८ | २१.८ |
| अहमदनगर | २९.३ | २१.२ |
| अकोला | ३२.८ | २५.१ |
| अमरावती | ३१.१ | २३.२ |
| बीड | ३१.९ | २४.६ |
| भंडारा | ३१.३ | २२.९ |
| बुलढाणा | २७ | १५.७ |
| चंद्रपूर | ३२.१ | २५.१ |
| चेन्नई | ३४.९ | २६.५ |
| नवी दिल्ली | २७.२ | १६.७ |
| धुळे | ३२ | २३ |
| गोंदिया | २९.६ | २३.१ |
| जळगाव | ३२ | २१.२ |
| कोल्हापूर | ३०.७ | २०.९ |
| लातूर | २९.४ | २३.२ |
| मुंबई | ३२.८ | २५ |
| नागपूर | ३०.६ | २२.८ |
| नांदेड | ३१.१ | २५.६ |
| नंदूरबार | ३०.३ | २२.६ |
| नाशिक | ३० | २०.५ |
| पुणे | २९.५ | १८.९ |
| पंढरपूर | ३१.५ | २३.३ |
| सातारा | ३१.२ | १८.६ |
| सांगली | ३१.६ | २२ |
| सोलापूर | ३१.७ | २४.२ |
| वर्धा | ३२.१ | २३ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** शुभ रंग: गुलाबी, अनुकूल दिशा: पूर्व आपल्या योजनेनूसार, कार्य पूर्ण होतील. आपल्या प्रतिष्ठेत वाढ होण्याचे योग आहेत.

**तुळ :** शुभ रंग: पिवळा, अनुकूल दिशा: उत्तर सौजन्यपूर्ण वर्तवणूक आपल्याला मनमुटाव पासून वाचविल.

**वृषभ :** शुभ रंग: हिरवा, अनुकूल दिशा: उत्तर कामात वाढ झाल्या कारणाने संबंध व ओळखी वाढतील.

**वृश्चिक :** शुभ रंग: गुलाबी, अनुकूल दिशा: पूर्व कामात यश मिळेल. मित्रांचे सहकार्य आपल्या कामात फायदेशीर ठरेल.

**मिथुन :** शुभ रंग: निळा, अनुकूल दिशा: दक्षिण वाद–विवाद आणि भांडणांमुळे मानसिक ताण वाढेल. उद्योगधंद्यावर लक्ष द्या.

**धनु :** शुभ रंग: हिरवा, अनुकूल दिशा: दक्षिण प्रयत्न आणि दूरदर्शीपणाने सहकार्य आणि समर्थन मिळेल. नवीन संबंध लाभदायक ठरतील.

**कर्क :** शुभ रंग: काळा, अनुकूल दिशा: पूर्व अशा प्रकारे कार्य घडेल, जेणेकरुण स्वत:च्या आणि समाजाच्या कामात गती येईल.

**मकर :** शुभ रंग: निळा, अनुकूल दिशा: दक्षिण एखाद्या सृजनात्मक उपलब्धीमुळे आपल्या यशात वाढ होईल. स्थायी संपत्ती वाढविण्याचे योग बनतील.


**सिंह :** शुभ रंग: लाल, अनुकूल दिशा: उत्तर आपल्या बुद्धिमत्तेने परिस्थिती सुधारणा आणू शकाल. नातेवाईकांशी चांगले संबंध राहतील.

**कुंभ :** शुभ रंग: केसरी, अनुकूल दिशा: उत्तर मुलांची उज्वल भविष्याच्या दिशेने वाटचाल होईल. मानसिक स्थिरतेमुळे संकल्पात ठाम असाल.

**कन्या :** शुभ रंग: पांढरा, अनुकूल दिशा: दक्षिण शत्रू वरील विजयाने आपल्याला यश तसेच सन्मान मिळेल.

**मीन :** शुभ रंग: जांभळा, अनुकूल दिशा: पूर्व मदतीची अपेक्षा न करता, कामे स्वत: करा. कामाच्या यशस्वीतेबद्दल शंका राहिल.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. ८७२



### आडवे शब्द

१. नमुना, मासला
३. वार्ताहर
७. चमकणारी बंगाली मिठाई?
१०. मिठी
१०अ. आस्था, प्रेम, माया
१२. मिठाला न जगणारा
१४. अंदाज करणे
१७. घाण
१८. 'आ'काराचे चिन्ह
१९. मांडणी, सजावट
२१. पायापासून डोक्यापर्यंत
२३. ज्वारी–बाजरीचा पदार्थ
२५. वर्तमानपत्रातीक कप्पा
२७. शूर
२९. काचेला पडलेली चीर
३०. उलटसुलट आगबोटच!
३२. सैन्याचा मालपुरवठा
३४. प्रामाणिख, सोज्वळ
३६. शत्रूच्या नाशाचे मंत्रतंत्र
३८. चामखीळ
४०. भरभराट
४१. डोंगरा किल्ला
४२. वाळा
४३. घटस्फोट
४४. मगज
४५. प्रार्थना
४६. मंत्रीमंडळ
४८. गंध उगाळण्याचे जोडसाधन
५०. आजूबाजूला
५०अ. तोरा, माज
५१. जाणीव
५२. अब्रूदार
५५. महात्मा गांधीजींचे नाव
५७. दृष्टीभेट
६१. सदोदित
६३. जुनीच्या विरुद्ध
६५. राखण करणारा
६७. चटकन, त्वरित
६८. सज्जनगडचे संत
७१. गंध
७२. अर्धांगवायू
७३. गव्हाचे पीठ
७४. मालाची विक्री
७६. सडक
७७. बाळभाषते देव
७८. कणीदार
७९. फळांचे पेय

### उभे शब्द

१. डोंगा
२. अननुभवी
३. थापा
४. माशाची रास
५. किंमत
६. दागदागिने
७. ओरखडा
८. माझे
९. चार आठवडे
१०. पुष्परस
११. सापाची एक जात
१३. ही पिऊन लगेच गोरेपणा थोडाच मिळणार!
१५. कोंबड्याचे आवरणे
१६. कारणाशिवाय
१८. उसाच्या रसाचा घट्ट रांधा
२०. नाला, खंदक
२२. हेतू, कारण
२३. चारी ठाव जेवणातील दोन प्रमुख पदार्थ
२४. पादत्राण
२६. नासाडी, विध्वंस
२८. चांदी
३०. जून, निबर
३१. हिशोब
३३. क्षुल्लक किंमतीचे नाणे
३५. पदरी सैनिक बाळगणारा
३६. झोपेचे खोबरे!
३७. हिचे चोचले पुरवणे म्हणजे अनारोग्याला आमंत्रण
३९. एकमेकांसमोर
४३. सावरीचा असल्यास सगळ्यात मऊ
४४. तारणपत्र
४५. कमिशन, दलाली
४६. श्रीमंत
४६अ. लोखंड घसण्याचे हत्यार
४७. राख
४८. शिक्षा
४९. झोपडी
५३. दानशूर
५४. मातीचा कण
५६. पोते शिवण्याची सुई
५८. रात्री सुगंध पसरवणारी वनस्पती
५९. खाण्याची तंबाखू
६०. पातळसर
६१. पंजाबमधील एक नदी
६२. समशेर
६३. अपुऱ्या नाकाची
६५. अफूचे बीज
६६. खटला, हक्क (सांगणे)
६९. दहावी रास
७०. पुरावा असल्यास पुरेसा भक्कम
७३. खण पण कापड नव्हे
७५. पंख, दुसऱ्याचा

### जम्बो शब्दकोडे क्र. ८७१ चे उत्तर

आडवे उत्तर : १.कावराबावरा ५.असाधारण ८.पर्ण ९.खट १०.जगन्नाथ १२.डम १३.वर १४.भाषण १५.कोसरा १६.कयास १८.वहिवाट २०.दाखला २२.डास २४.मानिनी २५.रटरट २४.दम ३०.नीट ३२.वर्तमानपत्र ३३.चरवी ३४.मनगट ३६.कारभार ३८.कर्ज ४०.पडाव ४१.रस ४२.खादी ४३.भोजनावळ ४५.डाका ४७.नाट ५०.नकलाकार ५२.जमा ५४.वारकरी ५६.पनीर ५८.जवळजवळ ६०.मस्त ६१.सनई ६३.घर ६४.सामना ६६.पुरता ६७.मरवा ६८.सागर ७०.रम्य ७१.राक्षस ७२.गवगवा ७३.दाम ७४.खास ७५.सोम ७६.लगत ७८.धरणीकंप ८०.साय ८१.अंतर ८२.खानदान ८३.सरडा

उभे उत्तर : १.कारभारीण २.राखणदार ३.बाट ४.राजस ५.अथक ६.धाडस ७.रम ८.परवा ११.गारडा १३.वहिनी १५.कोलार १७.यात्रा १८.वनिता १९.टवटवीत २१.खटपट २३.सदमा २६.टवका २८.मनकवडा २९.पत्रकार ३०.नीर ३१.जनकजननी ३३.चरखा ३५.गर्जना ३७.रसना ३९.मळकट ४०.परका ४४.वन ४६.काजळ ४८.टवाळ ४९.कोरी ५१.रजई ५३.माजघर ५५.कलम ५६.पळपुटा ५७.रमताराम ५९.वर ६१.सर ६२.नवागत ६४.साम्य ६५.नापास ६७.मसलत ६८.सागवान ६९.गवा ७०.रमणी ७३.दार ७४.खापर ७५.सोय ७७.गर ७८.धन ७९.कंस


RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे...



## रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) पक्षाची बैठक संपन्न

पुणे (दैनिक संध्या) : नुकत्याच पार पडलेल्या महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) पक्षाच्या पुणे शहरातील प्रमुख पदाधिकाऱ्यांची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. ही बैठक शहराध्यक्ष संजय सोनवणे आणि पक्षाचे राज्य सचिव बाळासाहेब जानराव यांच्या नेतृत्वाखाली पुणे महानगरपालिकेच्या सभागृहात आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस उपमहापौर परशुराम वाडेकर, नगरसेविका निशा मानवतकर, माजी नगरसेवक, संतोष आरडे, सुधीर वाघमोडे, रेणुका चलवादी, जयदेव रंधवे, हुलगेश चलवादी, महिपाल वाघमारे, शाम सदाफुले, टी. आर. तांबोळी, राजेंद्र चुव्हाण, नीलेश रोकडे, सुधीर जगताप, ॲड. भाऊसाहेब गोफणे, लिंबा कावरे, मनीषा मोहिते, कुणाल चावरे, विक्रांत कानडे आदी प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. बैठकीच्या प्रारंभी नवनिर्वाचित सदस्यांचे अभिनंदन करण्यात आले. पक्षाचे तीन उमेदवार निवडणूकीत यश संपादन करू शकले नाहीत त्यातील दोन उमेदवारांच तर अवघ्या दोनशे पेक्षा कमी मतांनी पराभव झाला, या पराभवाची कारण मीमांसा यावेळी करण्यात आली. तसेच या बैठकीत शहरातील संघटनात्मक बळकटीकरण, आगामी निवडणुकांची तयारी तसेच समाजसेवेशी संबंधित विविध प्रकल्पांवर सखोल चर्चा करण्यात आली. स्थानिक विकासासाठी नव्या विकासात्मक योजनांची आखणी, शहरात पक्षाची असलेली भक्कम ताकद लक्षात घेऊन विकासकामांचा आराखडा तयार करणे, तसेच पंचवार्षिक कार्यक्रम निश्चित करून त्याची प्रभावी अंमलबजावणी करण्याचा आणि एसआरए चे प्रश्न प्राधान्यक्रमाने सोडविण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. सर्व जाती-धर्मातील नागरिकांना एकत्र आणत सामाजिक ऐक्य वाढवणे आणि पक्ष संघटना अधिक मजबूत करणे हेच आपले प्रमुख ध्येय असल्याची भावना उपस्थित पदाधिकाऱ्यांनी यावेळी व्यक्त केली. तसेच निवडणूकीत पक्षाच्या उमेदवारांचा प्रचार न करणाऱ्या पदाधिकाऱ्यांवर योग्य कारवाई करण्याचे सर्वाधिकार अध्यक्षांना देण्याचा ठराव एकमताने मंजूर करण्यात आला.

## किरीट सोमैयांच्या 'अतिरेकी' आरोपांवर खुलासा करा; काँग्रेसची प्रशासनाकडे मागणी

पुणे (दैनिक संध्या) : भाजपचे माजी खासदार किरीट सोमैया यांनी मालेगाव (जि. नाशिक) येथे 'बांगलादेशी अतिरेकी' संदर्भात केलेल्या वक्तव्यांवरून राजकीय वाद निर्माण झाला असून, या प्रकरणी नाशिक जिल्हा पोलीस प्रशासन व जिल्हाधिकारी यांनी तातडीने खुलासा करावा, अशी मागणी काँग्रेसने केली आहे. प्रदेश काँग्रेसचे वरिष्ठ प्रवक्ते गोपाळदादा तिवारी यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले की, सोमैया यांनी मालेगावमध्ये माध्यमांसमोर अतिरेक्यांबाबत संख्येसह गंभीर आरोप केले असून हा प्रकार अत्यंत संवेदनशील आहे. त्यांनी सुमारे ४,६०० बांगलादेशी अतिरेकी घुसल्याचा दावा केल्याचेही समोर आले आहे. त्यामुळे या वक्तव्यांची सत्यता तपासून प्रशासनाने अधिकृत भूमिका स्पष्ट करावी, असे त्यांनी म्हटले. तिवारी यांनी प्रश्न उपस्थित केला की, जर सोमैया यांच्याकडे इतकी गंभीर माहिती होती, तर ती संबंधित पोलीस यंत्रणा आणि प्रशासनाला आधी का देण्यात आली नाही? पोलीस प्रशासन या बाबत अनभिज्ञ कसे राहिले, याचाही खुलासा व्हायला हवा, असे ते म्हणाले. या प्रकरणात मालेगाव व नाशिक जिल्हा प्रशासनाने सखोल चौकशी करून वस्तुस्थिती जनतेसमोर मांडावी, तसेच गरज भासल्यास सोमैया यांना चौकशीसाठी ताब्यात घेऊन त्यांच्या आरोपांची पडताळणी करावी, अशी मागणी काँग्रेसने केली आहे. काँग्रेसकडून असा आरोप करण्यात आला की, अशा प्रकारच्या वक्तव्यांमुळे समाजात भीती, संशय आणि तणावाचे वातावरण निर्माण होऊ शकते. त्यामुळे सामाजिक सलोखा बिघडविणाऱ्या कोणत्याही कृतीवर प्रशासनाने कायदेशीर कारवाई करावी, असेही तिवारी यांनी नमूद केले.

## पिंपरी – चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात कलम 37 (1) व (3) आदेश जारी

पुणे (दैनिक संध्या) : पिंपरी – चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात शांतता व सुव्यवस्था राखणेकामी पोलीस सह आयुक्त डॉ. शशिकांत महावरकर, यांनी प्राप्त अधिकाराचा वापर करुन व महाराष्ट्र पोलीस अधिनियम सन 1951 चे कलम 37 (1) व (3) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा वापर करुन पिंपरी – चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात 4 मार्च 2026 रोजी 00.01 पासून ते 17 मार्च 2026 रोजी 24 वाजेपर्यंत खाली नमूद केलेली कृत्य करण्यास या आदेशान्वये मनाई करीत आहे. कोणताही दाहक पदार्थ अथवा स्फोटक पदार्थ द्रव्य बरोबर नेणे. दगड अथवा शस्त्रे किवा अस्खे सोडावयाची अस्त्रे किंवा फेकावयाची हत्यारे अगर साधने बरोबर नेणे. शस्त्रे, सोटे, भाले, तलवारी, दंड, काठ्या, बंदुका व शारिरीक इजा करण्यासाठी वापरात येईल अशी कोणतीही वस्तू बरोबर नेणे. कोणत्याही इसमाचे चित्राचे प्रतिकात्मक प्रेताचे किंवा पुढाऱ्यांच्या चित्राचे प्रतिमेचे प्रदर्शन व दहन करणे.

# 'फुला'तून उलगडणार मुरळीची संघर्षमय कथा!!

पुणे (दै. संध्या) :

अस्सल मराठी मातीतल्या वाघ्या-मुरळीची संघर्षमय कथा आगामी 'फुला' चित्रपटातून मोठ्या पडद्यावर पहायला मिळणार आहे. नुकतेच या चित्रपटाचं पोस्टर खंडेरायाच्या साक्षीने जेजुरी येथे वाघ्या-मुरळी परिषदेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. मार्तंड साठे यांच्या हस्ते लाँच करण्यात आले याप्रसंगी चित्रपटाचे निर्माते , दिग्दर्शक, कलाकार आणि तंत्रज्ञ मंडळी उपस्थितीत होती. हा चित्रपट येत्या १७ एप्रिलला संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होणार आहे पै. अजित शिवाजी जाधव यांनी "फुला" या चित्रपटाची निर्मिती केली असून शिवशर्विल मूव्ही आणि बोधी सिनेमा यांनी या चित्रपटाची प्रस्तुती केली आहे.अभिषेक जावीर दिग्दर्शित या चित्रपटाची पटकथा रवीकिरण जावीर यांनी लिहिली आहे. सांगली जिल्ह्यातील आटपाडी गावात जिल्हा परिषदेच्या शाळेत शिक्षक असलेल्या समाधान ऐवळे यांनी या चित्रपटासाठी संगीत दिग्दर्शन केले आहे. अमर देवकर यांनी सर्जनशीर दिग्दर्शन, रवीकिरण जावीर, समाधान ऐवळे




यांनी गीतलेखन, प्रताप जोशी यांनी छायांकन, अतुल लोखंडे यांनी कला दिग्दर्शन, राहुल प्रजापती यांनी संकलनाची जबाबदारी निभावली आहे. वेशभूषा कोमल जावीर, अक्षता पाटील तर रंगभूषा समाधान भोरे यांची आहे. गायिका वैशाली सामंत, वैशाली माडे, गायक रोहित राऊत, रवींद्र खोमणे, वैशाली इंगवले, वैष्णवी अदोडे, आकाश नवगिरे यांनी चित्रपटातील गाण्यांना आवाज दिला आहे. प्रियांतिका, आरोही गडदे, मंजुषा खेत्री, संतोष शिंदे, देवा गाडेकर, रविकिरण जावीर, सनी कदम, छाया आदट, शरद लांडगे या नव्या दमाच्या कलाकारांचा उत्तम अभिनय आपल्याला या चित्रपटात पहायला मिळणार आहे. चित्रपटाचे चित्रीकरण आणि टीम ही आटपाडी गावातील असून त्यांचा हा पहिलाच चित्रपट आहे. "फुला" ही एका मुरळीच्या पोटी जन्मलेल्या निरागस मुलीची संघर्षमय कथा आहे. तमाशा फड, जागरण गोंधळ या पारंपरिक सांस्कृतिक पटावर आधारित ही गोष्ट महाराष्ट्राच्या लोकपरंपरेतून आकार घेते. चित्रपटाविषयी दिग्दर्शक अभिषेक जावीर म्हणाले, "फुला" हा चित्रपट म्हणजे केवळ एका मुलीची शोकांतिका नाही, तर तो महाराष्ट्राच्या पारंपरिक लोककलांमध्ये अडकलेल्या स्त्री कलाकारांच्या अस्तित्वाचा जीवंत दस्तावेज आहे. मुरळी परंपरेत अनेक स्त्रियांना कधीही त्यांची स्वप्नं, हक्क, प्रेम, सन्मानाने जगण्याची संधी मिळत नाही.

## औंध-बोपोडी प्रभागातील महत्त्वाच्या प्रकल्पांना आयुक्तांची भेट

पुणे (दै. संध्या) :

■ कामे तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश

पुणे महानगरपालिकाचे आयुक्त नवल किशोर राम यांनी उपमहापौर परशुराम वाडेकर यांच्या विनंतीवरून आज औंध–बोपोडी प्रभागातील विविध रखडलेल्या विकासकामांची प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी सर्व प्रकल्प तातडीने पूर्ण करण्याचे स्पष्ट निर्देश त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

या पाहणी दौऱ्यात उपमहापौर परशुराम वाडेकर यांच्यासह स्थानिक नगरसेवक सनी निम्हण, नगरसेविका सपना छाजेड, नगरसेविका भक्ती गायकवाड, तसेच आरपीआयचे शिवाजीनगर मतदारसंघ अध्यक्ष अविनाश कदम, ज्ञानेश्वर जाविर व इतर पदाधिकारी व कार्यकर्ते




मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या भेटीबाबत माहिती देताना उपमहापौर परशुराम वाडेकर म्हणाले की, प्रभागातील महत्त्वाच्या विकासकामांसाठी आयुक्तांकडे मागील अनेक दिवसांपासून वेळ मागण्यात येत होता. मात्र काल आयुक्तांनी स्वतःहून प्रभागाला भेट देण्याची तयारी दर्शवत, नागरिकांच्या प्रश्नांची प्रत्यक्ष पाहणी करण्याची इच्छा व्यक्त केली. त्यानुसार आज सकाळी ११ वाजता आयुक्तांनी प्रभागातील महत्त्वाच्या प्रकल्पांना भेट दिली.

या दौऱ्यात तथागत भगवान गौतम बुद्ध विपश्यना विहार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर अभ्यासिका व ग्रंथालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर हॉकी स्टेडियम (चिखलवाडी) तसेच हरीश ब्रिज शेजारील मोकळे पटांगण या ठिकाणांची पाहणी करण्यात आली. यावेळी महापालिकेच्या सर्व संबंधित खात्यांचे खातेप्रमुख उपस्थित होते.

आयुक्त नवल किशोर राम यांनी विपश्यना विहार व हॉकी स्टेडियमच्या प्रलंबित कामांचा आढावा घेत, ही कामे कोणताही विलंब न लावता तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश जागेवरच दिले. तसेच हरीश ब्रिजलगत असलेल्या मोकळ्या पटांगणाच्या ठिकाणी नागरिकांसाठी सुसज्ज उद्यान (गार्डन) विकसित करण्याच्या सूचनाही त्यांनी केल्या. या प्रत्यक्ष पाहणीमुळे औंध–बोपोडी प्रभागातील रखडलेले व महत्त्वाचे प्रकल्प आता वेगाने मार्गी लागतील, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे. आयुक्तांच्या या सकारात्मक भूमिकेबद्दल उपमहापौर परशुराम वाडेकर यांनी त्यांचा सन्मान करून वेळ दिल्याबद्दल आभार मानले.

## दुचाकी वाहनांसाठी आकर्षक नोंदणी क्रमांकांसाठी अर्जाचे आवाहन


पुणे (दै. संध्या) :

प्रादेशिक परिवहन कार्यालय, पुणे येथे दुचाकी वाहनांसाठी नवीन मालिका सुरू करण्यात येत असून आकर्षक तसेच पसंतीचे नोंदणी क्रमांक घेऊ इच्छिणाऱ्या वाहनधारकांनी विहित शुल्क भरून अर्ज सादर करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे. इच्छुक वाहनधारकांनी दि. 2 मार्च 2026 रोजी सकाळी 10.30 ते दुपारी 2.30 या वेळेत विहित नमुन्यात अर्ज सादर करावेत. अर्जासोबत आवश्यक कागदपत्रे जोडणे बंधनकारक असून अर्जांची छाननी करून पात्र अर्जदारांची यादी कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर प्रसिद्ध करण्यात येईल. दि. 4 मार्च 2026 रोजी दुपारी 2.30 वाजता आकर्षक नोंदणी क्रमांकांचा लिलाव करण्यात येणार आहे. अर्जदारांनी सकाळी 10.30 ते दुपारी 2.30 या वेळेत अनामत रक्कम (डीडी) जमा करावी. अनामत रक्कम 'R.T.O., Pune' यांच्या नावे राष्ट्रीयकृत/शेड्युल्ड बँकेद्वारे अदा करावी. जुने, रद्द किंवा अवैध डीडी स्वीकारले जाणार नाहीत. लिलाव प्रक्रियेत सर्वाधिक बोली लावणाऱ्या अर्जदारास संबंधित क्रमांक देण्यात येईल. एकाच पसंती क्रमांकासाठी एकापेक्षा अधिक अर्ज प्राप्त झाल्यास लिलाव पद्धतीने निर्णय घेण्यात येईल. लिलावात अनुपस्थित राहिल्यास अर्जदार अपात्र ठरेल. दरम्यान, उर्वरित पसंती क्रमांकांसाठी ऑनलाइन पद्धतीने अर्ज करण्याची सुविधा उपलब्ध असून https://fancy.parivahan.gov.in या संकेतस्थळावर नाव व आधार संलग्न मोबाईल क्रमांकाद्वारे नोंदणी करून शुल्क भरता येणार आहे.

## 'पुणे एकीकृत महानगर परिवहन प्राधिकरण' समितीची आढावा बैठक संपन्न

पुणे (दै. संध्या) :

पुणे शहरातील वाहतूक योजनांचे नियोजन, सुसूत्रीकरण आणि अंमलबजावणी करण्यासाठी 'पुणे एकीकृत महानगर परिवहन प्राधिकरण' समितीची १९ वी आढावा बैठक विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांच्या उपस्थितीत विभागीय आयुक्त कार्यालयात आयोजित करण्यात आली. जास्त प्रमाणात वाहतूक कोंडी होणाऱ्या ठिकाणांचा प्राधान्यक्रम ठरवून वाहतूक नियमनासाठी अभ्यासपूर्ण प्रकल्प तयार करा, अशा सूचना त्यांनी यावेळी दिल्या. बैठकीला महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर (दूरदृष्य प्रणालीद्वारे), पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे आयुक्त डॉ. योगेश म्हसे, अतिरिक्त आयुक्त दीपक सिंगला, पुणे मनपा अपर आयुक्त पृथ्वीराज बी. पी., अपर पोलीस आयुक्त मनोज पाटील उपस्थित होते. पुणे व पिंपरी चिंचवड शहरातील वाहतूक नियमन योग्यरितीने होण्यासाठी अधिक




प्रमाणात वाहतूक कोंडी होणाऱ्या भागांचे सर्व्हेक्षण करावे. वाहतुकीचा प्रारंभ व दिशा यांचे सर्वेक्षणानुसार प्रकल्पांचे सादरीकरण करावे, असे डॉ. पुलकुंडवार यांनी सांगितले. लोकहित लक्षात घेऊन वाहतूक प्रकल्पांचे प्रस्ताव तयार करावेत. जास्त ट्रॅफिक होणाऱ्या भागांमध्ये मास्टर टनेल करावेत, असे श्री. म्हसे यांनी सांगितले. वाहनांसाठी पार्किंग पॉलिसी लक्षात घेऊन बोगद्यांची संख्या व दिशा निश्चित करावी, असे श्री. हर्डीकर यांनी सांगितले. यावेळी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, तसेच नगररचना वाहतूक व परिवहन विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

## किस्टोन स्कूल ऑफ इंजिनिअरिंग येथे KeyFest 2026 उत्साहात संपन्न

पुणे (दै. संध्या) :

किस्टोन स्कूल ऑफ इंजिनिअरिंग पुणे येथे वार्षिक महोत्सव "KeyFest 2026" अत्यंत उत्साहपूर्ण, शिस्तबद्ध वातावरणात आणि विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागात यशस्वीरीत्या पार पडला. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देणारा हा बहुआयामी महोत्सव सांस्कृतिक, क्रीडा तसेच राष्ट्रीय अभिमान जागवणाऱ्या उपक्रमांनी समृद्ध ठरला.

या मुख्य महोत्सवांतर्गत सांस्कृतिक कार्यक्रम "Encore 2026" आणि क्रीडा स्पर्धा "Key Karandak 2026" यांचे भव्य आयोजन करण्यात आले. "Encore 2026" मध्ये नृत्य, गायन, नाट्याविष्कार, समूह सादरीकरणे आणि विविध सांस्कृतिक उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांनी आपल्या कलागुणांचे प्रभावी सादरीकरण केले. पारंपरिक दिन, बॉलिवूड दिन, चॉकलेट डे, मिसमॅच डे आणि ट्विन्स डे अशा थीम डेजमुळे संपूर्ण परिसर रंगतदार आणि उत्साही वातावरणाने फुलून गेला. आकर्षक वेशभूषा आणि कल्पक सादरीकरणांनी



कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल संस्थापक संचालक प्रा. यशोधन सोमन, संचालक डॉ. प्रशांत कसबे तसेच संचालक अंकित लुनावत यांनी सर्व समन्वयक, प्राध्यापकवृंद आणि विद्यार्थी आयोजक समितीचे अभिनंदन केले. भविष्यातही अशाच भव्य आणि शिस्तबद्ध उपक्रमांचे आयोजन व्हावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

उपस्थितांची मने जिंकली.

"Key Karandak 2026" अंतर्गत क्रिकेट, फुटबॉल, व्हॉलीबॉल, बास्केटबॉल, थ्रोबॉल, कॅरम, बुद्धिबळ, बॅडमिंटन, टेनिस, टेबल टेनिस, दोरीखेच (Tug of War) आणि धावणे (Running) अशा विविध क्रीडा स्पर्धा पार पडल्या. ३५० पेक्षा अधिक सामने खेळविण्यात आले. विभागनिहाय चुरशीच्या लढतींमध्ये विद्यार्थ्यांनी जिद्द, शिस्त आणि उत्कृष्ट खेळाडूवृत्तीचे दर्शन घडवले.

महोत्सवाचे विशेष आकर्षण म्हणजे प्रसिद्ध मराठी अभिनेते व दिग्दर्शक प्रवीण तरडे यांची उपस्थिती. आपल्या मनोगतात त्यांनी संस्थेच्या कार्याचे विशेष कौतुक करत संस्थापक संचालक प्रा. यशोधन सोमन यांचे अभिनंदन केले. "ओसाड माळरानावर नंदनवन फुलवण्याचे कार्य त्यांनी केले आहे," असे गौरवोद्गार काढत विद्यार्थ्यांना उपलब्ध सुविधांचा योग्य लाभ घेऊन व्यक्तिमत्त्व विकास साधण्याचे आवाहन त्यांनी केले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संदीप कदम यांनी अशा उपक्रमांमुळे नेतृत्वगुण, आत्मविश्वास आणि संघभावना वृद्धिंगत होत असल्याचे नमूद केले. शिक्षणासोबत कला, क्रीडा व सांस्कृतिक सहभागाचे महत्त्व अधोरेखित करत त्यांनी शिस्त, वेळेचे नियोजन आणि सातत्य यावर भर दिला.

१९ फेब्रुवारी रोजी छत्रपती शिवाजी महाराज जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. प्रा. गुजर यांच्या प्रभावी व्याख्यानातून महाराजांचे शौर्य, दूरदृष्टी आणि स्वराज्य स्थापनेचा प्रेरणादायी संदेश विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचला. तसेच "शिवशंभू ढोल-ताशा पथक" यांच्या दमदार सादरीकरणामुळे परिसर देशभक्तीच्या भावनेने भारून गेला.

"Encore 2026" चे समन्वयक प्रा. सुवर्णा फुले आणि "Key Karandak 2026" चे समन्वयक प्रा. पंकज करांडे यांनी उत्कृष्ट नियोजन व व्यवस्थापन केले. सर्व विभागप्रमुख, प्राध्यापकवृंद, कर्मचारी आणि विद्यार्थी आयोजक समितीच्या परिश्रमांमुळे "KeyFest 2026" हा महोत्सव संस्मरणीय व प्रेरणादायी ठरला.

# गुरु तेगबहादूर जी : सहिष्णुता, करुणा आणि धर्मस्वातंत्र्याचे प्रतीक

प्रो. डॉ. दीपक मो. शिंदे परीक्षा नियंत्रक, केंद्रीय जन जाती विद्यापीठ, विजयानगरम (विशाखापट्टणम)
माजी संचालक – श्री गुरु गोबिंद सिंघ जी अध्यासन संकुल व संशोधन केंद्र, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड,

पुणे (दै. संध्या) :

भारतीय इतिहासात अशी काही महान व्यक्तिमत्त्वे उदयास आली आहेत की, ज्यांचे जीवन समाजासाठी प्रेरणादाई व मार्गदर्शक ठरते अशा महान विभूतींचे कार्य एखाद्या धर्माच्या चौकटीत न अडकता संपूर्ण मानवजातीसाठी अखंड प्रेरणेचा स्रोत ठरले आहे. शीख धर्माचे नववे गुरु, श्री गुरु तेगबहादूर जी, हे असेच एक महान व्यक्तिमत्त्व होते. त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य सत्य, न्याय, करुणा, धर्मस्वातंत्र्य आणि मानवी हक्कांच्या संरक्षणासाठी अर्पण केले. त्यांच्या बलिदानाला 350 वर्षे पूर्ण होत असताना, त्यांचे सामाजिक सुधारक म्हणून असलेले कार्य आणि विचार आजही तितकेच सुसंगत आणि मार्गदर्शक आहेत. प्रत्यक्षात शीख धर्म असा एक धर्म आहे की या धर्माच्या धर्म गुरुनी दिलेल्या बलिदाना मुळे हिंदू धर्माचे रक्षण झाले आहे.

गुरु तेगबहादूर जी : थोडक्यात जीवनपरिचय

१ एप्रिल १६२१ रोजी अमृतसर येथे जन्मलेले गुरु तेगबहादूर जी हे सहावे शीख गुरु श्री गुरु हरगोबिंद साहेब यांचे ते तेजस्वी पुत्र होते. बालपणापासूनच त्यांच्या जीवनावर अध्यात्म, शौर्य आणि सेवाभावाचे संस्कार कोरले गेले. वेद-उपनिषदे, इस्लामी तसेच भारतीय तत्त्वज्ञानाच्या सखोल चिंतनातून त्यांच्या विचारांना सर्वधर्मसमभाव आणि उदात्त मानवतावादाची दिव्य झळाळी प्राप्त झाली. गुरु तेगबहादूर जी केवळ आध्यात्मिक गुरु नव्हते, तर ते एक प्रभावी सामाजिक सुधारक होते. त्या काळात भारतीय समाज जातीय भेदभाव, धार्मिक अत्याचार, अंधश्रद्धा आणि राजकीय दडपशाहीने ग्रासलेला होता. अशा परिस्थितीत त्यांनी समाजाला सत्य, समानता आणि नैतिकतेचा मार्ग दाखवला.

धर्मस्वातंत्र्याचा पुरस्कार

भारतीय इतिहासात मुघल सम्राट औरंगजेब आणि शीख धर्माचे नववे गुरु, श्री गुरु तेगबहादूर जी, ही दोन व्यक्तिमत्त्वे परस्परविरोधी विचारधारांचे प्रतीक म्हणून समोर येतात. एकीकडे सत्ता, कट्टरता आणि धर्मांतराची सक्ती यांचे प्रतिनिधित्व करणारा औरंगजेब, तर दुसरीकडे धर्मस्वातंत्र्य, मानवता आणि सत्यासाठी प्राणांची आहुती देणारे गुरु तेगबहादूर जी—या संघर्षातून भारतीय समाजाला नैतिक मूल्यांची नवी दिशा मिळाली.

औरंगजेब (इ.स. १६५८–१७०७) हा मुघल साम्राज्याचा सहावा सम्राट होता. तो अत्यंत कुशल प्रशासक आणि पराक्रमी सेनानी असला, तरी त्याची ओळख प्रामुख्याने धार्मिक असहिष्णुता आणि जबरदस्तीच्या धर्मांतर धोरणांमुळे होते. त्याने जिझिया कर पुन्हा लागू केला, अनेक हिंदू मंदिरे पाडली आणि इस्लाम स्वीकारण्यासाठी दबाव टाकला.

त्याच्या कारकिर्दीत विशेषतः काश्मीरमधील हिंदू पंडितांवर अमानुष अत्याचार झाले. धर्मांतर न स्वीकारल्यास कारावास, छळ आणि मृत्यू अशी भीतीदायक परिस्थिती निर्माण करण्यात आली. या अन्यायाविरुद्ध आवाज उठवणे म्हणजे मृत्यूला आमंत्रण देण्यासारखे होते. काश्मीरमधील पीडित पंडितांनी जेव्हा मदतीसाठी गुरु तेगबहादूर जी यांच्याकडे धाव घेतली, तेव्हा त्यांनी हा प्रश्न केवळ एका समाजाचा न मानता संपूर्ण मानवतेचा प्रश्न म्हणून स्वीकारला. त्यांच्या दृष्टीने धर्म बदलणे ही अंतःकरणाची बाब होती; ती तलवारीच्या धाकाने लादता येत नव्हती. गुरु तेगबहादूर जी यांनी औरंगजेबाच्या अन्यायी धोरणांना उघड आव्हान दिले. त्यांनी स्पष्टपणे सांगितले की, धर्मस्वातंत्र्यावर गदा आणणे हे अधर्माचे लक्षण आहे. औरंगजेबाने गुरुजींना इस्लाम स्वीकारण्याचा आदेश दिला; परंतु गुरु तेगबहादूर जी यांनी तो ठामपणे नाकारला. या नकारामागे हट्ट नव्हता, तर तत्त्वनिष्ठा होती. जर गुरुजी नी स्वतः धर्मांतर स्वीकारले असते, तर लाखो लोकांकडून या अन्यायाला मौनसंमती मिळाली असती. म्हणूनच त्यांनी स्वतःच्या प्राणांची आहुती देण्याचा मार्ग स्वीकारला. गुरु तेगबहादूर जी यांचे हे सर्वात महान सामाजिक योगदान होय याला धर्मस्वातंत्र्याचे रक्षक असे ही संबोधता येईल . गुरुजी केवळ आध्यात्मिक गुरु नव्हते, तर मानवी स्वातंत्र्याचे सजग प्रहरी होते. त्यांनी सर्वधर्मसमभाव, समता आणि आत्मसन्मान या मूल्यांचा पुरस्कार केला. त्यांच्या धर्मांतरास उघड विरोधा नंतर इ.स. १६७५ साली दिल्लीच्या चांदणी चौकात गुरु तेगबहादूर जी यांना अमानुष यातना देऊन त्यांचा शिरच्छेद करण्यात आला. हे बलिदान कोणत्याही राजकीय सत्तेविरुद्ध नव्हते, तर विचारस्वातंत्र्य आणि धार्मिक स्वातंत्र्यासाठी दिलेले महान बलिदान होते. गुरुजींचे बलिदान झाल्या नंतर औरंगजेबाची सत्ता जरी तातपुरती टिकली, तरी इतिहासाच्या न्यायालयात तो दडपशाहीचा प्रतीक ठरला; तर गुरु तेगबहादूर जी मानवतेचे अमर नायक बनले. म्हणूनच त्यांना "हिंद की चादर" असे गौरवाने संबोधले जाते. गुरुजींनी केवळ शीख धर्मियांसाठी नव्हे, तर हिंदू धर्मीयांच्या धार्मिक स्वातंत्र्यासाठी स्वतःचे बलिदान देण्याचा निर्णय घेतला. "जर गुरु तेगबहादूर धर्म स्वीकारतील, तर सगळे काश्मिरी पंडित इस्लाम स्वीकारतील" असे औरंगजेबाला सांगण्याचा धैर्यपूर्ण निर्णय त्यांनी घेतला. हा निर्णय म्हणजे धार्मिक सहिष्णुतेसाठी दिलेले सर्वोच्च बलिदान होते. त्यांच्या या धाडसी व समाज वाचवण्यासाठी घेतलेल्या या निर्णयाने समाज एकत्र होण्यास बळ मिळाले. धर्मस्वातंत्र्य, मानवी सन्मान आणि सामाजिक न्यायासाठी दिलेले हे ऐतिहासिक बलिदान होते. त्यांच्या या बलिदानामुळे भारताच्या सामाजिक आणि धार्मिक इतिहासाला नवी दिशा मिळाली. त्यांचे पुत्र श्री गुरु गोबिंदसिंग जी यांनी पुढे खालसा पंथाची स्थापना करून अन्यायाविरुद्ध संघटित लढ्याचा मार्ग दाखवला. आज आपण मानवाधिकारांची चर्चा करतो, पण गुरु तेगबहादूर जी यांनी १७व्या शतकातच मानवी हक्कांचा पुरस्कार केला. धर्म मानण्याचा अधिकार, विचार करण्याचे स्वातंत्र्य आणि आत्मसन्मानाने जगण्याचा अधिकार हे मूलभूत मानवी हक्क आहेत, हे त्यांनी आपल्या कृतीतून सिद्ध केले. त्यांचे बलिदान हे कोणत्याही एका धर्मासाठी नसून संपूर्ण मानवजातीच्या स्वातंत्र्यासाठी होते. त्या काळातील भारतीय समाज जातिभेदाच्या खोल दरीत अडकलेला होता. जन्मावर आधारित उच्च-नीचतेच्या कठोर रेषांनी माणसामाणसांत भिंती उभ्या केल्या होत्या. सामाजिक प्रतिष्ठा, धार्मिक अधिकार आणि मानवी सन्मान हे काही मोजक्या वर्गांपुरते सीमित झाले होते.

## थोडक्यात पण महत्वाचे...

### प्रसिद्ध योगगुरु सौरभ बोथरा यांना रोटरी प्रिस्टिनचा "परिवर्तन पुरस्कार"जाहीर

■ शनिवार, २८ फेब्रुवारी रोजी होणार सौरभ बोथरांचे पुण्यातले पहिले जाहीर योग शिबिर

पुणे (दैनिक संध्या) : रोटरी इंटरनॅशनलच्या 'आजार प्रतिबंध आणि उपचार' (Disease Prevention and Treatment) या कार्यक्षेत्रांतर्गत, रोटरी क्लब ऑफ पुणे प्रिस्टिनतर्फे देण्यात येणारा ९ वा "प्रिस्टिन परिवर्तन पुरस्कार" सुप्रसिद्ध योगगुरू श्री. सौरभ बोथरा यांना जाहीर करण्यात आला आहे. हा पुरस्कार वितरण सोहळा येत्या शनिवारी, २८ फेब्रुवारी रोजी सकाळी ७:१५ वाजता कोथरूड येथील एमआयटी (MIT) मैदानात पार पडणार आहे. पुरस्कार वितरणानंतर सौरभ बोथरा यांचे उपस्थित नागरिकांसाठी विशेष योग सत्र आयोजित करण्यात आले आहे. यामध्ये सर्वांना सहज करता येतील अशी सोपी योगासने, श्वसनाचे व्यायाम आणि ध्यानाचे धडे दिले जातील. तसेच धावपळीच्या जीवनात दैनंदिन योगाची सवय जोपासणे का महत्त्वाचे आहे, यावरही ते विशेष मार्गदर्शन करणार आहेत. या कार्यक्रमाची माहिती देताना रोटरी प्रिस्टिनच्या अध्यक्षा रोटेरियन सुनया आपटे म्हणाल्या की "सौरभ सर यांचे जगभरात १.७५ कोटींहून अधिक अनुयायी आहेत. विशेष म्हणजे पुण्यातील दीड लाखांहून अधिक नागरिक त्यांच्या योग पद्धतीचे अनुसरण करतात आणि सुमारे ३५,००० पुणेकर दररोज त्यांच्या ऑनलाइन सत्रात सहभागी होतात. या हजारो पुणेकर साधकांसाठी सौरभ सरांचे प्रत्यक्ष मार्गदर्शन मिळवणे ही एक मोठी पर्वणी ठरणार आहे". कोथरूड येथील या सत्रासाठी ४००० पेक्षा जास्त लोक उपस्थित असतील असेही रोटेरीयन सुनया आपटे म्हणाल्या सौरभ बोथरा यांनी योगासनांमध्ये अशा प्रकारे बदल केले आहेत की ज्यामुळे काही शारीरिक व्याधी असणारे किंवा शरीरात लवचिकता नसलेले लोकही ती आसने खुर्चीचा आधार घेऊन सहज करू शकतात व काही दिवसात व्यवस्थित करू शकतात. त्यांच्या या सोप्या तंत्राचा फायदा १२० हून अधिक देशांतील दिड कोटी लोकांना झाला आहे. दररोज ५ लाखांहून अधिक लोक त्यांच्यासोबत ऑनलाइन योगाभ्यास करतात. त्यांच्या या अतुलनीय कार्याची दखल घेत त्यांना अनेक 'गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड्स'ने देखील सन्मानित करण्यात आले आहे.

### भाजपच्यावतीने जानाई भक्तांसाठी बससेवा

जेजुरी (दैनिक संध्या) : श्री क्षेत्र जेजुरी ते श्री क्षेत्र निवकणे ता पाटण जि सातारा जानाईदेवी यात्रा निमित्त गेले १० वर्षे झाले जानाईभक्तांसाठी भारतीय जनता पक्षाचे पुणे जिल्हा चिटणीस गणेश भोसले यांच्या वतीने मोफत बससेवा उपलब्ध करण्यात आली होती. पुणे जिल्हा भाजपाचे सरचिटणीस गणेश भोसले यांनी गेली पंधरा वर्षे भाजपाच्या माध्यमातून तळागाळातील महिला व नागरिकांसाठी शासकीय योजनांचा लाभ मिळून दिला आहे.जेजुरी नगरीची ग्रामदेवता जानाई देवीची सातारा जिल्ह्यातील पाटण तालुक्यातील निवकणे येथे दरवर्षी यात्रा भरते. सलग दहा वर्षे आर्थिक दुर्बल घटकांना वयोवृद्ध महिला वर्ग देवीच्या दर्शनाला जाता येत नाही अशा भाविकांना देवीच्या दर्शनासाठी गणेश भोसले स्वखर्चातून बससेवा उपलब्ध करून देवीच्या दर्शनाची व्यवस्था केली जाते. नुकतीच ही यात्रा संपन्न झाली. या यात्रेसाठी जानाई भक्तांसाठी मोफत चौदा बससेवा उपलब्ध करण्यात आल्या.सुमारे सातशे भाविकांनी या सेवेचा लाभ घेतला. नुकत्याच झालेल्या जेजुरी नगरपरिषदेच्या निवडणुकीतील पक्षाच्या वतीने त्यांना उमेदवारी पासून डावलले होते. तरीही पक्ष तळागाळात मजबूत करण्यासाठी त्यांनी लोकसेवेचे काम सुरू ठेवले होते. दरवर्षी ग्रामदेवता जानाई देवीची धार्मिक सहल आयोजित केली जात असल्याने महिला भाविकांनी भोसले यांचे आभार मानले आहे. पुणे जिल्हा अध्यक्ष भटक्या जाती जमाती रवींद्र खोमणे. महिला मोर्चाच्या संपदा खोमणे . सविता घोडके. रंजना खोमणे. संगीता बोडरे, सुमती पुजारी,प्रीती पवार,विद्या कुदळे शोभा कदम, सरिता मोतीकर सोमनाथ मदने ,नवनाथ चौडकर. सचिन वाघमारे, चंद्रकांत जगताप सचिन कापडे आदींनी या धार्मिक सहलीचे नियोजन केले.

### नवव्या आयपीटेक्स आणि सातव्या ग्राइंडेक्स 2026 प्रदर्शनाची उत्साहात सुरुवात

पिंपरी-चिंचवड (दैनिक संध्या) : पॉवर ट्रान्समिशन, प्रिसीजन ग्राइंडिंग आणि गिअर उत्पादन तंत्रज्ञान क्षेत्रातील भारतातील अग्रगण्य आंतरराष्ट्रीय प्रदर्शन IPTEX आणि GRINDEX 2026 यांची आज उत्साहात सुरुवात झाली. हे प्रदर्शन २६ ते २८ फेब्रुवारी २०२६ दरम्यान सकाळी १० ते सायंकाळी ६ या वेळेत ऑटो क्लस्टर एक्झिबिशन सेंटर येथे आयोजित करण्यात आले आहे. American Gear Manufacturers Association (AGMA) यांच्या पाठबळासह होत असलेल्या या प्रदर्शनाचे उद्घाटन नामवंत औद्योगिक नेत्यांच्या हस्ते झाले. यावेळी माहिती देताना व्हर्गो कम्युनिकेशन्स अँड एक्झिबिशन्स प्रा. लि.चे संचालक श्री. रघुनाथ जी. म्हणाले की, “IPTEX आणि GRINDEX 2026 हे गिअर व पॉवर ट्रान्समिशन मूल्यसाखळीतील सर्व घटकांना एकत्र आणणारे सर्वसमावेशक व्यासपीठ आहे. गिअर कटिंग व ग्राइंडिंग मशिन्स, टूलिंग, मेट्रोलॉजी, फिनिशिंग, ऑटोमेशन आणि कंट्रोल सिस्टीम्सपर्यंत उद्योगाचे 360 अंश दृश्य येथे अनुभवता येईल.” २०२६ च्या आवृत्तीत भारतासह अमेरिका, जर्मनी, इटली, स्वित्झर्लंड, ऑस्ट्रिया, चीन, दक्षिण कोरिया आणि जपानसारख्या औद्योगिक राष्ट्रांमधील कंपन्यांचा मोठ्या प्रमाणावर सहभाग आहे. यामुळे जागतिक यांत्रिक पॉवर ट्रान्समिशन परिसंस्थेत भारताचे वाढते धोरणात्मक महत्त्व अधोरेखित झाले आहे. तसेच चीनमधील Zhejiang Jinchang, Henan Tiancan, Zhengzhou Heyday, Henan NaiCeram, En Tai आणि Zhengzhou HG Abrasive यांसारख्या आंतरराष्ट्रीय प्रदर्शकांचाही सहभाग आहे. डिझायनर्स, OEMs, घटक उत्पादक, सोल्यूशन पुरवठादार आणि अंतिम वापरकर्त्यांना एकत्र आणण्यासाठी उत्पादन सादरीकरणे, लाईव्ह डेमो, तांत्रिक परिसंवाद आणि व्यावसायिक मंचांचे आयोजन करण्यात आले आहे. EV ड्राइव्हट्रेन, स्मार्ट फॅक्टरी, संरक्षण प्रणाली, नवीकरणीय ऊर्जा आणि औद्योगिक ऑटोमेशन ही यंदाची प्रमुख लक्ष केंद्रे आहेत. भारताचा गिअर व गिअरबॉक्स उद्योग ऑटोमोबाईल, संरक्षण, रेल्वे, एअरोस्पेस आणि ऊर्जा क्षेत्रासाठी अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. इलेक्ट्रिक वाहनांचा वाढता प्रसार, ऑटोमेशन आणि पायाभूत सुविधा विकासामुळे उच्च कार्यक्षम ट्रान्समिशन सिस्टीम्सची मागणी वाढत आहे. ‘मेक इन इंडिया’ आणि ‘आत्मनिर्भर भारत’ उपक्रमांशी सुसंगत राहून हा उद्योग जागतिक गुंतवणूक, तंत्रज्ञान सहकार्य आणि आंतरराष्ट्रीय भागीदारी आकर्षित करत आहे.

## पिंपरी-चिंचवडमध्ये मेट्रो-कनेक्टेड व्यावसायिक संकुलाची नवी पायरी गेरा डेव्हलपमेंट्सकडून

# ‘गेरा’स इम्पेरियम गेटवे’ला थेट मेट्रो प्रवेशमार्ग सुरू

पुणे (दै. संध्या) :

पुणे तसेच देश-विदेशात प्रीमियम रिअल इस्टेट प्रकल्पांसाठी ओळखल्या जाणाऱ्या गेरा डेव्हलपमेंट्स प्रा. लि. यांनी पिंपरी-चिंचवडमधील ‘गेरा’स इम्पेरियम गेटवे’ या व्यावसायिक प्रकल्पाला थेट भोसरी मेट्रो स्थानकाशी जोडणारा समर्पित प्रवेशमार्ग सुरू केला. या उपक्रमामुळे हा प्रकल्प शहरातील मेट्रोशी एकात्मिक जोडणी असलेला पहिल्या व्यावसायिक संकुलांपैकी एक ठरला आहे. ,

उद्घाटन प्रसंगी महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेडचे प्रॉपर्टी विभागाचे एजीएम मनोज दंडारे प्लॅनिंग विभागाचे डीजीएम मिहिर कुलकर्णी तसेच गेरा डेव्हलपमेंट्सचे मुख्य कार्यकारी अधिकारी गुलजार मल्होत्रा उपस्थित होते. नवीन प्रवेशमार्ग सुरू झाल्यानंतर प्रवासी, कर्मचारी व व्यावसायिकांना भोसरी मेट्रो स्थानकातून थेट प्रकल्पात प्रवेश मिळणार असून ‘लास्ट माईल कनेक्टिव्हिटी’ची समस्या मोठ्या प्रमाणात सुटणार आहे. त्यामुळे कार्यालयीन प्रवास अधिक जलद, सोयीस्कर आणि वेळ वाचवणारा होणार असल्याचे सांगण्यात आले.




मनोज दंडारे म्हणाले की, पुण्यातील वाहतूक व्यवस्था सक्षम करण्यासाठी मेट्रो प्रकल्प राबवण्यात आला असून अशा प्रकारचे ट्रान्झिट-ओरिएंटेड डेव्हलपमेंट शहराच्या शहरी रचनेत महत्त्वाचा बदल घडवतील. सार्वजनिक पायाभूत सुविधा आणि खासगी विकास यांची सांगड घातल्यास भविष्योन्मुख व्यावसायिक क्षेत्रांची निर्मिती शक्य होते. गुलजार मल्होत्रा यांनी सांगितले की, आधुनिक व्यावसायिक प्रकल्प हे केवळ इमारती नसून ते जोडणी, कार्यक्षमता आणि टिकाऊपणावर आधारित असले पाहिजेत. थेट मेट्रो प्रवेशामुळे प्रकल्पाचे व्यावसायिक मूल्य वाढते, कंपन्यांसाठी आकर्षण निर्माण होते आणि पर्यावरणपूरक प्रवासाला चालना मिळते. प्रकल्पातील ९५ टक्क्यांहून अधिक जागा विक्री झाल्या असून लीजिंगबाबत कॉर्पोरेट क्षेत्राकडून चांगला प्रतिसाद मिळत आहे.

सुमारे ११.५ एकर क्षेत्रावर उभारलेल्या ‘इम्पेरियम’ मालिकेतील हा दहावा प्रकल्प तीन इमारतींच्या संकुलात विकसित करण्यात आला आहे. आधुनिक कार्यालयीन जागांसह रिटेल व फूड डेस्टिनेशन असलेला सामाजिक खुला परिसर, दोन स्वतंत्र रिटेल मजले आणि काचांनी सजलेला भव्य प्रवेशद्वार यामुळे हा परिसर पिंपरी-चिंचवडमधील प्रमुख बिझनेस-लाईफस्टाईल हब म्हणून विकसित होण्याची अपेक्षा आहे. पुणे-मुंबई-नाशिक कॉरिडॉरशी जोडणीही या ठिकाणाहून सुलभ होणार आहे.

मेट्रो जोडणीसह साकारलेले हे मॉडेल भविष्यातील शहरी कामकाज पद्धतीचे उदाहरण ठरणार असून ग्राहक-केंद्रित नवकल्पनांबाबत कंपनीची भूमिका अधोरेखित करते.

गेरा डेव्हलपमेंट्स प्रा. लि. बद्दल

पन्नासहून अधिक वर्षांची परंपरा असलेली गेरा डेव्हलपमेंट्स ही पुण्यातील अग्रगण्य रिअल इस्टेट कंपनी असून पुणे, गोवा, बेंगळुरू आणि कॅलिफोर्निया येथे प्रकल्प विकसित केले आहेत. ग्राहक-केंद्रित दृष्टिकोन, नवकल्पना आणि पारदर्शकता या तत्त्वांवर आधारित कंपनीने भारतात प्रथमच ५ वर्षांची आणि नंतर ७ वर्षांची वॉरंटी, चाइल्डसेंट्रिक होम्स, इंटेलिप्लेक्सेस, स्कायव्हिला आणि ‘इम्पेरियम’ मालिकेसारखे संकल्पना प्रकल्प सादर केले आहेत.

कंपनीला विविध राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पुरस्कारांसह ‘ग्रेट प्लेस टू वर्क’ संस्थेकडून सलग आठ वर्षे उत्कृष्ट कार्यस्थळ म्हणून मान्यता मिळाली आहे.

## आर्कस हॉस्पिटल पुणे येथे सेंटर ऑफ एक्सलन्स स्थापन

पुणे (दै. संध्या) :

ऑर्थोपेडिक उपचारांसाठी प्रख्यात असलेल्या पुण्यातील आर्कस हॉस्पिटल ने मेडिकल तंत्रज्ञानातील आघाडीच्या जागतिक कंपनी असलेल्या स्ट्रायकरशी सहयोग केला असून याअंतर्गत शल्यचिकित्सकांना प्रशिक्षण देण्यात येणार आहे.या सहयोगाअंतर्गत भारत आणि भारताबाहेरच्या शल्यचिकित्सकांच्या प्रशिक्षणासाठी सेंटर ऑफ एक्सलन्स स्थापित करण्यात आले असून स्नायूंचे नुकसान न करणारे तंत्र वापरून रूग्ण लवकर बरा होण्याच्या दिशेने फायदेशीर असलेल्या डायरेक्ट अँटिरियर अ‍ॅप्रोच (डीएए) या तंत्रावर लक्ष केंद्रित केले जाणार आहे. हे तंत्र आर्कस हॉस्पिटलचे संचालक डॉ.रोहित लुथ्रा यांनी प्रथम 2018 साली वापरले होते.डॉ.रोहित लुथ्रा यांनी भारतात सर्वाधिक बायलॅटरल रोबोटिक टोटल हिप रिप्लेसमेंट प्रक्रिया करत भारतातील सांधेरोपण क्षेत्रात परिवर्तन आणले आहे.डॉ.लुथ्रा हे टेड स्पीकर असून वेदना विरहित प्रक्रिया हे त्यांचे ध्येय आहे.त्यांचे ट्रेडमार्क ट्रोबोटिक्स व मॅक प्रिसिजन तंत्र हे शल्यचिकित्सा कौशल्य आणि रोबोटिक्सचा मिलाफ असून यामुळे रूग्णांना चांगले परिणाम मिळतात आणि शस्त्रक्रियानंतर काही तासातच हालचाल सुरू करता येते. रोबोटिक हिप आर्थोप्लास्टीसाठी भारतातील सर्वाधिक प्रमाणात असलेल्या केंद्रांपैकी एक म्हणून आर्कस हॉस्पिटल नवीन वैद्यकीय मापदंड स्थापित करण्यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावत आहे. या भागीदारीचे उद्दिष्ट आधुनिक तंत्रज्ञान आणि शस्त्रक्रिया कौशल्यामधील दरी भरून काढत रोबोटिक तंत्रज्ञानामुळे साध्य होत असलेली अचूकता देशभरातील आरोग्यसेवेचे मानक बनेल हे आहे.

## हिमालया बेबीकेअरचे नवे पॅकेजिंग सादर

■ पाच वर्षांत 500 टन प्लास्टिक कमी करण्याचा संकल्प

मुंबई (दै. संध्या) :

भारतातील विश्वासार्ह बेबी केअर ब्रँड हिमालया बेबीकेअरने आपल्या जेंटल बेबी केअर उत्पादनांसाठी नव्या पॅकेजिंग डिझाइनची घोषणा केली आहे. पर्यावरणपूरक उपक्रमांचा भाग म्हणून सादर करण्यात आलेले हे पॅकेजिंग अधिक आकर्षक, सोयीस्कर आणि जबाबदारीने डिझाइन करण्यात आले आहे. कंपनीच्या सस्टेनेबिलिटी आराखड्यानुसार, या नव्या पॅकेजिंगमुळे पुढील पाच वर्षांत सुमारे 500 टन प्लास्टिकचा वापर कमी होणार असून दरवर्षी अंदाजे 100 टन प्लास्टिक वाचणार आहे. पर्यावरणावर सकारात्मक परिणाम घडवण्याच्या उद्देशाने हिमालया बेबीकेअर सातत्याने प्रयत्न करत असल्याचे कंपनीने सांगितले. आज पालक खरेदी करताना उत्पादन पर्यावरणासाठी किती सुरक्षित आहे, याचा विचार करतात. मुलांचे




सुरक्षित आणि निरोगी भविष्य लक्षात घेऊन अधिक जबाबदारीने उत्पादने निवडण्याची प्रवृत्ती वाढत आहे. या बदलाचे प्रतीक म्हणून हिमालया बेबीकेअरने नवीन पॅकेजिंग सादर केले आहे. नव्या पॅकेजिंगच्या लॉंचसाठी कंपनीने एक प्रभावी डिजिटल फिल्मही सादर केली आहे. या फिल्ममध्ये प्लास्टिक कचऱ्याची वाढती समस्या आणि त्याचा पुढील पिढीवर होणारा परिणाम याबाबत पालकांमधील संवाद दाखवण्यात आला आहे. मुलांची काळजी घेणे म्हणजे केवळ दैनंदिन देखभाल नव्हे, तर त्यांच्या भविष्यासाठी पर्यावरणपूरक निवडी करणेही तितकेच महत्त्वाचे आहे, हा संदेश या माध्यमातून देण्यात आला आहे. हिमालया वेलनेस कंपनीचे डायरेक्टर – बेबीकेअर एन. व्ही. चक्रवर्ती म्हणाले, “आमची जबाबदारी फक्त बाळांसाठी सुरक्षित उत्पादने तयार करण्यापुरती मर्यादित नाही. प्रत्येक निर्णयामागे बाळांना निसर्गातील सर्वोत्तम पोषण मिळावे आणि भविष्यात त्यांना सुरक्षित, निरोगी जग मिळावे हा आमचा विश्वास आहे. पॅकेजिंगमधील हा बदल प्लास्टिक कचरा कमी करण्याच्या आमच्या प्रयत्नांचा भाग आहे.” नवीन पॅकेजिंग अधिक स्वच्छ, आधुनिक आणि वापरण्यास सोपे आहे. स्पष्ट लेबलिंग, मजबूत पकड आणि स्थिर रचना यामुळे दैनंदिन वापर अधिक सुलभ करण्यात आला आहे. गुणवत्ता आणि सुरक्षिततेत कोणतीही तडजोड न करता पालकांसाठी अधिक सोयीस्कर अनुभव देण्यावर भर देण्यात आला आहे. देशभरातील पालकांपर्यंत संदेश पोहोचावा यासाठी डिजिटल फिल्म हिंदीसह पंजाबी, तमिळ, कन्नड, तेलुगू, बंगाली, ओडिया, आसामी, गुजराती आणि मराठी अशा दहा भाषांमध्ये सादर करण्यात आली आहे. या उपक्रमाद्वारे हिमालया बेबीकेअरने पुन्हा एकदा स्पष्ट केले आहे की, बेबीकेअर ही केवळ बाळांच्या त्वचेपुरती मर्यादित नाही; तर पुढील पिढीसाठी सुरक्षित, टिकाऊ आणि निसर्गाशी सुसंवाद साधणारे भविष्य घडवण्याची जबाबदारीही तितकीच महत्त्वाची आहे.

## नागीणविषयी जागरूकतेचा अभाव; अर्धे प्रौढ डॉक्टरांशी चर्चा करत नाहीत

मुंबई (दै. संध्या) :

नागीण (शिंगल्स) हा वेदनादायक आजार असूनही भारतातील सुमारे निम्मे प्रौढ त्याच्या प्रतिबंधाबाबत डॉक्टरांशी चर्चा करत नाहीत, अशी धक्कादायक बाब एका जागतिक सर्वेक्षणातून समोर आली आहे. ५० वर्षांवरील आणि दीर्घकालीन आजारांनी ग्रस्त प्रौढांवर नागीणीचा मोठा परिणाम होत असल्याचेही या अहवालात नमूद करण्यात आले आहे.

नागीण कृती सप्ताह (२३ फेब्रुवारी–१ मार्च २०२६) निमित्त करण्यात आलेल्या या सर्वेक्षणात नागीण झालेल्या ४३% भारतीयांनी दैनंदिन जीवनात अडथळा आणणारी तीव्र वेदना अनुभवली असल्याचे सांगितले. तर तीनपैकी एका व्यक्तीने या आजारामुळे काम किंवा सामाजिक कार्यक्रमांपासून दूर राहावे लागल्याचे नमूद केले. मूत्रपिंडाचे आजार (सीकेडी) आणि हृदयविकार (सीव्हीडी) असलेल्या रुग्णांमध्ये नागीणीचा सर्वाधिक परिणाम दिसून आला.

नागीण हा व्हेरिसेला-झोस्टर विषाणूमुळे होणारा आजार असून वय वाढल्यास रोगप्रतिकारक शक्ती कमी झाल्यामुळे त्याचा



धोका वाढतो. हा आजार प्रामुख्याने शरीराच्या एका बाजूला पुरळ आणि वेदनादायक फोडांच्या स्वरूपात दिसून येतो. तज्ज्ञांच्या मते, नागीण टाळण्यासाठी लसीकरण हा प्रभावी उपाय आहे.



सर्वेक्षणानुसार, दीर्घकालीन आजार असूनही चारपैकी एक व्यक्तीला नागीणीबाबत फारशी माहिती नाही. तसेच सुमारे ४८% लोकांनी कधीही डॉक्टरांशी नागीणविषयी चर्चा केलेली नसल्याचे सांगितले. मधुमेह आणि हृदयविकार असलेल्या रुग्णांमध्ये हा संवाद आणखी कमी असल्याचे आढळले.

गैरसमजही मोठ्या प्रमाणावर आढळून आले. काहींना त्यांच्या जुनाट आजारांचा रोगप्रतिकारक शक्तीवर परिणाम होत नाही असे वाटते, तर अनेकांना चांगले आजार व्यवस्थापन केल्यास संसर्ग टाळता येतो असे वाटते. परिणामी, नागीणीच्या जोखमीबाबत जागरूकतेचा अभाव दिसून येतो.

जीएसके इंडियाच्या वैद्यकीय कामकाजाच्या कार्यकारी उपाध्यक्ष डॉ. शालिनी मेनन म्हणाल्या की, “भारतात आयुर्मान वाढत असले तरी मधुमेह, उच्च रक्तदाब, हृदयरोग आणि इतर दीर्घकालीन आजारांमुळे वृद्धांची रोगप्रतिकारक शक्ती कमकुवत होते. त्यामुळे संसर्गाचा धोका वाढतो. मात्र, दीर्घकालीन आजार आणि रोगप्रतिकारक आरोग्य यातील संबंधांबाबत जागरूकता कमी आहे.”

भारतामध्ये सध्या ६० वर्षांवरील लोकसंख्या सुमारे १५३ दशलक्ष असून ती २०५० पर्यंत ३४७ दशलक्षांपर्यंत वाढण्याची शक्यता आहे. यापैकी ७५ दशलक्षांहून अधिक वृद्ध किमान एका दीर्घकालीन आजारासह जगत आहेत. वाढते वय आणि जुनाट आजारांमुळे नागीणीचा धोका अधिक वाढत असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.

वृद्धत्व आणि दीर्घकालीन आजारांचा वाढता परिणाम आरोग्यसेवा खर्च, उत्पादकता घट आणि दीर्घकालीन काळजीच्या गरजा वाढवू शकतो. त्यामुळे प्रतिक्रियाशील उपचारांऐवजी प्रतिबंधक आरोग्यसेवेकडे वळणे गरजेचे असल्याचे सर्वेक्षणात अधोरेखित करण्यात आले आहे.

तज्ज्ञांच्या मते, प्रौढांमधील लसीकरण आणि नागीणविषयी जागरूकता वाढवण्यासाठी डॉक्टर आणि रुग्णांमधील संवाद नियमित होणे आवश्यक आहे. यामुळे टाळता येण्याजोगे दुःख कमी होऊन जीवनमान सुधारण्यास आणि आरोग्य व्यवस्थेवरील ताण कमी करण्यास मदत होऊ शकते.



## पुण्यात रंगला १११ गाण्यांचा नऊ तासांचा सोहळा

पुणे (दै. संध्या) :

संगीताच्या क्षेत्रात एक नवा अध्याय रचण्यासाठी गिरीशजी पंचवाडकर आणि त्यांच्या 'नाद सप्तक' टीमने ९ तासांत पहाडी रागातील १११ गाणी सादर करण्याचा अनोखा विक्रम करण्याचा संकल्प हा अत्यंत स्तुत्य उपक्रम असल्याचे गौरवोदगार खासदार मेधा कुलकर्णी यांनी काढले. पुण्यातील “नादसप्तक संगीत विद्यालय” यांच्या वतीने भारतीय लोकसंगीत व शास्त्रीय संगीत परंपरेतील अत्यंत मधुर, आणि लोकप्रिय,राग पहाडीवर आधारित १११ हिंदी व मराठी गीतांची आगळीवेगळी ‘सूर पहाडी’ ही भव्य संगीत मैफल बुधवार, दि. २५ फेब्रुवारी २०२६ रोजी यशवंतराव चव्हाण नाट्यगृह, कोथरूड, पुणे येथे आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी प्रमुख अतिथी म्हणून त्या बोलत होत्या. यावेळी प्रख्यात निवेदक आनंद देशमुख, जेष्ठ टाळवादक माउली टाकळकर, आशिया बुक of रेकॉर्ड्स चे अधिकृत परीक्षक अशोक अडक,प्रख्यात गायक व संगीतकार गिरीश पंचवाडकर, युवा तबला वादक अक्षय पंचवाडकर हे यावेळी उपस्थित होते.

## १०व्या आंतरराष्ट्रीय मधुमेह परिषदेचे पुण्यात आयोजन

पुणे (दै. संध्या) :

चेलाराम डायबेटिस इन्स्टिट्युट तर्फे पुण्यात जे.डब्ल्यू.मॅरिएट येथे 13 ते 15 मार्च 2026 दरम्यान 10 व्या आंतरराष्ट्रीय मधुमेह परिषद - 2026 (इंटरनॅशनल डायबेटिस समिट) चे आयोजन करण्यात आले आहे. मधुमेह आणि त्यामुळे निर्माण होणाऱ्या धोक्यांचा व गुंतागुंतींचा सामना करण्यासाठी असलेल्या योग्य उपाययोजना जाणून घेण्याच्या उद्देशाने या परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. या परिषदेचे उद्घाटन महाराष्ट्र वैद्यकीय परिषद, मुंबई येथील प्रशासक व केंद्र सरकारच्या आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाच्या राष्ट्रीय सीकल सेल निर्मूलन अभियानाचे सदस्य व थॅलेसेमिया अ‍ॅन्ड सीकल सेल सोसायटी ऑफ इंडियाचे अध्यक्ष डॉ. विंकी रूघवानी यांच्या हस्ते होणार आहे. या परिषदेत मधुमेहाच्या गुंतागुंतींचे व्यवस्थापन, किफायतशीर दरात मधुमेह उपचार, नवीन संशोधन आणि मधुमेह व्यवस्थापनातील तंत्रज्ञानाची भूमिका या विषयांवर चर्चा करण्यात येणार आहे. या परिषदेमध्ये कृत्रिम बुध्दिमत्ता व मधुमेह आणि मधुमेह व्यवस्थापनामध्ये फॅटी लिव्हर (यकृताचा विकार) या विषयांवर कार्यशाळा, तसेच एंडोक्रोनोलॉजी व महिला आरोग्य या विषयावर परिसंवाद देखील घेण्यात येणार आहेत.





## पुणे महानगरपालिका

माहिती व तंत्रज्ञान विभाग : निविदा जाहिरात

विक्री कालावधी दिनांक :-२७/०२/२०२६ ते ०६/०३/२०२६ दुपारी २:३० पर्यंत

स्विकृती दिनांक :-२७/०२/२०२६ ते ०६/०३/२०२६ दुपारी २:३० पर्यंत

तांत्रिक निविदा उघडणे प्रक्रिया दिनांक:-०७/०३/२०२६ दुपारी ३:०० वा.

| निविदा. क्र. | खात्याचे नाव | कामाचे नाव | निविदा संच किंमत रु. | अंदाजित पूर्व गणित रक्कम रू. | बयाणा रक्कम रू. | कामाची मुदत | निविदा विषयक जबाबदार व्यक्तीचे नाव व दूरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| PMC/IT/2025/ 20 | माहिती व तंत्रज्ञान विभाग | मेट्रोपोलिटन सर्व्हिलंस युनिट (MSU)साठी नेटवर्क इन्फ्रास्ट्रक्चर उपलब्ध करून देणेबाबत. | 1359/- | B-2 पद्धत | ३७०००/- | १ वर्षे | श्री. प्रदिप प्रभाकर रसाळ, संगणक प्रोग्रॅमर मो. नं. ९६८९९३१५१० |

अ) पुणे म.न.पा.ची वरील कामे ही अनुभवी / म.न.पा. मान्यता प्राप्त / शासन मान्यता प्राप्त ठेकेदारांकडुन (कामासाठीच्या पुर्वपात्रता अटी टेंडर सेट मध्ये नमुद केल्यानुसार) करून घ्यावयाची आहेत.

ब) सदर कामांबाबत निविदा अटी/शर्ती इ. बाबतचा सर्व तपशिल निविदा संचामध्ये नमूद केला असून सदर कामांचे निविदा संच www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर पाहण्यासाठी उपलब्ध आहे. निविदा संचाची विक्री व स्वीकृती सदर वेबसाईटवरून फक्त ऑनलाईन पद्धतीने करण्यात येत असून सर्व निविदा दोन पाकिट पद्धतीने मागविण्यात येत आहेत.

क) निविदा विक्रीच्या शेवटच्या दिवशी निविदा संच प्राप्त न झाल्यास व स्विकृतीच्या शेवटच्या दिवशी ऑनलाईन सादरीकरण न झाल्यास याची सर्वस्वी जबाबदारी टेंडरदाराची राहील.

ड) कार्यालयीन आदेश क्र. अतीमआ (वि)/३२ दिनांक २२/०४/२०१६ नुसार बयाणा रक्कम इ.सी.एस./आर.टी.जी.एस./एन.ई.एफ.टी. सुविधेमार्फतच स्विकारण्यात येणार आहे.

सही/-
संगणक प्रोग्रॅमर
माहिती व तंत्रज्ञान विभाग
पुणे महानगरपालिका

सही/-
उप अधिक्षक
माहिती व तंत्रज्ञान विभाग
पुणे महानगरपालिका

जाहिरात क्र. २/१७७० दि. २६/०२/२०२६

## थोडक्यात पण महत्वाचे...




### कुदळे फौंडेशनकडून 17 व्या रुग्णवाहिकेचे लोकार्पण

पिंपरी (दैनिक संध्या) : कुदळे फौंडेशन आणि लायन्स क्लब ऑफ पुणे शताब्दी यांच्या संयुक्त विद्यमाने वडकी येथे रुग्णवाहिकेचे लोकार्पण करण्यात आले. एस कारझचे प्रमुख दीपक नाना कुदळे यांनी आजतागायत १७ रुग्णावाहिका जनतेच्या सेवेत रुजू केल्या आहे. जुन्या मारुती डीलर, एस कुदळे कार च्या ,निष्ठावान ग्राहकांच्या आग्रहाखातर 'ऐस कारझ (Ace Carz)' या मल्टी-ब्रँड सर्व्हिसिंग सेंटर वडकी येथे सुरु करण्यात आले आहे. यासाठी फुरसुंगी नगर परिषद अध्यक्ष संतोष सरोदे यांचे सहकार्य लाभले. याप्रसंगी फुरसुंगी-उरुळी देवाची नगरपरिषद गटनेत्या नगरसेविका अमृता धनंजय (आप्पा) कामठे, पंचायत समिती सदस्या विद्या दत्तात्रय गायकवाड,कुदळे समूहाचे प्रमुख दीपकनाना कुदळे, व्यवस्थापकीय संचालक नीरज कुदळे, नाना मोडक, प्रा. दिलीप मोडक, महाराष्ट्र केसरी दत्ता गायकवाड आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. मान्यवरांच्या मागणीनुसार, कुदळे ग्रुपने आपली १७ वी रुग्ण वाहिका वडकी व फुरसुंगी ग्रामस्थ आणि भुजबळ हॉस्पिटलसाठी पूर्णपणे मोफत उपलब्ध करून दिली आहे. जागतिक दर्जाची कार सर्व्हिस आणि सामाजिक बांधिलकी यांचा वारसा जपत ऐस कारझ ने ही नवी सेवा सुरू केली आहे.



### गोवा स्केटिंग स्पर्धेत ड्रीम्झ आणि टॉपर्स स्केटिंग क्लबचे यश

पिंपरी (दैनिक संध्या) : पिंपळे सौदागर येथील नाना काटे सोशल फाउंडेशन ड्रीम्झ - एआय एस ड्रीम्झ स्केटिंग क्लब व टॉपर्स स्केटिंग क्लब ने गोव्या मध्ये झालेल्या स्केटिंग स्पर्धेत उल्लेखनीय यश मिळवत भव्य कामगिरी केली. क्लबच्या खेळाडूंनी विविध गटांमध्ये पदके जिंकत आपला ठसा उमटवला.गोवा स्केटिंग फेस्टिवल स्पर्धेत १८ विविध राज्यांतील ७०० खेळाडूंनी सहभागी झाले होते. अभिमानाची बाब म्हणजे या सर्व विजेत्या खेळाडूंची आंतरराष्ट्रीय स्पर्धांसाठी भारताचे प्रतिनिधित्व करण्यासाठी निवड झाली आहे. त्यामुळे क्लब, पालकवर्ग आणि पुणे शहरासाठी हा अत्यंत गौरवाचा क्षण आहे. या यशामागे क्लबचे प्रशिक्षक वैभव बीळगी, राहुल बीळगी, वंदना बीळगी, सूरज दीक्षित, राजेश व प्रिनल शर्मा, चिंतामण राऊत, समृद्धी शेटे, मायकल मॅथ्यू, प्रतीक पांचाळ, लोहित कुलकर्णी व रंजना मॅडम यांचे मार्गदर्शन, परिश्रम मोलाचे ठरले. त्यांच्या सातत्यपूर्ण प्रशिक्षणामुळेच खेळाडूंना आंतरराष्ट्रीय स्तरावर यश मिळवता आले. या स्पर्धेत संकेत थट्टे, देवेंद्र नेमाडे, शशांक विश्वकर्मा व कोमल शशीधरण यांनी प्रशिक्षक म्हणून कामकाज पाहिले. सहभागी व विजयी स्पर्धकांचे अभिनंदन व सत्कार करत नगरसेवक नाना काटे यांनी स्पर्धकांना शुभेच्छा दिल्या.



### डॉ. प्रवीण बढे यांना 'विद्यासागर मानद उपाधी' प्रदान

पिंपरी (दैनिक संध्या) : साहित्य, सांस्कृतिक, सामाजिक, पर्यावरणीय तसेच आयुर्वेदिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे डॉ. प्रविण बढे यांना भारत सरकार पुरस्कृत मध्य प्रदेशातील इतिहास व पुरातत्व शोध संस्थानच्या वतीने 'विद्यासागर मानद उपाधी डॉ. लिट अवार्ड' नुकताच बालाघाट येथे प्रदान करण्यात आला. यावेळी नोबल पुरस्कार निवड समितीचे डॉ वीरेंद्र गहवार, सिनेट प्रेसिडेंट डॉ फिरदोस श्रॉफ यांच्या हस्ते, स्थानिक खासदार आमदार यांच्या उपस्थितीत हा बहुमान प्राप्त झाला. संस्थेच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांनी कृतिशील कार्य, समाजसेवा आणि संशोधनातील योगदानाची दखल घेतली. संस्थेच्या मते, डॉ. बढे यांनी आयुर्वेद, आरोग्य विषयक लेखन, समाजहिताचे उपक्रम, शैक्षणिक मार्गदर्शन व विविध क्षेत्रातील कार्याद्वारे सांस्कृतिक-सामाजिक विकासात विशेष योगदान देत आहे . बढे यांची साहित्यनिर्मिती, संशोधनात्मक दृष्टिकोन, पर्यावरणाबद्दलची जाण व सामाजिक बांधिलकी यामुळे ते अनेकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. संस्थेच्या निवेदनात नमूद केले आहे की, डॉ. बढे यांनी आपल्या लेखणीद्वारे लोकांमध्ये आरोग्य, संस्कृती, अध्यात्म, पर्यावरण आणि समाजजागृतीचा दीप प्रज्वलित ठेवण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करीत आहे. त्यांच्या कार्याचा भावी पिढ्यांनाही निश्चितच लाभ होईल, असा विश्वासही व्यक्त करण्यात आला आहे. डॉ बढे यांना हा मानद सन्मान विशेष कार्यक्रमात प्रदान करण्यात आला.

### प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत 528 कुटुंबांना मिळणार घरे

पिंपरी (दैनिक संध्या) : तळेगाव दाभाडे मधील ५२८ कुटुंबाना हक्काची घरे मिळणार आहेत. प्रधानमंत्री आवास योजना-शहरी २.०' अंतर्गत ११४ कोटींच्या खर्चाने की घरे उभारली जात असून तळेगाव दाभाडे शहरातील सर्वसामान्य आणि गरजू नागरिकांचे हक्काच्या घराचे स्वप्न आता सत्यात उतरणार आहे, अशी माहिती आमदार सुनील शेळके यांनी दिली आहे. २३ फेब्रुवारी २०२६ रोजी नवी दिल्ली येथे गृहनिर्माण आणि शहरी व्यवहार मंत्रालयाच्या सचिवांच्या अध्यक्षतेखाली केंद्रीय मंजुरी आणि देखरेख समितीच्या सहाव्या बैठकीत देशभरातील २.८८ लाख अतिरिक्त घरांच्या बांधकामाला मंजुरी देण्यात आली. त्यामध्ये तळेगाव दाभाडे शहरातील सुमारे ५२८ घरकुलांचा समावेश असून ११४ कोटी रुपयांची प्रशासकीय मान्यता या प्रकल्पाला मिळाली आहे. या योजनेमुळे केवळ घरकुल उपलब्ध होणार नाही, तर शहराच्या पायाभूत सुविधांनाही मोठी चालना मिळणार असल्याचे आमदार शेळके यांनी सांगितले. यामुळे पहिल्याच टप्प्यात नगराध्यक्ष व नगरसेवकांसाठीही ही मोठी विकासाची भेट ठरली असून सर्वसामान्य नागरिकांच्या जीवनमान उंचावण्याचा मार्ग मोकळा केला आहे. तळेगाव दाभाडे नगरपरिषद हद्दीतील नागरिकांना हक्काचे घर मिळण्याचा मार्ग अधिकृतपणे मोकळा झाला आहे. शासन निकषांनुसार आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील नागरिकांचा सर्व्हे करून दि. २६ डिसेंबर २०२५ रोजी प्रस्ताव सादर करण्यात आला होता. शहरातील साधारण २५०० नागरिकांनी अर्ज दाखल केले असून त्यापैकी सद्यस्थितीत ५६८ लाभार्थ्यांना घरकुलाचा लाभ मिळणार आहे.

# रक्षक चौकातील उड्डाणपूलाचा उतार कमी करा

■ खासदार श्रीरंग बारणे यांच्या अधिकाऱ्यांना सूचना : खासदारांकडून पुलाची पाहणी; भविष्यात अपघात झाल्यास कन्सल्टंटवर गुन्हा ■

पिंपरी (दै. संध्या) :

औंध-रावेत बीआरटी रोडवरील रक्षक चौकात उड्डाणपुलाचे काम सुरु आहे. उड्डाणपूल उभारताना कंत्राटदाराने उताराच्या तांत्रिक बाबीकडे पुरेसे लक्ष दिलेले दिसत नाही. तीव्र उतारामुळे भविष्यात अपघात होऊ शकतात. त्यासाठी या उड्डाणपुलाची लांबी वाढवून उतार कमी करण्याचे निर्देश शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी महापालिका अधिकाऱ्यांना दिले आहेत. उपययोजना न करता पूल खुला केल्यास आणि भविष्यात पुलावरील उतारावरुन पडल्याने अपघात झाल्यास कन्सल्टंट, अधिकाऱ्यांवर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याचा इशारा खासदार बारणे यांनी दिला आहे.



खासदार बारणे यांनी गुरुवारी प्रत्यक्ष पुलाच्या कामाची पाहणी केली. इंफ्राकिंग कन्सल्टिंग प्रा. लि. कंपनीचे सीईओ डॉ. संजय नाईक, महापालिकेच्या सह शहर अभियंता प्रेरणा सिनकर, कार्यकारी अभियंता सुनिल पवार, कार्यकारी अभियंता संध्या वाघ, उपअभियंता निलेश दाते, प्रोजेक्ट मॅनेजर धनाजी मिसाळ, कनिष्ठ अभियंता प्रणिता पिंजन यावेळी उपस्थित होते. खासदार बारणे म्हणाले, पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने औंध-रावेत बीआरटी रोडवरील रक्षक चौकात सध्या उड्डाणपुलाचे काम सुरु आहे. हे काम आता अंतिम टप्प्यात आले आहे. परंतु, पुलाची पाहणी केली असता पुलाचा दोन्ही बाजूंचा उतार अत्यंत तीव्र आहे. उताराचा भाग तुलनेने अधिक असल्याने भविष्यात अपघाताची शक्यता टाळण्यासाठी आवश्यक ती खबरदारी घेणे अत्यावश्यक आहे. यापूर्वी निगडी येथील मधुकर पवळे उड्डाणपुलाचा उत्तारही असाच तीव्र झाल्याने तिथे सातत्याने अपघात होतात.

रक्षक चौक हा वर्दळीचा व वाहतुकीचा रस्ता असल्याने या तीव्र उतारामुळे भविष्यात येथेही मोठे अपघात होण्याची दाट शक्यता आहे. या पुलाचे कन्सल्टंट में इन्फाकिंग कन्सल्टिंग इंजिनिअरिंग प्रायव्हेट लिमिटेड आणि ठेकेदार मे.टी अ‍ॅन्ड टी इन्फा लिमिटेड व महापालिका अधिकारी यांनी उताराच्या तांत्रिक बाबीकडे पुरेसे लक्ष दिलेले दिसत नाही. या कामाची निविदा २२.७७ कोटी रुपयांची आहे. या ठेकेदारास आता पर्यंत ७५ टक्के रक्कम देण्यात आली आहे. संभाव्य अपघातांचा धोका टाळण्यासाठी पुलाची लांबी वाढवावी. उतार कमी करण्याबाबत तांत्रिक फेरविचार करावा. या कामासाठी झालेला खर्च, कामाची सुरुवात आणि तांत्रिक माहिती यांचा आढावा घेऊन तात्काळ दुरुस्तीचे आदेश द्यावेत, अशी सूचना खासदार बारणे यांनी केली आहे.

#### ...तर कन्सल्टंट, अधिकाऱ्यांवर गुन्हा

उतार कमी करण्यासाठी आवश्यक सुधारणा कराव्यात. योग्य संकेतचिन्हे आणि तांत्रिक उपाययोजना करण्यात याव्यात. विकासासोबत सुरक्षिततेलाही तेवढेच महत्त्व दिले पाहिजे, अशी ठाम भूमिका खासदार बारणे यांनी घेतली. सुचना देऊनही चुका केल्यास आणि पुल कार्यरत झाल्यानंतर अपघात झाल्यास कन्सल्टंट व अधिकाऱ्यांवर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करणार असल्याचा इशारा खासदार बारणे यांनी दिला.

## पिंपरी चिंचवड महापालिकेचा दणदणीत विजय

पिंपरी (दै. संध्या) :

पुणे आंतर कचेरी असोसिएशनतर्फे आयोजित अंतरकचेरी व्हॉलीबॉल स्पर्धा दि. १४ व १५ फेब्रुवारी २०२६ रोजी पुण्यातील डेक्कन जिमखाना व्हॉलीबॉल कोर्ट येथे उत्साहात पार पडली. या प्रतिष्ठित स्पर्धेत पिंपरी चिंचवड महापालिकेने पुन्हा एकदा आपला दबदबा कायम ठेवत विजेतेपद पटकावले. एकूण १४ खेळाडू, संघव्यवस्थापक आणि मार्गदर्शकांसह महापालिकेच्या दोन संघांनी या स्पर्धेत सहभाग घेतला. सदर संघात महापालिकेच्या बांधकाम परवानगी विभाग, पर्यावरण अभियांत्रिकी विभाग, अग्निशामक विभाग, सुरक्षा विभाग, पाणीपुरवठा विभाग, माध्यमिक शिक्षण मंडळ, क्रीडा विभाग, कीटकनाशक विभाग आणि उद्यान विभाग अशा विविध विभागांतील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या समावेश होता. विभागनिहाय एकत्रित सहभागामुळे या विजयाला अधिक व्यापक आणि प्रेरणादायी महत्त्व प्राप्त झाले. अंतिम सामन्यात पिंपरी चिंचवड महापालिका 'अ' संघाने जबरदस्त खेळ कौशल्य सादर करत पुणे शहर पोलीस संघाचा २–० असा धुव्वा उडवला. संघातील कर्णधार सुहास नाईक, उपकर्णधार दशरथ वाघोले, सोमनाथ वीर, विजय गांगुर्डे, अजय घोगरे, संस्कार चव्हाण आणि अंकुश लोहकरे यांनी उत्कृष्ट खेळी करून संघाची ताकद अधोरेखित केली.

## बदलत्या काळानुसार पत्रकारांनी तंत्रस्नेही होणे गरजेचे – प्रा. सुशोभन पाटणकर

*मराठी भाषा गौरव दिनाचे औचित्य साधून पत्रकारांसाठी एआय (कृत्रिम बुद्धिमत्ता) विषयक विशेष व्याख्यान*

पिंपरी (दै. संध्या) :

"पत्रकारांनी बदलत्या काळानुसार तंत्रस्नेही होणे ही आजची अत्यावश्यक गरज आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता हे पत्रकारांच्या नोकऱ्यांसाठी धोका नसून त्यांच्या कामाची गुणवत्ता आणि गती वाढवणारे प्रभावी साधन आहे. बातमीसाठी आवश्यक माहिती संकलन, विश्लेषण आणि संशोधन प्रक्रिया एआयमुळे अधिक वेगवान झाली आहे. मात्र, एआयचा वापर करताना संबंधित वाचकवर्ग लक्षात घेऊन योग्य प्रॉम्प्ट तयार करणे आणि प्राप्त माहितीची पडताळणी करणे तितकेच महत्त्वाचे आहे. बदलत्या तंत्रज्ञानाशी जुळवून घेत पत्रकारांनी एआयचा प्रभावी वापर केल्यास त्यांची बातमी अधिक नेमकी, विश्वसनीय आणि वेगळी ठरू शकते," असे प्रतिपादन सिंबायोसिस आंतरराष्ट्रीय अभिमत विद्यापीठाच्या माध्यम व जनसंज्ञापन विभागाचे उपसंचालक प्रा. सुशोभन पाटणकर यांनी केले.



पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने महापौर रवि लांडगे, आयुक्त श्रावण हर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच उपमहापौर शर्मिला बाबर यांच्या विशेष उपस्थितीत मराठी भाषा गौरव दिनानिमित्त चिंचवड येथील ऑटो क्लस्टर सभागृहात प्रसार माध्यम प्रतिनिधींसाठी विशेष मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात आले होते. "पत्रकारिता क्षेत्रात एआय (कृत्रिम बुद्धिमत्ता) तंत्रज्ञानाचा उपयोग" या विषयावर सिंबायोसिस आंतरराष्ट्रीय अभिमत विद्यापीठाच्या माध्यम व जनसंज्ञापन विभागाचे उपसंचालक प्रा. सुशोभन पाटणकर यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते, त्यावेळी ते बोलत होते.

या व्याख्यानादरम्यान विशेष अधिकारी तथा मराठी भाषा समन्वय अधिकारी किरण गायकवाड, ज्येष्ठ पत्रकार विवेक इनामदार, अविनाश चिलेकर, नंदकुमार सातुर्डेकर हे विचारपीठावर उपस्थित होते.

## सांगवीत पवनाथडी जत्रेचे मान्यवरांच्या उपस्थितीत उद्घाटन

पिंपरी (दै. संध्या) :

पिंपरी चिंचवड शहरातील महिला बचत गटांनी तयार केलेल्या वस्तू व खाद्यपदार्थांच्या विक्रीसाठी पवनाथडी जत्रा हे एक मोठे व्यासपीठ ठरले आहे. जत्रेत सहभागी असलेल्या स्टॉलधारक महिलांनी आपला व्यवहार डिजिटल पद्धतीने करावा, ज्यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेला हातभार लागेल. पवनाथडी जत्रेच्या माध्यमातून महिलांचे आर्थिक सक्षमीकरण करण्यासोबतच त्यांचे मनोधैर्य वाढविण्यावर पिंपरी चिंचवड महानगरपालिका भर देत आहे. पिंपरी चिंचवड शहरात भविष्यात महिलांसाठी मोठ्या प्रमाणावर रोजगारनिर्मिती कशी करता येईल, यासाठी महापालिका निश्चितच पुढाकार घेईल, असे प्रतिपादन आमदार शंकर जगताप यांनी केले.



महिला बचत गटांच्या उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने दिनांक २६ फेब्रुवारी ते १ मार्च २०२६ या कालावधीत पवनाथडी जत्रेचे आयोजन करण्यात आले आहे. या जत्रेचे उद्घाटन चिंचवड विधानसभेचे आमदार शंकर जगताप यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ते बोलत होते.

या उद्घाटनप्रसंगी उपमहापौर शर्मिला बाबर, सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, माजी महापौर शकुंतला धराडे,नगरसदस्य शत्रुघ्न काटे, अभिषेक बारणे, शाम जगताप,कुणाल व्हावळकर, धर्मपाल तंतरपाळे, ज्ञानेश्वर उर्फ माऊली जगताप, बाबासाहेब त्रिभुवन,संजय काटे, प्रभाकर वाघेरे, तानाजी बारणे, नगरसदस्या तृप्ती कांबळे, उज्वला ढोरे,अनुराधा गोरखे,आरती चौंधे,मनिषा पवार, सुषमा तनपुरे,दिप्ती कांबळे,पल्लवी जगताप, निता पाडाळे,सुप्रिया चांदगुडे, नीता जगताप, सारिका मासुळकर,रविना आंगोळकर,योगिता नागरगोजे, कुंदा भिसे,अनिता काटे,सविता खुळे,दिप्ती कांबळे,अर्चना तापकीर, महापौर यांच्या पत्नी श्रध्दा लांडगे, तसेच अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर, विक्रांत बगाडे, समाज विकास विभागाच्या उपायुक्त ममता शिंदे, उप आयुक्त सिताराम बहुरे,संदीप खोत,अर्चना केरूरे, महापालिकेचे क्षेत्रीय अधिकारी,विविध विभागातील कर्मचारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## दिशा फाउंडेशनच्यावतीने महापौर आणि नगरसेविका यांचा सत्कार

पिंपरी (दै. संध्या) :

दिशा सोशल फाऊंडेशनच्या वतीने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे नवनिर्वाचित महापौर रवीभाऊ लांडगे आणि नगरसेविका अरुणा लंगोटे यांचा नुकताच सत्कार करण्यात आला. सत्कारासाठी बुके किंवा इतर भेटवस्तू न देता पुस्तके व वह्यांचे संच द्यावेत, असे आवाहन महापौर रवी लांडगे यांनी केले होते. त्यानुसार, दिशा सोशल फाऊंडेशनचे माजी कार्याध्यक्ष सचिन साठे आणि संचालक अ‍ॅड. अविनाश ववले यांच्या हस्ते वह्या व शालोपयोगी वस्तू देऊन महापौरांचा सत्कार करण्यात आला. तसेच युवा उद्योजक शिवराज काटे यांचादेखील सन्मान कार्याध्यक्ष राजेंद्र करपे यांच्या हस्ते करण्यात आला.

यावेळी भारतीय जनता पार्टीचे माजी शहराध्यक्ष सदाशिव खाडे, दिशा सोशल फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष बाळासाहेब जवळकर, माजी अध्यक्ष गोरख भालेकर, संचालक गणेश लंगोटे, राजेश सावंत, शरीफ शेख आदी उपस्थित होते.

दिशा सोशल फाऊंडेशनचे संचालक गणेश लंगोटे यांच्या पत्नी अरुणाताई लंगोटे यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नगरसेविका (प्रभाग क्रमांक १४) येथून निवड झाल्याबद्दल दिशा सोशल फाऊंडेशनच्या वतीने त्यांचा घरगुती स्वरूपात छोटेखानी सत्कार करण्यात आला. मोहननगर येथील लंगोटे यांच्या संपर्क कार्यालयात हा हृद्य सोहळा संपन्न झाला.


# गृह निर्माण प्रकल्पात पुढील दोन वर्षात पक्की घरे देण्यात येतील

**मुख्य कार्यकारी अधिकारी सतीशकुमार खडके**

पिंपरी (दै. संध्या) :

सिद्धार्थनगर, नगर रोड (रामवाडी परिसर) येथील अनधिकृत झोपडपट्टी क्षेत्रावर दि. २५ फेब्रुवारी २०२६ रोजी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामार्फत (एसआरए) व्यापक निष्कासन कारवाई करण्यात आली. महानगरपालिका, पोलीस विभाग तसेच इतर संबंधित शासकीय यंत्रणांच्या समन्वयातून पार पडलेल्या या कारवाईत एकूण २१६ अनधिकृत झोपड्या हटविण्यात आल्या असून संबंधित भूखंड पूर्णतः रिकामा करण्यात आला आहे. प्राधिकरणाच्या इतिहासातील ही आतापर्यंतची सर्वात मोठी आणि नियोजनबद्ध कारवाई असल्याची माहिती मुख्य कार्यकारी अधिकारी सतीशकुमार खडके यांनी दिली. सदर कारवाई सर्व्हे क्रमांक २०४, २०५, २१४५ पैकी व २१४६ पैकी, येरवडा, पुणे येथील झोपडपट्टी क्षेत्रात सकाळी ७ ते दुपारी २ या कालावधीत शांततेत आणि नियोजनपूर्वक पार पडली. कारवाईपूर्वी संबंधित झोपडीधारकांना नोटिसा देण्यात आल्या होत्या. तसेच संभाव्य कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न उद्भवू नये यासाठी पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

उपजिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी अर्चना यादव यांच्या नेतृत्वाखाली तहसीलदार गीता दळवी, रमेश पाटील, सुषमा पैकेकरी , सहाय्यक निबंधक अधिकारी पंढरीनाथ घुगे, नायब तहसीलदार गणेश देसाई, पोलीस निरीक्षक बागवान, पुणे महानगरपालिका अतिक्रमण विभागाचे प्रमुख सोमनाथ चनकर, प्रकाश बालगुडे तसेच महावितरण, अग्निशमन दल व स्थानिक पोलीस



दलाचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

विविध विभागांमध्ये समन्वय साधत यंत्रसामग्रीच्या सहाय्याने अतिक्रमण हटविण्याची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली.

कारवाईदरम्यान नागरिकांशी संवाद साधून कायदेशीर प्रक्रिया स्पष्ट करण्यात आली. पात्र ठरलेल्या रहिवाशांना पर्यायी निवासाची व्यवस्था उपलब्ध करून देण्यात आली आहे. रस्ता रुंदीकरणामुळे बाधित झालेल्या झोपडीधारकांना पुणे महानगरपालिकेमार्फत ज्ञाती व इलेसिया, खराडी येथील गृहनिर्माण प्रकल्पांमध्ये घरे उपलब्ध करून देण्याची कार्यवाही सुरू आहे. तसेच लाभार्थ्यांच्या मागणीनुसार सिद्धार्थनगर येथेच उभारण्यात येत असलेल्या पुनर्वसन प्रकल्पात पुढील दोन वर्षांत पक्की घरे उपलब्ध करून देण्यात येतील, अशी माहितीही श्री. खडके यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली. या कारवाईमुळे संबंधित भूखंडावरील अतिक्रमण पूर्णतः दूर झाले असून नियोजित विकासकामांना गती मिळणार आहे. भविष्यातही अनधिकृत बांधकामांविरुद्ध अशाच प्रकारे कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही प्राधिकरणाने दिला आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...

### मोडक इंटरनॅशनल स्कूलमध्ये विज्ञान प्रदर्शन व हेल्थ चेकअप कार्यक्रमाचे आयोजन



वडकी (दैनिक संध्या) : "वडकी:-इंटरनॅशनल स्कूलमध्ये विज्ञान प्रदर्शन आणि हेल्थ चेकअप आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी विज्ञान प्रकल्पांचे माध्यमातून कल्पना शक्तीला चालना दिली. या कार्यक्रमाचे उद्घाटन शाळेमध्ये आलेल्या प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले. विद्यार्थ्यांनी विविध विषयांवर आधारित विज्ञान प्रकल्प सादर केले, ज्यामध्ये पर्यावरण संरक्षण, ऊर्जा संवर्धन, आणि आरोग्य विज्ञान यांचा समावेश होता. हेल्थ चेकअपमध्ये विद्यार्थ्यांच्या उंची, वजन, रक्तदाब, आणि इतर आरोग्य तपासण्या करण्यात आल्या. त्याचबरोबर विज्ञान प्रदर्शनामध्ये आपल्या मुलांच्या कौशल्याचे व कलागुणांनाचे कौतुक करण्यासाठी पालकांची ही मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते. या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती डॉ. चैत्राली राऊत, डॉ. गौरी महाकंकाळ, शर्मिला शॉ, सचिन झांबरे,माजी सरपंच अरुण दादा गायकवाड, मोडक स्कूलचे संजय मोडक, मनिषा मोडक,माऊली मोडक, श्रावणी मोडक, नारायण गायकवाड तसेच सर्वशिक्षक वृंद. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेच्या शिक्षकांनी आणि विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले. या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांना विज्ञान आणि आरोग्याबद्दल जागरूकता वाढण्यास मदत झाली.

### मोटार वाहन टॅक्स भ्रष्टाचार प्रकरणी उपलोकायुक्तांकडून कारवाईचा बडगा !

- मोटार वाहन निरीक्षकांसह टंकलेखकांवर वेतन रोखण्याची कारवाई!
- राष्ट्रीय मानव हक्क मंचाचे अध्यक्ष शरद धुमाळ यांचे पाठपुरावा यशस्वी!

भिवंडी (दैनिक संध्या) : प्रादेशिक परिवहन कार्यालय ठाणे अंतर्गत येत असलेल्या नवी मुंबई उपप्रादेशिक परिवहन कार्यालयातील अधिकारी कर्मचारी यांनी एकूण ८५० वाहनांच्या प्रकरणात ४.० या संगणक प्रणालीवर जुन्या वाहनांची एन्ट्री घेताना सीबीआर नोंदी अद्यावत न करता टॅक्स क्लिअरन्स अप्रुवल बिले म्हणून शासकीय महसूल हानी झाल्याचे निदर्शनास आल्याने मोटार वाहन निरीक्षक शैलेशकुमार कोपुल्ला आणि लिपिक टंकलेखक मयूर हटकर व सुहास पवार यांचेवर वेतन रोखण्याची कारवाई करण्यात आली आहे हा प्रकार चौकशीनिहाय अहवालामुळे उघड झाल्याने परिवहन विभागात एकच खळबळ माजली आहे. सविस्तर वृत्त असे की, परिवहन जुन्या वाहनांची बॅकलॉग एन्ट्री, टॅक्स क्लिअरन्स व्हेरिफिकेशन व अप्रुव्हल देऊन शासकीय महसुलाची हानी/नुकसान केले जाते असे निवेदन राष्ट्रीय मानव हक्क मंचाचे अध्यक्ष शरद काशिनाथ धुमाळ यांनी परिवहन विभागाकडे तक्रारी दाखल केल्या होत्या, मात्र त्याकडे दुर्लक्ष केल्याने मा.उपलोकायुक्त कार्यालयाकडे तक्रारी दाखल केल्याने चौकशीचे सत्र फिरून अखेर दोषी मोटार वाहन निरीक्षक शैलेशकुमार कोपुल्ला तसेच लिपिक टंकलेखक मयूर हटकर आणि सुहास पवार यांच्यावर पुढील १ वर्षाकरिता वेतन वाढ रोखण्याची कारवाई/ शिक्षा लादण्यात आली आहे, यामुळे परिवहन विभागात एकच खळबळ माजली आहे.

### शिस्तभंगाच्या कारवाईची मनसेची मागणी!

भिवंडी (दैनिक संध्या) : पंचायतराज व्यवस्थेतील महत्त्वाचा संविधानिक कणा असलेल्या ग्रामपंचायतीत काम करणारे लोकसेवक तथा ग्रामविकास अधिकारी म्हणून काम करणाऱ्या शरद हरी फर्डे यांचेवर नियमबाह्य बदलीची कारवाई शेलार ग्रामपंचायत येथून कुकसे ग्रामपंचायत कार्यालयात अवघ्या दोन महिन्यात केल्याने त्यांची नियमबाह्य बदली करणाऱ्या प्राधिकरणावर शिस्तभंगाची कारवाई करावी असे निवेदन महाराष्ट्र नवनिर्माण सेना उपतालुका अध्यक्ष आकाश नरेश दिनकर यांनी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद ठाणे यांचे कार्यालयाकडे केली आहे. ग्रामपातळीवर अधिकाऱ्यांच्या बदल्यांमध्ये ही अधिनियमाचे काटेकोर पालन होणे आवश्यक आहे, असे निवेदनात नमूद आहे, मात्र प्रशासनात पारदर्शकता कायद्याचे राज्य सुशासन यावर भर न देता दबाव व मनमानी कारभारामुळे शेलार ग्रामपंचायतीत कार्यरत असणारे ग्रामविकास अधिकारी शरद हरी फर्डे यांचेवर केवळ दोन महिन्यात बदली कारवाई करून त्यांची नियमबाह्य बदली कुकसे (पडघा) येथे करण्यात आली आहे. सदर बदली प्रकरणी बदल्या व पदस्थापना अधिनियम २००५ अन्वये चौकशीनिहाय संबंधितांवर कारवाई करावी, अशी मागणी मनसेने केली आहे. शिस्तभंगाची कारवाई होऊन अशा प्रकारचे उल्लंघन होऊ नये असे निर्देश देण्यात यावे अशी मनसेची मागणी आहे.

### संत तुकाराम महाराज शिळा मंदिरात मूर्ती प्राणप्रतिष्ठा वर्धापन दिन उत्साहात साजरा

लोहगाव (दैनिक संध्या) : लोहगाव येथील संत तुकाराम महाराज यांच्या शिळा मंदिरात मूर्ती प्राणप्रतिष्ठा १० व्या वर्धापन दिनानिमित्ताने शिळा मंदिर प्रतिष्ठान व समस्त ग्रामस्थ लोहगाव यांच्या वतीने हरिनाम सप्ताह उत्साहात साजरा करण्यात आला गुरुबाबा औसेकर महाराज याचे आशीर्वादानेव गुरुवर्य सद्गुरूनाथ माऊली महाराज वाळुंजकर यांच्या शुभहस्ते वीणा व गाथा पूजन करून लोहगावचे माजी सरपंच पांडुरंग खेसे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरवात करण्यात आली.आठ दिवस चालणाऱ्या कार्यक्रमात गाथा पारायन व्यासपीठ चालक म्हणून हभप गोरक्षनाथ वर्पे महाराज हे होते. काकड आरती,गाथा पारायन ,महिला भजनी मंडळाचे भजन ,हरिपाठ ,कीर्तन , हरीजागर व दररोज महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. कीर्तनकार वारकरी भुषण हभप गणेश महाराज खेडकर ,हभप मंगेश महाराज कदम ,हभप ज्ञानेश्वर महाराज वाबळे , हभप केशव महाराज पवार , हभप पांडुरंग शास्त्री शितोळे , औसा संस्थांचे पाचवे पिठाधिपती समर्थ सद्गुरु ह भ प श्री गुरुबाबा महाराज औसेकर, ह भ प आचार्य हरिदास महाराज पालवे शास्त्री, ह भ प गुरुवर्य पंडित महाराज क्षीरसागर यांच्या काल्याच्या कीर्तनाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

### ताम्हिणी घाटाला पर्याय ठरणार 'हा' नवा मार्ग

ताम्हिणी घाट (दैनिक संध्या) : पुणे आणि कोकणाला जोडणारा सर्वात जवळचा आणि निसर्गरम्य मार्ग म्हणून ओळखल्या जाणाऱ्या ताम्हिणी घाट आता पर्याय उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासकीय स्तरावर वेगाने हालचाली सुरू झाल्या आहेत. पावसाळ्यातील दरडींचे संकट आणि अरुंद रस्त्यांमुळे होणारी वाहतूक कोंडी यातून प्रवाशांची सुटका करण्यासाठी नवीन बोगदा किंवा पर्यायी मार्गाचा आराखडा राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडून तयार केला जात आहे. ताम्हिणी घाटाला सुरक्षित पर्याय मिळाल्यास दिघी पोर्ट आणि माणगाव औद्योगिक क्षेत्राला पुण्याशी जोडणे सोपे होईल. रायगड जिल्ह्यातील दिघी पोर्ट येथे जाण्यासाठी पुणे- चांदणी चौक- पौड- ताम्हिणी – माणगाव- दिघी असा मार्ग आहे. पुणे ते दिघी पोर्ट या रस्त्याला केंद्र सरकारने यापूर्वीच राष्ट्रीय महामार्गाचा दर्जा दिला आहे. आता ताम्हिणी घाट हा मोठा असल्याने, तसेच वळणे असल्याने प्रवासासाठी वेळ लागतो. दिघी पोर्ट येथे जड वाहने जाण्यासाठी प्रशस्त मार्ग असणे आवश्यक आहे. जेणेकरून पुण्याहून कोकणात लवकर जाणे शक्य होईल. यामुळे पुण्यासह पश्चिम महाराष्ट्राला याचा फायदा होईल. परिणामी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडून ताम्हिणी घाटाला पर्यायी मार्गाचा विचार करण्यात येत आहे.

# पुणे जिल्हा परिषद यांना सीएसआर फंडातून रुग्णवाहिकेचे हस्तांतरण

नाझरे सुपे (दै. संध्या)

मार्व्हेल इंडिया कंपनी बेंगळुरू यांच्या सहकार्याने त्यांच्या सीएसआर फंडातून पुणे जिल्ह्यातील पानशेत प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी अत्याधुनिक बेसिक सपोर्ट रुग्णवाहिका प्रदान केली आहे. ही रुग्णवाहिका पानशेतच्या डोंगराळ व दुर्गम भागांमध्ये तातडीची वैद्यकीय सेवा घरपोच उपलब्ध करून देणार आहे. या रुग्णवाहिकेचा हस्तांतरणाचा समारंभ जिल्हा परिषद पुणे येथे पार पडला मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.गजानन पाटील यांनी ऑनलाइन माध्यमातून उपस्थित राहून अशा सार्वजनिक खाजगी भागीदारीचे ग्रामीण आरोग्य व्यवस्थेला बळकटी देण्यासाठी असलेले महत्त्व सांगितले ही रुग्णवाहिका पानशेतच्या भौगोलिक परिस्थितीत राहणाऱ्या सर्व गरजू नागरिकांसाठी आरोग्यसेवेतील दरी कमी करण्यास महत्वाची भूमिका बजावेल असे त्यांनी सांगितले. मार्व्हेल इंडिया कंपनीचे प्रतिनिधींनी रुग्णवाहिकेची किल्ली जिल्हा परिषदेचे प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.चंद्रकांत वाघमारे यांच्याकडे दिली. या कार्यक्रमास जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.रामचंद्र हंकारे, डॉ.मृदुला होळकर आणि डॉ.अंबादास देवकर उपस्थित होते. आवश्यक वैद्यकीय सुविधांनी सुसज्ज असलेली ही रुग्णवाहिका पानशेतच्या दुर्लक्षित भागातील नागरिकांसाठी जीवनदायिनी ठरणार आहे.हा उपक्रम जिल्हा परिषद पुणे यांच्या ग्रामीण विकास, महिला कल्याण आणि डिजिटल आरोग्य परिवर्तनाच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांशी सुसंगत आहे.



## बिंदू नामावलीतील चुकीमुळे आदिवासींच्या आरक्षित पदांवर गंडांतर !

भिवंडी (दै. संध्या)

- नोकऱ्यांपासून वंचित ठेवण्याचे षडयंत्र, ट्रायबल फोरमचा आरोप

"अनुसूचित जाती, जमातींचे आरक्षण हे घटनेने बहाल केलेले आहे.या प्रवर्गानंतरच इतर सर्व प्रवर्गाचे बिंदू यायला पाहिजे.परंतू ६ मार्च २०२४ चा शासन निर्णय आदिवासी उमेदवारांना नोकरीपासून वंचित ठेवत आहे.यात २९ मे २०१७ च्या शासन परिपत्रकानुसार दुरुस्ती करुन आदिवासींचा बिंदू पूर्वीप्रमाणे दुसऱ्या क्रमांकावर नोंदवून आदिवासींना घटनात्मक न्याय देण्यात यावा. अन्यथा आदिवासी उमेदवारांना शासकीय सेवेत प्रवेश मिळणार नाही."
**- सुनील झळके कार्याध्यक्ष ट्रायबल फोरम, कोकण विभाग**

शासकीय नोकर भरतीत अनुसूचित जमातीसाठी राखीव जागांची तरतूद आहे.मात्र ६ मार्च २०२४ रोजी निघालेल्या शासन निर्णयात गंभीर चूक झाली आहे.त्यामुळे राखीव जागांची भरती होतांना आदिवासींची अडवणूक होत आहे. अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांचे सार्वजनिक सेवा विषयक आरक्षण हे भारतीय राज्यघटनेच्या कलम १५(४),१६(४),(४क),३३५,३४२ व आरक्षण अधिनियम २००४ नुसार अबाधित आहे.परंतू आता ६ मार्च २०२४ च्या छोटा संवर्ग बिंदूनामावलीतील चुकीमुळे अनुसूचित जमातीच्या आरक्षित पदांवर गदा आली आहे.

अनुसूचित जाती,जमातीचे आरक्षण हे घटनात्मक व आरक्षण कायद्यानुसार असतांना ६ मार्च २०२४ च्या शासन निर्णयानुसार अनुसूचित जमातीच्या उमेदवारांना नोक-यांपासून दूर ठेवण्याचे षडयंत्र रचल्या जात आहे.असा आरोप आदिवासी समाजाच्या घटनात्मक हक्कासाठी लढणाऱ्या 'ट्रायबल फोरम' या संघटनेने केला आहे.

६ मार्च २०२४ छोट्या संवर्ग बिंदूनामावलीचा शासन निर्णय रद्द करुन अनुसूचित जमातीचा बिंदू ,अनुसूचित जातीनंतर दुसऱ्या क्रमांकावर दर्शवून तात्काळ शासन निर्णय निर्गमित करण्याची मागणी ट्रायबल फोरमने या संघटनेने केली आहे.

नोकर भरतीची पदसंख्या ४ असतांना खुल्या प्रवर्गाची २ पदे ठेवावी.उर्वरित दोन पैकी एक अनुसूचित जाती व एक अनुसूचित जमाती राखीव अशी तरतूद २९ मार्च १९९७ , ५ नोव्हेंबर २००९,२९ मे २०१७,७ मार्च २०१८ ,४ जून २०१९,६ जुलै २०२१,२७ फेब्रुवारी २०२४ या शासन निर्णयानुसार करण्यात आली होती.

छोट्या संवर्गात एकूण ४ पदे भरावयाची असेल तर तर १ पद अनुसूचित जाती व १ पद अनुसूचित जमाती व २ खुला संवर्गातून भरल्या जात होते.आता मात्र ८ पदांची जाहिरात असेल तरच अनुसूचित जमातीचा बिंदू येतो. अनुसूचित जातीचा बिंदू कायम असतांना फक्त अनुसूचित जमातीचा बिंदू ६ मार्च २०२४ च्या शासन निर्णयानुसार इतर सर्व प्रवर्गानंतर घेतलेला आहे.

## लोहगावमधील रस्त्याच्या कामाला मुहूर्त कधी लागणार?

लोहगाव (दै. संध्या)

- रस्त्याचे काम सुरू न झाल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा

लोहगाव महापालिकेत समाविष्ट होऊन अनेक वर्षे झाली परंतु लोहगावच्या रस्त्याची समस्या काही सुटता सुटेना असे चित्र स्पष्ट दिसते. रस्त्यावरील खड्डे, धूळ यामुळे रस्त्यावर चालणाऱ्या ज्येष्ठ नागरिक, महिला, शाळकरी मुले यांना या खड्ड्याचा व धुळीचा मोठ्या प्रमाणात त्रास होत आहे,

उखडलेले रस्ते यामुळे धूळ मोठ्या प्रमाणात होते या धुळीमुळे श्वसनाच्या आजारांचा सामना नागरिकांना करावा लागत आहे. यामुळे लोहगावातील सर्वसामान्य नागरिकांचा संयम आता तुटला आहे या विरुद्ध लोहगावातील लोकप्रतिनिधी सह स्थानिक नागरिकांनीही शड्डू खोकला आहे. लोहगाव मधील मुख्य रस्त्यांची कामे आठ दिवसात सुरू करा अन्यथा सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधीक्षक अभियंता कार्यालयासमोर तीव्र असे धरणे आंदोलन करण्याचा इशारा येथील स्थानिक नागरिक व लोकप्रतिनिधींनी दिला आहे. लोहगावची वार्षिक यात्रा जवळ येत असल्याने रस्त्याची अवस्था सुधारणे व रस्त्याची कामे जलद गतीने करणे हे अत्यंत गरजेचे आहे गेल्या अनेक वर्षापासून लोहगाव मधील रस्ते विकासाची कामे ही अडकली आहेत.

## सर्वोच्च न्यायालयाने जामीन फेटाळल्यानंतर आरोपी हजर

लोहगाव (दै. संध्या)

सुनेने माहेराहून पैसे आणावेत यासाठी तिचा हात गरम तव्यावर ठेवणे, पिस्तूल लावून धमकी देणे, गर्भपात करण्यासह विविध पद्धतीने शारीरिक आणि मानसिक छळ केल्याप्रकरणी पती, सासू, सासरा आणि नणंदेविरोधात लोहगाव पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला होता. या प्रकरणी आरोपींच्या वतिने अटकपुर्व जामिनासाठी सत्र न्यायालयात अर्ज करण्यात आले होते. सत्र न्यायालयाने नणंदेचा अर्ज मंजूर करत इतर आरोपींचे अटकपुर्व जामिनाचे अर्ज फेटाळले होते. त्यानंतर आरोपींनी अनुक्रमे उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली. मात्र दोन्ही न्यायालयाने सत्र न्यायालयाचा निकाल कायम ठेवत अटकपूर्व जामीन फेटाळले. त्यानुसार सोमवारी (ता.२३) आरोपी स्वतःहून लोहगाव पोलीस ठाण्यात हजर झाले. संशयित आरोपींना न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्यांना चार दिवसांची पोलीस कोठडी सुनावली. याप्रकरणी पती आदित्य अनिल लोखंडे (वय २८), सासरे अनिल किसन लोखंडे (वय ५३), सासू सुवर्णा (वय ४८, सर्वजण, रा. मरकळ, ता. खेड) अशी अटकेत असलेल्या संशयित आरोपींची नावे आहेत.

## कौशल्य विकास कार्यकारी समितीची बैठक संपन्न

*१३८० उमेदवारांना प्रशिक्षणास प्रशासकीय मान्यता : अल्पकालीन प्रशिक्षण कार्यशाळेचे नियोजन करण्याचे आवाहन*

पुणे (दै. संध्या)

पुणे जिल्ह्यातील सर्व शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था व तांत्रिक विद्यालयांनी कार्यशाळेचे नियोजन करून संबंधित प्रशिक्षण संस्था व उमेदवारांची उपस्थिती सुनिश्चित करावी, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती कदम यांनी केले.

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागांतर्गत पुणे जिल्ह्यात राबविण्यात येत असलेल्या किमान कौशल्य विकास कार्यक्रमांतर्गत विविध अभ्यासक्रमांचे कार्यवाटप करण्यासाठी जिल्हा कौशल्य विकास कार्यकारी समितीची बैठक निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती कदम यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. बैठकीत सहायक आयुक्त सुरेश वराडे यांनी माहिती दिली की, एकूण १३८० उमेदवारांना प्रशिक्षणासाठी प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे. त्यापैकी ९ प्रशिक्षण संस्थांकडून ११७० उमेदवारांना प्रशिक्षण देण्याबाबत प्रस्ताव प्राप्त झाले आहेत. उर्वरित २१० उमेदवारांसाठी इलेक्ट्रिक वाहन असेंब्ली तंत्रज्ञ, फळे व भाजीपाला संरक्षण तंत्रज्ञ तसेच सहाय्यक इलेक्ट्रिशियन या अभ्यासक्रमांच्या एकूण ७ बॅचेससाठी अद्याप प्रस्ताव प्राप्त झालेले नाहीत. संबंधित अभ्यासक्रमांसाठी पात्र प्रशिक्षण संस्थांनी व इच्छुक उमेदवारांनी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, रास्तापेठ, पुणे येथे संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले. अल्पकालीन प्रशिक्षण कार्यक्रम योजनेचा शुभारंभ करण्यात आला असून शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांच्या पायाभूत सुविधांचा वापर करून रोजगारक्षम प्रशिक्षण कार्यक्रम राबविणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. जिल्ह्यातील सर्व शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था व तांत्रिक विद्यालयांमध्ये प्रशिक्षण संस्था व उमेदवारांसाठी अल्पकालीन रोजगारक्षम प्रशिक्षण कार्यक्रम तसेच किमान कौशल्य विकास कार्यक्रम या दोन्ही योजनांविषयी मार्गदर्शन करण्यासाठी एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात येणार आहे.

या कार्यशाळेमार्फत उमेदवारांना विविध प्रशिक्षण संधी, उद्योग क्षेत्रातील रोजगाराच्या संधी, स्वयंरोजगाराचे पर्याय तसेच कौशल्य विकासाशी संबंधित विविध योजनांविषयी सविस्तर माहिती देण्यात येणार आहे.

# 'माझा मराठाचि बोलु कौतुकें'

वि. वा. शिरवाडकर (कुसुमाग्रज) यांचा २७ फेब्रुवारी हा जन्मदिन महाराष्ट्रात 'मराठी भाषा गौरव दिन' म्हणून साजरा केला जातो. हा दिवस केवळ स्मरणाचा नसून आत्मपरीक्षणाचा आणि आत्मगौरवाचा आहे. "माझा मराठाचि बोलु कौतुकें" या संतवचनाच्या प्रेरणेने मराठी भाषेच्या ऐतिहासिक परंपरेचा, साहित्यिक वैभवाचा आणि अभिजात स्वरूपाचा सुसंगत आढावा मराठी भाषा गौरव दिनाच्या पार्श्वभूमीवर...!!

**युवराज पाटील**
जिल्हा माहिती अधिकारी, पुणे




मराठी भाषेची मुळे प्राचीन महाराष्ट्री प्राकृतमध्ये आढळतात. सातवाहन कालखंडात प्रतिष्ठान नगरी म्हणजेच आजचे पैठण हे राजकीय व सांस्कृतिक केंद्र होते. त्या काळात महाराष्ट्री प्राकृत ही लोकव्यवहार, प्रशासन आणि साहित्यनिर्मितीची प्रभावी भाषा होती. सातवाहन राजा राजा हाल यांनी संकलित केलेली गाथा सप्तशती ही काव्यरचना या भाषिक परंपरेचा भक्कम पुरावा मानली जाते. सुमारे २७८ कवींच्या आर्या या ग्रंथात समाविष्ट असून, इ.स.पूर्व दुसरे शतक ते इ.स. दुसरे शतक या कालखंडातील सामाजिक, सांस्कृतिक आणि भावविश्वाचे प्रतिबिंब त्यातून दिसते. प्रेम, निसर्ग, ग्रामजीवन आणि स्त्री-पुरुष संबंधांचे सूक्ष्म दर्शन घडवणारी ही रचना मराठीच्या भावविश्वाची आद्य पायाभरणी ठरते.

महाराष्ट्री प्राकृत ते अपभ्रंश आणि पुढे प्राचीन मराठी असा भाषिक विकासक्रम दिसतो. शिलालेख, ताम्रपट आणि दानपत्रांतून मराठीच्या आरंभीच्या स्वरूपाचे पुरावे मिळतात. यादवकालीन प्रशासनात मराठीचा वापर वाढला. याच काळात मराठीला लोकभाषेचे बळ लाभले आणि ती ज्ञानप्रसाराचे प्रभावी माध्यम बनली.

संतपरंपरेत संत ज्ञानेश्वरांनी मराठी भाषेला तात्त्विक अधिष्ठान दिले. 'भावार्थदीपिका' अर्थात ज्ञानेश्वरी आणि 'अमृतानुभव' या ग्रंथांमधून त्यांनी संस्कृतातील तत्त्वज्ञान लोकभाषेत आणले. "माझा मराठाचि बोलु कौतुकें, परि अमृतातेहि पैजा जिंके" या त्यांच्या वचनातून मराठीच्या अभिव्यक्तीशक्तीवरील अढळ विश्वास प्रकट होतो. त्यानंतर संत नामदेव महाराज, संत एकनाथ महाराज , संत तुकाराम महाराज यांच्यासह वारकरी संप्रदायातील सर्व संत परंपरेमुळे अभंग-ओव्यांतून मराठीची अध्यात्मिक व सामाजिक परंपरा अधिक व्यापक झाली. भक्ती चळवळीने मराठीला लोकमान्यता, लोकसंवाद आणि लोकशक्तीचे माध्यम बनवले.छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्यात मराठी ही केवळ लोकभाषा न ठेवता ती राज्यकारभाराची भाषा बनवली. त्यातूनच राजव्यवहार कोष, पत्रव्यवहार, आज्ञापत्रे यांमधून मराठीची प्रशासकीय ताकद अधोरेखित झाली. स्वराज्य स्थापनेच्या प्रक्रियेत मराठीने स्वाभिमानाचे रूप धारण केले. पुढे पेशवेकाळात आणि नंतरच्या काळात शिक्षणव्यवस्थेत मराठीला नवीन आव्हाने आणि संधी लाभल्या. मुद्रणयंत्राच्या आगमनाने वृत्तपत्रे, ग्रंथप्रकाशन आणि आधुनिक साहित्यप्रकार विकसित झाले.

आधुनिक काळात कादंबरी, नाटक, कविता, ललितलेखन, समीक्षा, पत्रकारिता या सर्व क्षेत्रांत मराठीने स्वतंत्र ओळख निर्माण केली.

वि. वा. शिरवाडकर यांनी "परभाषेच्या कचेरीत आपली भाषा साहेबासारखी वागवा, पण आपल्या घरात ती आईसारखी जपली पाहिजे," असे सांगत भाषिक स्वाभिमानाची जाणीव करून दिली. साने गुरुजी यांनी मातृभाषेबद्दल कृतज्ञता व्यक्त करत तिचे ऋण मान्य करण्याचा संदेश दिला. या विचारांतून मराठी ही केवळ व्यवहाराची नव्हे तर संस्कारांची भाषा आहे, हे स्पष्ट होते.

अलीकडे केंद्र सरकार कडून मराठी भाषेला प्रदान करण्यात आलेला 'अभिजात भाषा' दर्जा हा तिच्या प्राचीन परंपरेचा आणि समृद्ध साहित्यसंपदेचा अधिकृत सन्मान आहे. दोन हजार वर्षांहून अधिक प्राचीन परंपरा, स्वतंत्र साहित्यनिर्मिती, शास्त्रीय ग्रंथसंपदा आणि सततचा भाषिक विकास या सर्व निकषांवर मराठी समर्थपणे उभी आहे. या मान्यतेमुळे संशोधन, शोधनिबंध, विद्यापीठीय अभ्यासक्रम आणि प्राचीन हस्तलिखितांचे जतन यांना नवे बळ मिळणार आहे.

आजच्या डिजिटल युगात मराठीसमोर नवी आव्हाने उभी आहेत. तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता, संगणकीय भाषा प्रक्रिया, ई-ग्रंथालये, सामाजिक माध्यमे या सर्व क्षेत्रांत मराठीची उपस्थिती वाढवणे गरजेचे आहे. प्रशासन, विज्ञान-तंत्रज्ञान, उद्योगव्यवहार आणि उच्च शिक्षण यांमध्ये मराठीचा सशक्त वापर होणे ही काळाची गरज आहे, त्या दृष्टीने शासनही प्रयत्नशील आहे . तरुण पिढीत वाचनसंस्कृती, लेखनसंवेदना आणि भाषिक अभिमान रुजवणे ही आपली सर्वांची सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे.

मराठी भाषा गौरव दिन हा केवळ औपचारिक उत्सव नसून सांस्कृतिक स्व-ओळखीचा उत्सव आहे. मराठी ही महाराष्ट्राच्या अस्मितेचा आधारस्तंभ आहे; तिच्या शब्दांत इतिहासाचा ठसा, संतवाङ्मयाची करुणा, स्वराज्याचा स्वाभिमान आणि आधुनिकतेची झेप सामावलेली आहे.

"माझा मराठाचि बोलु कौतुकें" ही भावना केवळ उच्चारात न राहता कृतीत उतरावी, मराठीचा वापर वाढावा, तिचे संशोधन-संवर्धन व्हावे आणि ती जागतिक पातळीवर अभिमानाने उभी राहावी...हीच मराठी भाषा गौरव दिनानिमित्त अपेक्षा व्यक्त करू या....!!

## पोस्टर्स, बॅनर्स, फ्लेक्स व होर्डिंग्ज लावणाऱ्यांवर होणार कारवाई




भिवंडी (दै. संध्या)

भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका क्षेत्रामध्ये सार्वजनिक रस्ते, पदपथ, उड्डाणपूल, चौक, शासकीय/महानगरपालिका मालमत्ता तसेच खासगी मालमत्तांवर मालकाची परवानगी न घेता मोठ्या प्रमाणावर अनधिकृत पोस्टर्स, बॅनर्स, फ्लेक्स व होर्डिंग्ज लावण्यात येत असल्याची गंभीर बाब निदर्शनास आली आहे. सदर कृत्य हे कायद्यानुसार दंडनीय व बेकायदेशीर आहे. सदर प्रकारामुळे शहराचे सौंदर्य विद्रूप होत असून, सार्वजनिक सुव्यवस्था, वाहतूक सुरक्षा व नागरिकांच्या सुरक्षिततेस बाधा निर्माण होत आहे. ही बाब अत्यंत गंभीर असून याकामी कार्यवाहीचे कठोर आदेश आयुक्त अनमोल सागर(भा.प्र. से.) यांनी प्रभाग समिती क्रमांक १ ते ५ चे सर्व सहाय्यक आयुक्त तथा पदनिर्देशित अधिकारी यांना निर्गमित केले होते. त्यानुसार प्रभाग समिती क्रमांक १ ते ५ चे सर्व सहाय्यक आयुक्त तथा पदनिर्देशित अधिकारी यांचे मार्फत त्यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व अनधिकृत पोस्टर्स, बॅनर्स, फ्लेक्स व होर्डिंग्ज हटविण्याची विशेष मोहीम राबविण्यात आली. यामध्ये एकुण ४२ अनधिकृत पोस्टर, १३८ अनधिकृत बॅनर्स हटविण्यात आले असून एका विरोधात गून्हा दाखल केला आहे. आयुक्त सागर यांच्या मार्फत सदरची विशेष तपासणी मोहीम दर आठवडयाला राबविण्यात येणार असल्याचे सुचित केले असून संबंधित अनधिकृत फलक/ बॅनर्सवर नमूद असलेली नावे, संस्था, राजकीय पक्ष, आयोजक, छपाई करणारे व प्रायोजक यांची जबाबदारी निश्चित करून त्यांच्याविरुद्ध महाराष्ट्र मालमत्ता विद्रुपीकरण अधिनियम, १९९५ अंतर्गत थेट गुन्हा दाखल करावा व हटविण्यात आलेल्या साहित्याचा पंचनामा करून त्याचा संपूर्ण खर्च संबंधित व्यक्ती/संस्था यांच्याकडून वसूल करण्यात यावा असे स्पष्ट निर्देश मा. आयुक्त यांनी प्रभाग अधिकारी यांना दिले आहेत.



# मायबोलीत बोलू या! चला... मराठीतच बोलू या!!

## मराठी भाषा गौरव दिन

प्रवीण टाके
उपसंचालक (माहिती),
विभागीय माहिती कार्यालय,
कोल्हापूर 9702858777

मराठी भाषा हजारो वर्षांच्या इतिहासाने समृद्ध आहे. ही भाषा केवळ संवादाचे साधन नाही, तर आपल्या संस्कृतीचे, ऐतिहासिक परंपरेचे आणि सृजनशीलतेचे जिवंत प्रतीक आहे. 'माय मराठी' या संकल्पनेत तिचे शुद्ध, प्रमाण आणि अभिजात रूप जितके महत्त्वाचे आहे, तितकेच विविध उपभाषांनी वाढवलेले तिचे वैविध्यही महत्त्वाचे आहे.

मराठी ही उपभाषांनी समृद्ध झालेली भारतातील एक प्रमुख भाषा आहे.मातृभाषा आपले अस्तित्व असते. बोलीभाषा माणसाची अस्मिता असते. प्रत्येक बोलीत तिचा वेगळा रंग, वेगळी लय आणि वेगळे चैतन्य तसेच लोकजीवनाचे प्रतिबिंब सामावलेले आहे. त्यामुळे मराठी भाषा गौरव दिन साजरा करताना जगातील एका अभिमानास्पद भाषेला आपण 'माय मराठी' म्हणतो, याचा आत्मीय अभिमान बाळगण्याचा हा दिवस आहे.

हा दिवस प्रत्येक मराठी माणसाने व्यवहारात, शिक्षणात, प्रशासनात, माध्यमांमध्ये आणि दैनंदिन संभाषणात मराठीचा जाणीवपूर्वक वापर करण्याचा संकल्प करण्याचा आहे.

**मराठी भाषा गौरव दिन : २७ फेब्रुवारी :** वि. वा. शिरवाडकर उपाख्य कुसुमाग्रज यांच्या जन्मदिनी, म्हणजेच २७ फेब्रुवारीला मराठी भाषा गौरव दिन साजरा केला जातो. मराठी साहित्य आणि भाषेच्या समृद्धीसाठी त्यांनी केलेल्या कार्याच्या स्मरणार्थ हा दिवस साजरा केला जातो.

२१ जानेवारी २०१३ रोजी मराठी भाषा विभागाने अधिकृतपणे या दिनाची घोषणा केली. तसेच ३ ऑक्टोबर रोजी राज्यात 'अभिजात मराठी भाषा दिन' साजरा केला जातो. तर दरवर्षी माजी राष्ट्रपती दिवंगत डॉ. ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या जयंतनिमित्त १५ ऑक्टोबरला वाचन प्रेरणा दिन साजरा केला जातो. राज्यभरात वाचन संस्कृतीला प्रोत्साहन देण्यासाठी विविध कार्यक्रम, वाचन उपक्रम आणि शैक्षणिक कार्यक्रम आयोजित केले जातात. या दोन्ही दिवसांत राज्यभर विविध साहित्यिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते.

मराठी भाषेचा गौरव करण्याबरोबरच तिच्या संवर्धनासाठी आणि विस्तारासाठी चिंतन करण्याची ही संधी असते. चला, यावर्षी मराठी भाषा गौरव दिन साजरा करताना मराठीला समृद्ध करणाऱ्या उपभाषांचा वाटा समजून घेऊया.

**विविध उपभाषांचा समृद्ध वारसा :** महाराष्ट्रात विविध बोलीभाषांचा विपुल वापर आढळतो. नाथ, महानुभाव आणि वारकरी संत परंपरेतील संतांनी प्राचीन काळापासून विविध बोलींचा वापर करून मराठी भाषेला अधिक व्यापक केले. आपण सर्वांनी आपल्या बालपणी चिमणी आणि कावळ्याची गोष्ट ऐकली आहे...तुम्हाला माहिती आहे, श्री चक्रधर स्वामींनी ही गोष्ट आठशे वर्षांपूर्वी रुसलेल्या एका मुलीला सांगितल्याची नोंद लीळाचरित्रात आहे. कविश्रेष्ठ कालिदास, शूद्रक यांच्या शाकुंतल, मृच्छकटिक या नाटकांमध्ये अनेक संवाद मराठी बोली भाषेत आहेत.

वऱ्हाडी, अहिराणी, कोकणी, मालवणी, कोल्हापुरी, मराठवाडी, नागपुरी, झाडीबोली, खानदेशी, गोंडी, बंजारा, कोलामी अशा असंख्य उपभाषा मराठीच्या समृद्ध परंपरेचा भाग आहेत. प्रत्येक उपभाषेला स्वतंत्र ऐतिहासिक व सांस्कृतिक पार्श्वभूमी आहे.

जशा अनेक उपनद्या मिळून नदी अधिक विशाल आणि समृद्ध होते, तशाच या उपभाषांनी मराठी भाषेला गोडवा, विस्तार आणि ऊर्जा दिली आहे.

उदाहरणार्थ, वऱ्हाडी ही अत्यंत प्रभावी उपभाषा आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या 'ग्रामगीता' मध्ये वऱ्हाडी भाषेचा प्रभावी वापर दिसतो. त्यांनी संपूर्ण गावगाडाच मराठीत मांडला आहे.तसेच संत गाडगेबाबा यांच्या कीर्तनांमधूनही वऱ्हाडीचा सहज आणि प्रभावी उपयोग आढळतो. आचार्य प्र.के.अत्रे यांनी गाडगेबाबांच्या वऱ्हाडी संबोधनाचे जाहीर कौतुक केले आहे.

कोकणी व मालवणी बोली त्यांच्या खास गोडव्यासाठी ओळखल्या जातात, तर कोल्हापुरी बोली तिच्या रांगड्या ठसक्यासाठी प्रसिद्ध आहे. झाडीबोली आणि गोंडी भाषेच्या प्रभावामुळे महाराष्ट्राच्या आदिवासी संस्कृतीचा समृद्ध वारसा जतन झाला आहे.

झाडीबोलीतील नाटकांची परंपरा महाराष्ट्राला ज्ञात आहे. खानदेशी आणि अहिराणी भाषेचा गोडवा बहिणाबाई चौधरी यांच्या काव्यातून प्रत्ययास येतो.

उपभाषांवर प्रादेशिक प्रभाव असतो. उदाहरणार्थ, कोकणी मराठीवर कन्नडचा प्रभाव जाणवतो. 'अक्का' हा मोठ्या बहिणीसाठी वापरला जाणारा गोड शब्द कन्नड-तेलुगू भाषांमधून मराठीत रूढ झाला आहे. वऱ्हाडीमध्ये, झाडीबोलीत हिंदीचे, तर अहिराणीमध्ये गुजरातीचे अनेक शब्द सहजपणे मिसळलेले दिसतात. खरे तर हीच भाषेची खरी ताकद आहे—स्वीकारण्याची आणि समृद्ध होण्याची!

**मराठी भाषेचे संवर्धन आणि विकास :** उपभाषांनी मराठीला अधिक व्यापक आणि अभिव्यक्तिपूर्ण बनवले आहे. राज्य शासनाने मराठी भाषा गौरव दिनानिमित्त मराठी भाषा संवर्धक, अभ्यासक, संशोधक, लेखक आणि साहित्यिक यांचा सन्मान करण्याचे निर्देश दिले आहेत.

भाषाविषयक स्पर्धा, परिसंवाद, व्याख्याने आणि चर्चासत्रे आयोजित केली जातात. विविध शासकीय कार्यालयांमध्ये त्रिभाषा सूत्राचा प्रभावी वापर करण्यावर भर दिला जात आहे. मराठीचा प्रशासनिक, शैक्षणिक आणि सामाजिक वापर वाढवणे ही काळाची गरज आहे.

शासन प्रयत्नशील आहेच; परंतु, सर्वसामान्यांचा सक्रिय सहभाग तितकाच महत्त्वाचा आहे. विद्यार्थ्यांनी विविध बोलीभाषांचा अभ्यास करून त्यांचा अभिमान बाळगला पाहिजे. भाषेचे संवर्धन हे केवळ धोरणातून नाही, तर व्यवहारातून होते.

**मराठीचा वापर वाढवू या :** 'उपभाषांनी समृद्ध झालेली माय मराठी' हा विचार मराठीच्या सर्वांगसुंदरतेची जाणीव करून देतो. भाषा ही आईसारखी असते—विशाल, सामावून घेणारी आणि ममत्वाने ओथंबलेली.

महाराष्ट्रात येणारा कोणताही व्यक्ती या भाषेचा गोडवा अनुभवतो आणि सोबत घेऊन जातो. 'तुम्हाला मराठी येते म्हणजे तुम्ही मराठी आहात' हा या भाषेचा उदात्त बाणा आहे.

त्यामुळे आज मराठी भाषा गौरव दिनाला जागतिक स्तरावर मराठीचा सन्मान टिकवण्यासाठी आम्ही सर्वांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे यासाठी..

मराठी माणसाने मराठी माणसाशी मराठीतच बोलावे..!

चला... मराठी भाषा गौरव दिनानिमित्त आपण सर्वांनी एक संकल्प करूया, मराठी माणसाने मराठी माणसाशी मराठीतच बोलूया..!



### मराठी माध्यमातील शिक्षणाचा प्रसार

मराठी शाळांचे अस्तित्व टिकवणे
आधुनिक माध्यमांवर मराठीत अभिव्यक्त होणे
दैनंदिन व्यवहारात मराठीचा जाणीवपूर्वक वापर

### ही अत्यावश्यक पावले आहेत.

दिवंगत कवीवर्य डॉ. मिर्झा रफी अहमद बेग यांनी मराठीच्या सामर्थ्याचे सुंदर वर्णन केले आहे—

मराठीची प्रतिभा, ज्ञानेश्वरीत समावते
ग्रामगीता गाथाही, मराठीतच मावते
लावणीतून मराठीचे, सौंदर्य ओसंडते
शौर्य आणि औदार्य, पोवाड्यातून सांडते
मराठीनेच तुकड्याला तुकडोजी केले
गाडगेबाबा मराठीतच जन्म घेऊन गेले
अमृताशी पैज जिंकते, मराठी बोली
आभाळाची उंची जिच्यात, समुद्राची खोली
साऱ्यांनी मराठी हुंकारावर डोलावे


## उज्ज्वल करिअर घडवण्यासाठी आवश्यक असलेली कौशल्ये: लिंक्डइन

लिंक्डइन स्किल्स ऑन द राइज 2026 च्या मते, एआय अँड ऑटोमेशन, डेटा अँड ॲनालिटिक्स, आयटी अँड सायबरसिक्युरिटी, बिझनेस अँड ग्रोथ आणि पीपल अँड लीडरशीप ही कौशल्ये तुम्हाला स्पर्धात्मक राहण्यास मदत करतील. अनेक तरूण प्रोफेशनल्ससाठी रोजगार शोधण्यामधील सर्वात आव्हानात्मक बाब म्हणजे त्यांना पुढे काय शिकावे हे माहित नसते. नवीन लिंक्डइन (LinkedIn) डेटानुसार, भारतातील 38 टक्के नोकरीसाधक म्हणतात की त्यांना तंत्रज्ञानामुळे आजच्या भूमिकांसाठी आवश्यक असलेल्या कौशल्यांमध्ये होत असलेल्या बदलांसाठी तयार नसल्यासारखे वाटते. उमेदवारांना त्यांच्या रोजगारक्षमतेला अधिक निपुण करणाऱ्या बाबीवर लक्ष केंद्रित करण्यास मदत करण्यासाठी लिंक्डइनचा स्किल्स ऑन द राइज 2026 अहवाल कंपन्या व उद्योगांमध्ये पाच झपाट्याने विकसित होत असलेल्या कौशल्यांना निदर्शनास आणतो. ही पाच कौशल्ये आहेत एआय अँड ऑटोमेशन, डेटा अँड ॲनालिटिक्स, आयटी अँड सायबरसिक्युरिटी, बिझनेस अँड ग्रोथ आणि पीपल अँड लीडरशीप.

लिंक्डइन डेटामधून निदर्शनास येते की, जगभरातील 46 टक्के रिक्रूटर्स आता भूमिकांसाठी नियुक्ती करताना कौशल्यांसंदर्भात असलेल्या डेटावर अवलंबून आहेत. पण, भारतातील 74 टक्के रिक्रूटर्स म्हणतात की पात्र टॅलेंटचा शोध घेणे पूर्वीपेक्षा अधिक आव्हानात्मक बनले आहे. एआय टूल्ससह काम करू शकणाऱ्या, स्पष्टीकरण देऊ शकणाऱ्या व डेटाचा वापर करू शकणाऱ्या, डिजिटल यंत्रणा समजून घेऊ शकणाऱ्या आणि ऑपरेशनल कार्यक्षमता वाढवू शकणाऱ्या प्रोफेशनल्सला उद्योगामध्ये मोठी मागणी दिसून येत आहे. पण फक्त टेक्निकल क्षमता महत्त्वाची राहिलेली नाही. टीम्स अधिक क्रॉस-फंक्शनल व एआय-सक्षम होत असताना सहयोग, भागधारक व्यवस्थापन आणि प्रकल्प नेतृत्व ही कर्मचारी कौशल्ये म्हणून उदयास येत आहेत, जी टेक्निकल ज्ञानाला विकासात्मक परिणामामध्ये बदलतात.

लिंक्डइन करिअर तज्ञ आणि वरिष्ठ व्यवस्थापकीय संपादिका निरजिता बॅनर्जी (Nirajita Banerjee, LinkedIn Career Expert and India Senior Managing Editor) म्हणाल्या, वर्षानुवर्षे तरूण प्रोफेशनल्सला विशेषीकृत असण्यास सांगण्यात आले. पण, 2026 मध्ये हा नियम बदलत आहे. आज उमेदवारांना फक्त विशेषज्ञ म्हणून नाही तर कौशल्यांचे भांडार म्हणून ओळखले जात आहे. त्यांना एआयसह काम करण्याची पद्धत माहित आहे, तसेच ते डेटाबाबत अंदाज लावू शकतात, काम करण्याच्या पद्धतींमध्ये सुधारणा करू शकतात आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे टीम्समध्ये सहयोग करू शकतात. या सर्व संयोजनामधून अनुकूलता दिसून येते. झपाट्याने बदलत असलेल्या रोजगार बाजारपेठेत हीच अनुकूलता तुम्हाला रोजगारासाठी नियुक्ती व बढती देते. तुम्हाला या बाजारपेठेत तुमची रोजगारक्षमता वाढवायची असेल तर वेगळ्या कौशल्यांचा पाठलाग करणे थांबवा, तुमचे स्वतःचे अद्वितीय कौशल्य घडवा आणि त्यामध्ये स्पर्धात्मकता वाढवा. दैनंदिन कामकाजामध्ये एआयला एकीकृत करू शकणारे प्रोफेशनल्स गतीशील विकास व वाढ देण्यासाठी उत्तमरित्या सज्ज आहेत. वर्कफ्लो ऑटोमेशन, एलएलएमऑप्स, ऑटोएमएल आणि एपीआय इंटीग्रेशन यांसारखी कौशल्ये इंजीनिअरिंग व आयटीमध्ये लोकप्रिय आहेत, तरीदेखील आज एचआर, विपणन, विक्री व कन्सल्टिंगमध्ये प्रामुख्याने प्रॉम्प्ट इंजीनिअरिंग कौशल्य आढळून येत आहे, ज्यामधून निदर्शनास येते की एआय निपुणता मुलभूत व्यवसाय कार्यसंचालनांमध्ये एकीकृत होत आहे. नियोक्ते माहिती मिळवत, स्पष्टपणे संवाद साधत आणि निर्णय घेण्यामध्ये माहितीचा वापर करत प्रत्यक्ष विश्लेषणाला उपयोजनामध्ये आणण्याची क्षमता असलेल्या प्रोफेशनल्सना प्राधान्य देत आहेत. डेटा क्षमता इंजीनिअरिंग कार्यामध्ये स्पष्टपणे दिसून येत आहे, जेथे क्वेरिंग मुलभूत कौशल्य म्हणून उदयास येत आहे. आयटीमध्ये डेटा स्टोरीटेलिंगला सर्वाधिक मागणी दिसण्यात येत आहे. डेटा-संचालित निर्णय घेण्याची क्षमता देखील व्यवसाय विकास, विक्री, कन्सल्टिंग, एचआर, शिक्षण व विपणन अशा मुलभूत नसलेल्या तंत्रज्ञान कार्यांमध्ये मुलभूत कौशल्य बनत आहे. डिजिटल कार्यसंचालन वाढत असताना तंत्रज्ञान वातावरण सुरक्षित करू शकणारे, देखरेख ठेवू शकणारे आणि शक्तिशाली करू शकणारे प्रोफेशनल्स शाश्वत विकासासाठी आवश्यक बनत आहेत. इंजीनिअरिंग व माहिती तंत्रज्ञान कार्यांमध्ये सायबरसिक्युरिटी महत्त्वाचे आहे, तर कन्सल्टिंग भूमिकांमध्ये क्लाऊड इन्फ्रास्ट्रक्चर कौशल्याला प्राधान्य मिळत आहे, जे उद्योगाच्या डिजिटल परिवर्तनाला साह्य करते. याव्यतिरिक्त कंपन्या एआय व क्लाऊड प्लॅटफॉर्म्सचा वापर वाढवत असताना आयटी ऑटोमेशन, इन्सिडण्ट मॅनेजमेंट, रिअल-टाइम मॉनिटरिंग आणि थ्रेट डिटेक्शन यांसारख्या कौशल्यांमधून यंत्रणा स्थिरतेवरील वाढता भर दिसून येतो.

## व्यवस्थापन केंद्र स्थापन करण्यासाठी मेडट्रॉनिक इंडियासोबत ग्लेनेगल्स हॉस्पिटलसोबत काम करणार




मेडट्रॉनिक या आरोग्यसेवा तंत्रज्ञानामधील जागतिक अग्रणी कंपनीने आज ग्लेनेगल्स हॉस्पिटल, मुंबईसोबत सहयोगाची घोषणा केली. या सहयोगांतर्गत विशेष रेनल डिनर्व्हेशन थेरपी केंद्र स्थापन करण्यात येणार आहे. अनियंत्रित उच्च रक्तदाबाच्या वाढत्या आव्हानाचे निराकरण करण्यासाठी आणि अनियंत्रित उच्च रक्तदाबाच्या प्रभावी व्यवस्थापनाला चालना देण्यासाठी हा सहयोग करण्यात आला आहे. उच्चरक्तदाब हे जगभरातील अकाली मृत्यूचे प्रमुख कारण आहे. जागतिक स्तरावर आणि भारतात हृदयविकाराशी संबंधित आजार आणि मृत्यूदरासाठी हा आजार मोठ्या प्रमाणात कारणीभूत आहे. डॉक्टरांसमोर असलेले प्रमुख आव्हान म्हणजे रुग्णांमध्ये उच्चरक्तदाब नियंत्रित ठेवण्याबाबत असलेल्या जागरूकतेचा अभाव, जे अनियंत्रित उच्चरक्तदाबाचे महत्त्वपूर्ण कारण आहे. या भागीदारीबद्दल बोलताना, मेडट्रॉनिक इंडियाचे व्यवस्थापकीय संचालक आणि उपाध्यक्ष मनदीप सिंग कुमार म्हणाले, "अनियंत्रित उच्च रक्तदाब हे हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी काळजीमध्ये वाढणारे आणि अनेकदा अपरिचित आव्हान आहे आणि त्याचा वाढता भार काळजी कशी दिली जाते याचे पुनर्मूल्यांकन करण्याची तातडीची गरज अधोरेखित करतो. ग्लेनेगल्स हॉस्पिटलसोबतची आमची भागीदारी जागरूकता वाढविण्यासाठी आणि त्याच्या निदान आणि व्यवस्थापनासाठी अधिक समन्वित, संरचित दृष्टिकोन सक्षम करण्यासाठी त्यांच्या क्लिनिकल टीमसोबत जवळून काम करून वास्तविक जगात परिणाम देण्यावर केंद्रित आहे. या सहकार्याचे उद्दिष्ट जटिल आणि अनियंत्रित उच्च रक्तदाब असलेल्या रुग्णांसाठी सुधारित रक्तदाब नियंत्रण आणि चांगले दीर्घकालीन परिणामांना समर्थन देणे आहे. मेडट्रॉनिकमध्ये, आमचे ध्येय वेदना कमी करणे, आरोग्य पुनर्संचयित करणे आणि आयुष्य वाढवणे आहे आणि अशा प्रकारचे सहकार्य त्या वचनबद्धतेचे केंद्रबिंदू आहे." या सहकार्याबद्दल बोलताना, ग्लेनिगल्स हॉस्पिटल, मुंबईचे सीईओ डॉ. बिपिन चेवाले म्हणाले, "उशीरा निदान, विखंडित काळजी आणि विसंगत पाठपुरावा यामुळे उच्च रक्तदाब व्यवस्थापनाला आव्हाने मिळत आहेत.

# वैभवशाली मराठी भाषेचे दगाबाज कोण?

मराठी भाषा ही केवळ संवादाचं माध्यम नाही; ती आपल्या संस्कृतीची, इतिहासाची, लढ्यांची आणि संवेदनशीलतेची ओळख आहे. संत ज्ञानेश्वरांच्या ओव्या, तुकारामांच्या अभंगांपासून ते लोकमान्य टिळक, सावरकर, आचार्य अत्रे, पु. ल. देशपांडे, वि. स. खांडेकर यांच्यापर्यंत मराठी भाषेने वैचारिक आणि साहित्यिक समृद्धीचा अखंड प्रवास केला आहे. मग प्रश्न असा उभा राहतो—इतकी वैभवशाली मराठी भाषा आज दुय्यम का ठरत आहे? आणि तिचे खरे दगाबाज कोण?

लेखक
सुनील सुंदराबाई धाऊ
झळके, भिवंडी.
संपर्क क्रमांक - 9860290353
E-mail - sss.sz99@gmai.com

**मराठी माणूसच मराठीचा पहिला दगाबाज :** सत्य कटू असलं तरी मान्य करावंच लागतं की मराठी भाषेचा पहिला दगाबाज मराठी माणूसच आहे. घरात, खासगी शाळांत, उच्चवर्गीय वर्तुळात मराठीत बोलणं आजही कमीपणाचं लक्षण मानलं जातं. "माझं मूल इंग्रजीतूनच शिकणार" हा हट्ट प्रतिष्ठेचं प्रतिक मानला जातो, पण त्याचवेळी मातृभाषेची गळचेपी होते. भाषा जिवंत राहते ती वापरातून; वापरच नसेल तर वैभव केवळ पुस्तकांत बंदिस्त राहतं.

**इंग्रजी-मोह आणि न्यूनगंड :** आजच्या काळात इंग्रजी ही संधीची भाषा आहे, हे नाकारता येणार नाही. पण इंग्रजी शिकताना मराठीला दुय्यम ठरवणं ही आत्मघातकी मानसिकता आहे. इंग्रजी बोलणं म्हणजे बुद्धिमत्ता, प्रगती आणि आधुनिकता असा गैरसमज मराठी समाजात खोलवर रुजलेला आहे. मराठीत विचार करणं मागासलेपणाचं लक्षण मानलं जातं. हाच न्यूनगंड मराठी भाषेच्या मुळावर उठलेला आहे.

**शासन आणि प्रशासनाची उदासीनता :** मराठी ही महाराष्ट्राची राजभाषा असतानाही शासकीय कार्यालये, न्यायालये, विद्यापीठे, बँका आणि खासगी आस्थापनांत मराठीला दुय्यम वागणूक मिळते. फलक इंग्रजीत, कागदपत्रे इंग्रजीत आणि व्यवहारही इंग्रजीत—अशी परिस्थिती असेल, तर सामान्य माणूस मराठीला गांभीर्याने का घेईल? कायदे आहेत, पण अंमलबजावणी नाही. ही उदासीनता म्हणजे मराठीशी केलेला संस्थात्मक द्रोहच आहे.




**शिक्षण व्यवस्थेतील गोंधळ :** मराठी माध्यमाच्या शाळा कमी होत चालल्या आहेत. शिक्षकांची गुणवत्ता, अभ्यासक्रमाची अद्ययावतता आणि आधुनिक तंत्रज्ञानाशी जुळवून घेण्याची तयारी कमी पडते. परिणामी पालकांचा मराठी माध्यमावरचा विश्वास ढासळतो. दोष केवळ पालकांचा नाही; शिक्षण व्यवस्थेने मराठी माध्यम आकर्षक, सक्षम आणि स्पर्धात्मक बनवण्यात अपयश पत्करलं आहे.

**माध्यमे आणि मनोरंजन विश्व :** दूरचित्रवाणी, सोशल मीडिया, जाहिरातसृष्टी आणि चित्रपटांमध्ये मराठीचा वापर होत असला तरी त्यात शुद्धतेपेक्षा भेसळीचं प्रमाण वाढलं आहे. अकारण इंग्रजी शब्दांची भडिमार, चुकीचे उच्चार, अशुद्ध लेखन यामुळे भाषेचं सौंदर्य विद्रूप होतं. लोकप्रियतेसाठी भाषा हलकी करणं हेही एक प्रकारचं दगाबाजीच आहे.

**साहित्यिक आणि बुद्धिजीवींची मूक भूमिका :** कधीकाळी समाजाला दिशा देणारे साहित्यिक, विचारवंत आणि बुद्धिजीवी आज मराठी भाषेच्या प्रश्नावर फारसे आक्रमक दिसत नाहीत. पुरस्कार, पदे आणि वैयक्तिक सोयी यांच्या पुढे भाषेचं भान मागे पडतं. भाषा जपण्याचं नेतृत्वच दुर्बल झालं, तर सामान्य माणसाकडून अपेक्षा कशी ठेवायची?

**बाजारपेठ आणि कॉर्पोरेट संस्कृती :** आजच्या बाजारपेठेत "मराठी ब्रँड" असण्यापेक्षा "इंग्रजी नाव" अधिक विक्रीक्षम मानलं जातं. दुकाने, गृहनिर्माण प्रकल्प, कंपन्या, ॲप्स—सगळीकडे इंग्रजी नावांची चलती आहे. नफ्याच्या गणितात मराठी मागे पडते. हा आर्थिक दृष्टीने झालेला विश्वासघातही मराठीच्या अधःपतनाला कारणीभूत आहे.

दोष शोधण्याइतकीच गरज उपायांची आहे.

मराठीचा अभिमान दिखाऊ न ठेवता व्यवहारात आणायला हवा. घरात मराठी, शाळेत दर्जेदार मराठी, कार्यालयात व्यवहारिक मराठी आणि माध्यमांत शुद्ध मराठी—हा चार स्तंभांचा पाया उभा राहिला, तरच मराठीचं वैभव टिकेल. इंग्रजीच्या विरोधात न जाता, मराठीच्या बाजूने ठाम उभं राहणं ही काळाची गरज आहे.

मराठी भाषेला केंद्र सरकारकडून ऑक्टोबर २०२४ मध्ये अभिजात भाषेचा दर्जा बहाल करण्यात आला असला तरीसुद्धा,मराठी भाषा आज महाराष्ट्रातच संकटात आहे, हे सत्य नाकारता येणार नाही. पण ही भाषा दुर्बल नाही; ती दुर्लक्षित आहे. परंतु तितकेच समृद्धही आहे. ज्या दिवशी मराठी माणूस स्वतःच्या भाषेकडे डोळसपणे पाहील, त्या दिवशी मराठीचं वैभव पुन्हा उजळेल.

संत ज्ञानेश्वर व छत्रपती शिवाजी महाराज यांनी मराठी भाषेला महत्त्व देऊन मराठी जोपासली, राज्य कारभार चालवला, अनेक संत साहित्य व साहित्यिकांनी समृद्ध केलेली मराठी वाचवायची असेल, तर आधी मराठी माणसाला स्वतःपासून वेडात मराठे वीर दौडले सात अशा पद्धतीनेच पुन्हा सुरुवात करावी लागेल. प्रत्येक मराठी माणसाने आणि सरकारने दैनंदिन जीवनात व राज्य कारभारामध्ये मराठीचा अट्टाहास आणि आग्रह करावा लागेल.

### दगाबाज नेमके कोण?

मराठी भाषेचे दगाबाज कोण, असा प्रश्न विचारल्यावर बोट एकाच दिशेने दाखवता येत नाही.

- मराठीचा अभिमान न बाळगणारा मराठी माणूस, मराठी भाषांचा नाहक वापर.
- भाषेची अंमलबजावणी न करणारे राज्यकर्ते, राज्यकर्त्यांची मतांच्या लाचारीची स्वार्थी मानसिकता
- इतर राज्यांप्रमाणे महाराष्ट्रातही सर्व व्यवहारात आणि अभ्यासक्रमामध्ये मराठीचा वापर करणे बंधनकारक नसल्याचे, दुर्दैवी आणि घातक बाब.
- दर्जेदार मराठी शिक्षण न देणारी व्यवस्था, मराठी शाळा बंद करण्याचे षडयंत्र.
- भेसळ करणारी माध्यमे, आणि मौन बाळगणारे बुद्धिजीवी—

हे सगळे मिळून मराठी भाषेचे दगाबाज ठरतात.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### नायगाव सोसायटीच्यावतीने अजित पवारांना श्रद्धांजली

पुरंदर (दैनिक संध्या) : महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे २८ जानेवारी रोजी विमान अपघातात दुःखद निधन झाले. या निधनामुळे सहकार क्षेत्रावरही मोठा दुःखाचा डोंगर कोसळला. यासाठी नायगाव विविध कार्यकारी सहकारी सोसायटी ची मासिक मीटिंग नुकतीच संपन्न झाली.यावेळी सोसायटीचे अध्यक्ष चंद्रकांत चौंडकर यांनी अजित दादांना श्रद्धांजली वाहण्याचा ठराव मांडला.सर्वांनी त्याला मान्यता देऊन अजित दादांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली.यावेळी नायगाव सोसायटीचे अध्यक्ष चंद्रकांत चौंडकर,उपाध्यक्ष प्रकाश कड,संचालक विलास खेसे, संजय होले,काशिनाथ खळदकर,रोहिदास कड,संदीप खेसे,दिलीप फडतरे,अर्जुन पाटोळे,संदीप चौंडकर,रोहिदास शेंडगे,मनिषा मेमाणे,पुष्पा चौंडकर,दिलीप मेमाणे सचिव मंगेश शेंडगे आदींनी श्रद्धांजली वाहिली.

### शालेय बस विशेष तपासणी मोहिमेत 15 वाहनांवर कारवाई

बारामती (दैनिक संध्या) : उप प्रादेशिक परिवहन कार्यालयामार्फत शालेय बस विशेष तपासणी मोहिमेत बारामती, दौंड, इंदापूर तालुक्यातील ७७ शालेय बसेस तपासणी करुन नियमांचे उल्लंघन करणाऱ्या दोषी १५ वाहनावर कारवाई करुन ६७ हजार ५०० रुपये दंडात्मक रक्कम वसूल करण्यात आली आहे. या मोहिमेत योग्यता प्रमाणपत्र, विमा प्रमाणपत्र, प्रदूषण नियंत्रण प्रमाणपत्र (पीयुसी) तसेच मुदत संपलेल्या इतर कागदपत्रे व रस्ते सुरक्षा नियमांचे पालन न करणाऱ्या दोषी शालेय बसेसवर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. तसेच मोटार वाहन निरीक्षक यांनी शाळांना भेटी देऊन शालेय बसेसच्या विधिग्राह्य नसलेल्या कागदपत्रांचे नुतनीकरण करणे, शालेय बस नियमावलीचे पालन करणे, रस्ता सुरक्षा वाहतूकीच्या नियमांचे पालन करण्याबाबत संबंधित शाळा व्यवस्थापक व वाहनचालकांना सूचना देण्यात आल्या आहेत. विद्यार्थ्यांचे पालक आणि अन्य नागरिकांकडून केलेल्या मागणी विचारात घेता तपासणी मोहीम आयोजित करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांच्या परीक्षा संपल्यानंतरही यापुढेही विशेष तपासणी मोहिम सुरुच राहणार आहे. सर्व शालेय बस आणि इतर वाहनचालकांनी आपल्या वाहनांची सर्व कागदपत्रे अद्यावत करून घ्यावीत, असे आवाहन उप प्रादेशिक परिवहन अधिकारी सुरेंद्र निकम यांनी केले आहे.



### स्वातंत्र्यवीर सावरकर यांना अभिवादन

पुणे (दैनिक संध्या) : स्वातंत्र्यवीर सावरकर फाउंडेशन, पुणे आणि विश्व हिंदू जागृती फाऊंडेशन, हिंदुस्तान यांच्या संयुक्त विद्यमाने विनायक दामोदर सावरकर यांच्या पुण्यतिथीनिमित्त पुण्यातील सारसबाग येथील वीर सावरकरांच्या पुतळ्यास भावपूर्ण अभिवादन करण्यात आले. यावेळी प्रखर हिंदुत्ववादी व सावरकरांच्या विचारांचे पाईक असणारे अॅडव्होकेट व सीए सर्वेश मेहेंदळे यांच्या हस्ते पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला. कार्यक्रमास प्रशांत टिकार, फाउंडेशनचे पदाधिकारी प्रीतम थोरवे व नयन ठाकूर उपस्थित होते. याप्रसंगी उपस्थित मान्यवरांनी स्वातंत्र्यवीर सावरकरांचे देशप्रेम, स्वातंत्र्यासाठीचा त्याग, क्रांतिकारक कार्य व अखंड भारताची संकल्पना यांचा गौरव केला. सावरकरांचे विचार आजच्या पिढीसाठी प्रेरणादायी असून राष्ट्रहितासाठी त्यांचे विचार आत्मसात करण्याची गरज असल्याचे मत सर्वेश मेहेंदळे यांनी यावेळी बोलताना व्यक्त केले.



### टाकळी हाजीच्या तामखरवाडीत बिबट्या जेरबंद

कवठे येमाई (दैनिक संध्या) : शिरूर तालुक्याच्या बेट भागातील टाकळी हाजीच्या तामखरवाडी परिसरात बिबट्याचा उपद्रव वाढलेला असताना ग्रामस्थांच्या मागणीनुसार शिरून वनविभागाच्या वतीने पोपट महादू पवळे यांच्या शेतात बिबटयाला जेरबंद करण्यासाठी पिंजरा लावण्यात आला होता. या पिंजऱ्यात बुधवारी पहाटे बिबट्या जेरबंद झाल्याचे नागरिकांच्या सकाळी निदर्शनास आल्याने ही माहिती तात्काळ शिरूर वनविभागाला देण्यात आली. बिबट्या जेरबंद झाल्याचे समजताच शिरूर वन कर्मचाऱ्यांनी तातडीने येऊन जेरबंद बिबट्या ताब्यात घेत त्याची रवानगी माणिकडोह बिबट निवारा केंद्रात केली असून नर बिबट अंदाजे ७ वर्षे वयाचा असल्याची माहिती शिरूरचे प्रभारी वन परिक्षेत्र अधिकारी निळकंठ गव्हाणे यांनी दिली.

# शिव महापुराण कथा श्रवणासाठी शिरूरमध्ये भाविकांचा महासागर

**शिरूर (दै. संध्या)**



आंतरराष्ट्रीय ख्यातीचे कथावाचक प.पू.पंडीत प्रदीपजी मिश्रा (सीहोरवाले) यांच्या अमृतवाणीमधून श्री शिव महापुराण कथेचा लाभ घेण्यासाठी हरहर महादेवचा जय घोष करत शिरूर परिसरात भक्तीचा महासागर उसळला असून भक्तीमय वातावरणात संपूर्ण परीसर न्हाऊन निघाला आहे.अप्रतिम अशा आयोजन व नियोजनाबद्दल प.पू.पंडीत प्रदीपजी मिश्रा यांनी प्रकाशजी धारीवाल व त्यांच्या परिवाराचे यावेळी कौतुक करत आपल्या गळ्यातीलच पुष्पहार धारिवाल परिवाराच्या प्रत्येक सदस्याच्या गळ्यात घालून त्यांना आशीर्वाद दिले. रामलिंग रोड येथे होत असलेल्या कार्यक्रम स्थळी जाणारे रस्ते भाविकांच्या गर्दीने फुलून गेले आहेत.प्रसिद्ध उद्योगपती प्रकाशभाऊ धारीवाल,दिनाभाभी धारीवाल,उद्यागपती आदित्य धारीवाल,साक्षी धारीवाल व धारीवाल परीवार पी.आर. धारीवाल फाऊंडेशनच्या वतीने मंगळवार दि.२४ रोजी पासून दि.२ मार्च रोजी पर्यंत दु.१ ते ४ असे श्री शिव महापुराण कथेचे रामलिंग रोड शिरूर घोडनदी येथे आयोजन करण्यात आले आहे. प.पू.पंडीत प्रदीपजी मिश्रा यावेळी म्हणाले,शिरूर येथील रामलिंग मंदिर येथील शिवलिंग हे प्रभू श्रीराम यांनी वनवासात असताना स्वतः स्थापित केलेले आहे.दर्शन घेण्यासाठी भाविक भक्तांनी येथे आवश्य यावे.दररोज नियमित शिवपूजा व पिंडीवर एक तांब्याभर पाणी अर्पण करावे असे ते म्हणाले. भगवान श्री शंकराची महती सांगताना पंडितजींनी, " भगवान शिव को ना तो आपकी धन,संपदासे या चढावे की आस है, उन्हे तो आपके विश्वास की आस है असे नमूद केले. जीवनात काही मोठे साध्य करायचे असेल तर मेहनत करा मात्र त्याबरोबरच शिव पिंडीवर एक लोटा जल अवश्य अर्पण करा.धारीवाल कुटुंबीयांच्या शिवभक्तीचा उल्लेख करताना ते म्हणाले रसिकलालजी धारीवाल हे मोठे शिवभक्त होते.यामुळेच धारीवाल कुटुंबीयाला कथा आयोजनाचे भाग्य लाभल्याचेही पंडितजींनी यावेळी नमूद केले.

सुमारे ३० एकरांहून अधिक जागेवर उभारण्यात आलेला भव्य आणि सुसज्ज मंडप सध्या भाविकांच्या आकर्षणाचे केंद्र ठरत आहे.मुख्य मंडपाबरोबरच प्रसादासाठी स्वतंत्र सुसज्ज प्रसादलय मंडपही उभारण्यात आले आहे.संपूर्ण परिसरात शिवनामाचा गजर,भव्य सजावट आणि शिस्तबद्ध नियोजनामुळे एक आगळावेगळा आध्यात्मिक सोहळा अनुभवण्याची संधी शिरूरकरांना मिळाली आहे.

# प्राचार्य डॉ. अनिल निघोट यांच्या पुस्तकांचे प्रकाशन!

**मंचर (दै. संध्या)**



मंचर येथील डॉ.एम.ए.खान शिक्षणशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अनिल नारायण निघोट यांनी जागतिक मराठी भाषा दिनानिमित्त विद्यार्थी व शिक्षकांसाठी लिहिलेल्या शैक्षणिक संदर्भपर आठ पुस्तकांचा भव्य प्रकाशन सोहळा कर्मवीर भाऊराव पाटील सभागृह अण्णासाहेब आवटे महाविद्यालय मंचर येथे २६ फेब्रुवारी रोजी पार पडला.

प्राचार्य डॉ. अनिल निघोट यांनी अॅडव्हान्सड एज्युकेशनल सायकोलाजी लर्निग एन्ड टिचींग, मोडर्न - अॅडव्हान्सड एज्युकेशनल मैनेजमेंट, भावनिक बुद्धिमत्ता आणि सहकार्यात्मक अध्ययन,इंडीयन नोलेज सिस्टीम इन एज्युकेशन, लर्निग एन्ड टिचींग, असेसमेंट अॅन्ड ईव्हेल्युएशन फोर लर्निग, अध्ययन आणि अध्यापन, अध्ययनासाठी मुल्यांकन आणि मुल्यमापन अशा आठ पुस्तकांचे आज प्रकाशन झाले. यावेळी

माजी प्राचार्य डॉ. पांडुरंग गायकवाड, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र व विस्तार विभागप्रमुख प्रा.डॉ.गीता शिंदे, आवटे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एन.एस.गायकवाड, उपप्राचार्य सुनील सालके,सांस्कृतिक विभागप्रमुख डॉ.बी.पी गार्डी ,

महात्मा गांधी विद्यालयाचे प्राचार्य नितीन बाणखेले, पंचायत समिती सदस्य शिवाजी निघोट, गनी शेख आदी मान्यवरांच्या शुभहस्ते पुस्तक प्रकाशन सोहळा झाला. याप्रसंगी असुन अण्णासाहेब आवटे महाविद्यालयाचे शिक्षकवृंद ,आजी माजी विद्यार्थी

या पुस्तक प्रकाशन सोहळ्यास उपस्थित होते. सुत्रसंचलन प्रा.झावरे सी ए., मुंढे जी. डी. यांनी केले.

महाविद्यालयाचे वतीने मराठी भाषा गौरव दिनानिमित्त भित्तिचित्र, रांगोळी, कविता,स्वरचित कविता अशा विविध स्पर्धातील यशस्वी विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र देण्यात आले.

यावेळी प्रा.प्राचार्य डॉ.अनिल निघोट व प्रा सुरेखाताई निघोट, डॉ.सोनल, आकांक्षा व शैलेश अनिल निघोट यांनी सर्वांचे आभार मानले.


# बारामती नगरपरिषदेच्या पहिल्याच बैठकीत नगरसेवक आक्रमक

**बारामती (दै. संध्या)**

बारामती येथील नगरपरिषदेच्या अर्थसंकल्पाच्या सादरीकरणासाठी झालेल्या पहिल्याच बैठकीत गुरुवारी (ता. 26) नगरसेवकांनी नागरिकांच्या विविध प्रश्नांवर किती जागरुक आहोत हे दाखवून देत आक्रमकपणे मुद्दे मांडत प्रशासनास धारेवर धरले. नगराध्यक्ष सचिन सातव, उपनगराध्यक्षा श्वेता नाळे, गटनेते संजय संघवी व मुख्याधिकारी पंकज भुसे उपस्थित होते. नगरसेवक सुनील सस्ते, आरती गव्हाळे शेंडगे, नवनाथ बल्लाळ, जय पाटील, नीलेश इंगुले, विष्णूपंत चौधर, अभिजित जाधव, अभिजित चव्हाण, अमर धुमाळ, भारती शेळके, सोमनाथ गजाकस, राहुल वाघोलीकर, आलताफ सय्यद, राजेंद्र सोनवणे, प्रतिभा खरात, अनुप्रिता ताबे, दर्शना तांबे, संपदा चौधर, सविता जाधव, मनीषा बनकर, गणेश जोजारे, अमोल कावळे, गोरख पारसे, विशाल हिंगणे यांच्यासह इतरही नगरसेवकांनी अनेक मुद्यांवर प्रशासनास धारेवर धरले. नगराध्यक्ष सचिन सातव व गटनेते संजय संघवी यांनी अनेक मुदयांवर खुलासे करत नगरसेवकांचे समाधान करण्याचा प्रयत्न केला. या अर्थसंकल्पीय बैठकीमध्ये नगराध्यक्षांनी सर्वच नगरसेवकांना बोलू देण्याची भूमिका घेत या पुढील काळातही नगरसेवकांना विश्वासात घेत सभागृह चालविणार असल्याचा संदेश दिला. नगरसेवकांच्या सूचनांची दखल न घेणाऱ्या कर्मचारी व विभागप्रमुखांबाबत कारवाईच्या सूचना नगराध्यक्षांनी मुख्याधिकाऱ्यांना केल्या.

# उरुळी कांचन पोलीस स्टेशन हद्दीत चोऱ्यांचे सत्र सुरू


**उरुळी कांचन (दै. संध्या)**



उरुळी कांचन येथील शिंदवणे रोड परिसरात बुधवार दि. २५ फेब्रुवारी रोजी रात्री अज्ञात चोरट्यांनी तब्बल १६९ कबूतरांची चोरी केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. चोरीस गेलेल्या कबूतरांची किंमत अंदाजे सात लाख रुपये इतकी असल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, शिंदवणे रोड येथील दोन शेजारी असलेल्या इमारतीच्या तिसऱ्या मजल्याच्या टेरिसवर कबुतरे होती. एका इमारतीच्या टेरिसवर अजय गाढवे यांची १०९ कबुतरे अंदाजे किंमत (५ लाख ५० हजार रुपये) तर शेजारील दुसऱ्या इमारतीच्या टेरीस वर अमीर शेख यांची ६० कबुतरे अंदाजे किंमत (१ लाख ५० हजार रुपये) अशी एकुण सात लाख रुपयाचे कबुतरी होती असल्याची माहिती अजय गाढवे यांनी दिली. तसेच विशेष पद्धतीने पाळण्यात येणारी कबूतरं ठेवण्यात आली होती. ही कबूतरं विविध दुर्मिळ व स्पर्धात्मक जातींची असल्याने त्यांना मोठी बाजारपेठीय किंमत असल्याचे सांगितले. संबंधित कबूतरमालकाने नेहमीप्रमाणे रात्री व्यवस्था पाहून घेतली होती; मात्र सकाळी पाहणी केली असता पिंजऱ्यांचे कुलूप तोडलेले आढळले आणि सर्व कबूतरं गायब असल्याचे निदर्शनास आले. या प्रकारामुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे. कबूतर पालन हा काहींसाठी छंद असला तरी अनेक जण त्याकडे व्यवसाय म्हणून पाहतात. स्पर्धात्मक व प्रजाती सुधारित कबूतरांची किंमत हजारोंपासून लाखोंपर्यंत असते. त्यामुळे ही चोरी पूर्वनियोजित असावी, असा संशय व्यक्त केला जात आहे.

# 'Artificial Intelligence & Machine Learning' परिसंवादाचे आयोजन

**बारामती (दै. संध्या)**



इंदापूर तालुका ग्रामविकास प्रतिष्ठान संचलित विश्वासराव रणसिंग महाविद्यालय, कळंब (ता. इंदापूर) यांच्या वतीने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या गुणवत्ता सुधार कार्यक्रमांतर्गत (Quality Improvement Program) 'Artificial Intelligence & Machine Learning' या विषयावर राज्यस्तरीय परिसंवादाचे आयोजन करण्यात आले आहे. हा परिसंवाद शुक्रवार, २७ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता बारामती येथील हॉटेल कृष्णसागर सेमिनार हॉलमध्ये होणार आहे.

महाविद्यालयास NAAC च्या तिसऱ्या चक्रात B+ मानांकन प्राप्त झाले असून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण व आधुनिक शिक्षण देण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येत असल्याची माहिती संस्था सचिव विरसिंह रणसिंग यांनी दिली.

कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आणि मशीन लर्निंग (ML) या तंत्रज्ञानाच्या माध्यमातून नवोन्मेषी, शाश्वत आणि समतोल भविष्य घडविण्याच्या संधींचा अभ्यास करण्यासाठी तज्ज्ञ, संशोधक, प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांना एक व्यासपीठ उपलब्ध करून देणे हा परिसंवादाचा मुख्य उद्देश आहे.


या परिसंवादात AI मुळे उत्पादकता वाढ, निर्णय प्रक्रियेतील अचूकता, उद्योग-व्यवसाय, अर्थव्यवस्था, पर्यावरण, शिक्षण, आरोग्य आणि राजकारण क्षेत्रातील बदल या विषयांवर तज्ज्ञांचे मार्गदर्शन होणार आहे. व्याख्याते म्हणून प्रा. राहुल शहा, डॉ. प्रदीप पैठणे, डॉ. राहुल चाकरे, मुधोजी महाविद्यालय फलटणचे प्राचार्य डॉ. पंढरीनाथ कदम, तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय बारामतीचे प्राचार्य डॉ. अविनाश जगताप, विद्या प्रतिष्ठान कंप्यूटर सायन्स विभाग प्रमुख प्रा. किशोर ढाणे तसेच विश्वासराव रणसिंग महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक काळंगे मार्गदर्शन करणार आहेत.

संस्था अध्यक्ष आनंदी रणसिंग, उपाध्यक्ष प्रकाश कदम, सचिव विरसिंह रणसिंग, खजिनदार विरबाला पाटील, विश्वस्त कुलदीप हेगडे, शंकरराव रणसिंग व सौ. राही रणसिंग यांच्या प्रमुख उपस्थितीत परिसंवाद पार पडणार आहे. परिसंवादात कॉमर्स, सायन्स, भूगोल, इतिहास, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, इंग्रजी व साहित्य, मानसशास्त्र, शारीरिक शिक्षण आणि ग्रंथालयशास्त्र या विविध शाखांमध्ये AI च्या वापराबाबत विशेष सत्रे आयोजित करण्यात आली आहेत. स्वीकृत संशोधन निबंधांना 'Peer-reviewed International Journal' मध्ये प्रसिद्धी दिली जाणार आहे.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना अत्याधुनिक तंत्रज्ञानाशी जोडणारा हा राज्यस्तरीय उपक्रम ठरणार असून संशोधक व विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन परिसंवाद समन्वयक डॉ. पी. एस. शिंदे व प्राचार्य डॉ. अशोक काळंगे यांनी केले आहे.

# पुणे ग्रँड टूरकडून सायकलिंग समुदायासाठी अधिकृत नोंदणीचे आवाहन

**पुणे (दै. संध्या)**



पुणे ग्रँड टूरच्या अभूतपूर्व यशानंतर, जिल्हा प्रशासन आणि स्पर्धा आयोजकांनी पुण्यातील सायकलिंग इकोसिस्टम अधिक मजबूत करण्यासाठी पुढाकार घेतला आहे. आगामी आवृत्तीच्या पार्श्वभूमीवर, व्यावसायिक सायकलपटू, सायकलिंग क्लब, संस्था आणि या क्षेत्राच्या वाढीस हातभार लावणाऱ्या सर्व घटकांसाठी पुणे ग्रँड टूरने अधिकृत नोंदणी उपक्रम सुरू केला आहे.

या उपक्रमासाठी www.punegrandtour.in या अधिकृत संकेतस्थळावर मोफत नोंदणी फॉर्म उपलब्ध करून देण्यात आला आहे. पुण्यातील सायकलिंग क्षेत्रासाठी एकात्मिक आणि भविष्याभिमुख जाळे निर्माण करणे हा यामागील मुख्य उद्देश आहे. भारतातील सायकलिंग क्रांतीचे अग्रदूत म्हणून, सायकलिंग क्षेत्रातील सर्व घटकांना एका समान व्यासपीठावर आणणे, प्रतिभा संवर्धन, ज्ञानविनिमय आणि या क्रीडा प्रकाराची संरचित वाढ साध्य करणे हे या उपक्रमाचे ध्येय आहे.

सायकलिंग क्षेत्राशी संबंधित सर्व पात्र व्यक्ती व संस्थांनी संकेतस्थळावरील लिंकद्वारे नोंदणी करून या चळवळीत सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

नोंदणीसाठी पात्र श्रेणी पुढीलप्रमाणे :

१. **वैयक्तिक सायकलपटू**
व्यावसायिक, हौशी स्पर्धक, रँडोनर, मनोरंजन व फिटनेस सायकलिस्ट, कम्युटर, उत्साही सायकलपटू, प्रशिक्षक, कोच व राईड लीडर्स.

२. **सायकलिंग क्लब / गट / संस्था**
समुदाय, अधिकृत क्लब, असोसिएशन, फेडरेशन, अकादमी, शाळा व महाविद्यालयीन संघ, कॉर्पोरेट संघ, टूरिंग कलेक्टिव्ह व डिजिटल प्लॅटफॉर्म.

३. **स्पर्धा / इव्हेंट आयोजक**
रोड रेस, एमटीबी स्पर्धा, ग्रॅन फोंडो, ब्रेव्हेट–ऑडॅक्स, सायक्लोथॉन, स्टेज रेस, लीग, चॅम्पियनशिप, राईड ड्राईव्ह, टूर व मोहिमा.

४. **सायकलिंग उद्योग / व्यवसाय**
सायकल ब्रँड्स, घटक उत्पादक, अॅपरेल व गिअर कंपन्या, रिटेल स्टोअर्स, वितरक, रिसेलर्स, वर्कशॉप व सर्व्हिस सेंटर्स, बाईक फिट स्टुडिओ, परफॉर्मन्स लॅब, रेंटल व बाईक शेअरिंग सेवा तसेच मोबिलिटी सोल्युशन्स.

५. **मीडिया / कंटेंट क्रिएटर्स / प्लॅटफॉर्म**
यूट्यूब चॅनेल, पॉडकास्ट, ब्लॉग, व्ह्लॉग, फोटोग्राफर, फिल्ममेकर, पत्रकार, प्रिंट व डिजिटल प्रकाशने, कम्युनिटी पेजेस, ट्रेनिंग अॅप्स, रूट / नेव्हिगेशन अॅप्स व इव्हेंट लिस्टिंग प्लॅटफॉर्म.

पुण्यातील सायकलिंग क्षेत्र अधिक सक्षम, सर्वसमावेशक आणि जागतिक स्तरावर स्पर्धात्मक करण्यासाठी सर्व संबंधित घटकांनी सक्रिय सहभाग नोंदवावा, असे जिल्हा प्रशासनाकडून आवाहन करण्यात येत आहे.